सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | गुरुवार, २० नोव्हेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २६० | पाने १२ | किंमत रु. ६/-
■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



समाजकार्य करताना 'यथाशक्ती' म्हणणे योग्य नाही. समजा कुटुंब आपले आहे तर त्यासाठी आपण 'यथाशक्ती' काम करतो की त्यासाठी सर्वस्व-समर्पण करतो? समाजाविषयीसुद्धा हीच भावना असली पाहिजे. त्यात तडजोड नको. फुरसतीच्या वेळेत काम करतो ही गोष्ट कृत्रिम आहे, अज्ञान आहे. यात ना व्यक्तीचे कल्याण आहे ना समाजाचे. प्रामाणिकपणे आणि नि:स्वार्थ बुद्धीने काम करणेच स्वाभाविक आहे.

**- बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

# पवारांच्या रोषाचे परिणाम लक्षात येताच पाटील पिता-पुत्राकडून दिलगीरी व्यक्त

### जल्लोषाच्या जोषात अनगरकरांचे थेट अजित पवारांनाच आव्हान

### बारामतीच्या पवारांनाच आव्हान दिल्याने मोहोळच्या अनगरची महाराष्ट्रात चर्चा

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील अनगर नगरपंचायतची पहिलीच निवडणूक प्रचंड गाजली. माजी आमदार राजन पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे जवळपास सर्व उमेदवार बिनविरोध होण्याचे निश्चित झाले आहेत. तर नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भाजपाच्या विरोधातील उमेदवाराचा अर्ज छाननीत बाद झाला. या नंतर भाजपा कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. याप्रसंगी माजी आमदार राजन पाटील यांचा मुलगा बाळराजे उर्फ विक्रांत पाटील यांनी जल्लोष करताना थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाच



आव्हान देत घोषणा केली की, सगळ्यांचा नाद करा पण अनगरकरांचा नाद करू नका अजित पवार असे थेट आव्हान दिले. याची प्रसार माध्यमांसह समाज माध्यमांवर मोठी चर्चा झाली. याप्रकारानंतर माजी आमदार राजन पाटील आणि त्यांचे पुत्र बाळराजे पाटीलज यांनी दिलगिरी व्यक्त करत पवारांची माफी मागितली आहे. परंतु याप्रकारावरून अजित पवार राष्ट्रवादी आक्रमक झाली आणि त्यांनी राजन पाटील व कुटुंबियांवर जोरदार टिकास्त्र करत निषेध आंदोलन केले.

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यावर पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आणि सध्या भाजपा मध्ये प्रवेश केलेले माजी आमदार राजन पाटील यांचे पारंपारिक वर्चस्व आहे. मोहोळ मतदारसंघात राजन पाटील सांगतील तोच उमेदवार निवडणून येणार असे चित्र होते. परंतु विधानसभा निवडणुकीत राजन पाटील यांच्याच नेतृत्वाखाली अजित राष्ट्रवादीचे उमेदवार यशवंत माने यांचा पराभव झाला. विशेष म्हणजे हा पराभव शरद पवार राष्ट्रवादीने केला. दोन्ही राष्ट्रवादीमधील वाद विकोपास गेला. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी दररोज झडत आहेत. इतिहास असा आहे की, अनगर ग्राम पंचायत निवडणूक वर्षेनुवर्षे बिनविरोध होत होती. मोहोळ तालुक्यातील सर्व निवडणुकीत पाटील बोले गाव डोले असे राजकारण होते. अनगर ग्रामपंचायत आता नगर पंचायत झाली. ही निवडणुक बिनविरोध होणार अशी चर्चा होती.

( उर्वरित वृत्त पान २ वर)

**राजन पाटील पिता-पुत्रानी व्यक्त केली दिलगीरी :** मंगळवारी जल्लोषात बाळराजे पाटील यांनी थेटअजित पवारांनाच आव्हान दिले खरे, परंतु या आव्हानाच्या पदसादाचे गांभीर्य लक्षात येताच बुधवारी माजी आमदार राजन पाटील यांनी पवारांची माफी मागितली. मोठे पवार आणि अजित पवार यांच्यामुळेच आमची प्रगती झाली आहे. माझ्या मुलाचे (बाळराजे) समर्थन करत नाही. तो लहान आहे. असे सांगत माजी आमदार राजन पाटील यांनी झाल्या प्रकरणावर दिलगिरी व्यक्त केली. तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील काहींनी आमच्या पाटील कुटुंबियांवर खालच्या पातळीवर टिका केली, अनगरकरांची मोठी बदनामी केली. मी केलेले वक्तव्य भावनेच्या भरात केल्याचे सांगत बाळराजे यांनीदेखील पवारांची माफी मागत दिलगीरी व्यक्त केली.

## महत्त्वाचे

### विदेशी गुंतवणूकदारांमुळे बाजार तेजीत

**मुंबई :** भारतीय शेअर बाजाराने पहिल्या सत्रातील घसरणीची मजबूत भरपाई करीत दिवसअखेरपर्यंत तेजी नोंदवली. विदेशी गुंतवणूक वाढत असल्याने आणि आयटी क्षेत्रातील शेअर वाढल्याने दिवसभर बाजारात मोठ्या प्रमाणात खरेदी झाली. निर्देशांक ५१३ अंकांनी वाढून ८५,१८६ वर बंद झाला तर, निफ्टीने २६ हजारांचा टप्पा पार केला. क्षेत्रनिहाय विचार करता आयटी, सार्वजनिक क्षेत्रातील बँक यांचे शेअर्स तेजीत राहिले. निफ्टी बाजारात एचसीएल, मॅक्स हेल्थकेअर, इन्फोसिस, विप्रो, टीसीएस हे शेअर्स फायद्यात राहिले.



### पोलिसांनी नोंदवले शीतल तेजवानीचे बयाण

**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीला कथितरीत्या बेकायदेशीरपणे विकलेल्या जमीन प्रकरणातील आरोपी शीतल तेजवानीचे बयाण पुणे पोलिसांनी नोंदवले. खडक पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यात तेजवानी यांची चौकशी करण्यात आली, असे एका अधिकाऱ्याने बुधवारी सांगितले. शीतल तेजवाणी व्यतिरिक्त पार्थ पवार यांचे व्यावसायिक भागीदार दिग्विजय पाटील आणि निलंबित तहसीलदार सूर्यकांत येवले या प्रकरणात आरोपी आहे. येवले यांनी बॉटनिकल सर्व्हे ऑफ इंडियाला (बीएसआय) बेदखल करण्याची नोटीस बजावून आपल्या अधिकाराचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. विक्री करारावर नाव नसल्याने पार्थ पवार यांना आरोपी करण्यात आलेले नाही, असे पोलिसांनी यापूर्वी सांगितले होते. तेजवानी यांनी पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील यांच्या अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपी या प्रतिष्ठानाला ४० एकर जमीन विकण्याचा करार केला होता. प्रत्यक्षात ही जमीन सरकारी मालकीची आहे.


# भारताच्या उत्थानासाठी 'देश प्रथम' तत्त्व आवश्यक

### सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

**◆ गुवाहाटी, १९ नोव्हेंबर**

जोपर्यंत भारतीय समाज संघटित आणि गुणवान होणार नाही तोपर्यंत देशाचे भाग्य बदलणार नाही. भारताच्या उत्थानासाठी 'देश प्रथम' या तत्त्वावर आपल्याला वाटचाल करावी लागेल, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत आसाम भेटीवर असून गुवाहाटीतील बरबाडी येथील सुदर्शनालय येथे आयोजित युवा नेतृत्व संमेलनाला ते उपस्थित होते. यावेळी त्यांनी विविध क्षेत्रातील शंभरहून अधिक युवा प्रतिनिधींशी संवाद साधला आणि संघाचे सिद्धांत, आदर्श आणि कार्यपद्धती याविषयी मार्गदर्शन केले. संघसंस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या दूरदृष्टीचा उल्लेख करताना सरसंघचालक म्हणाले, संघाचा मूळ उद्देश भारताला विश्वगुरू बनवणे हा आहे. देशाची प्रगती तेव्हाच होते जेव्हा समाज जागृत होतो आणि प्रगतिशील भारतासाठी एक



संघटित, गुणवान आणि गुणवत्तापूर्ण समाजाची निर्मिती आवश्यक आहे. हे साध्य करण्यासाठी विकसित देशांच्या इतिहासाचे अध्ययन व्हायला हवे. त्या देशांनी आपली पहिली शंभर वर्षे समाजाला एकजूट आणि मजबूत करण्यावर भर दिला. भारतीय समाजालाही अशाच पद्धतीने विकसित व्हावे लागेल.

**विविधतेचा सन्मान भारतीय परंपरा**

संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त जाहीर केलेले पंच परिवर्तन देशनिर्मितीच्या भावनेला व्यक्त करतात. भाषा, क्षेत्र आणि विचारांच्या विविधतेचा सन्मान करणे ही भारताची प्राचीन परंपरा आहे. जगातील अनेक देशांमध्ये ही मानसिकता दिसून येत नाही.

भारताची परंपरा सांगते की, माझा मार्ग योग्य आहे, पण, तुमच्या परिस्थितीत तुमचा मार्गही योग्य ठरू शकतो. या संदर्भातील उदाहरण देताना सरसंघचालक म्हणाले, जे लोक भारतापासून वेगळे झाले त्यांची विविधता नष्ट झाली. जसे पाकिस्तानात पंजाबी आणि सिंधी समाज आता उर्दूचा स्वीकार करण्यास बाध्य आहेत. विविधतेचा सन्मान करणारा केवळ हिंदू समाज आहे आणि अशाच समाजाची निर्मिती करणे संघाचे प्रमुख उद्दिष्ट आहे, असेही ते म्हणाले.

**सामाजिक नेतृत्व निर्मिती हाच उद्देश**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी कोणीही ऐकीव माहितीवरून मत तयार करू नये. प्रथम संघाविषयी जाणून घ्यावे आणि त्यासाठी संघाच्या संपर्कात आले पाहिजे. संघ ही एक आदर्श व्यक्ती निर्माण पद्धती आहे. संघाचा उद्देश तळागाळात गैर राजकीय सामाजिक नेतृत्वाची निर्मिती करणे हा आहे. व्यक्ती निर्माणानेच समाज बदलतो आणि समाज बदलतो तेव्हा व्यवस्था आपोआपच बदलत जाते. युवा वर्गाने संघाच्या शाखांचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा. जेणेकरून त्यांना संघाच्या व्यक्ती आणि व्यक्तित्व निर्माणाचे कार्य कसे चालते, याचा बोध होईल, असे आवाहनही सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले. (वृत्तसंस्था)

**सरसंघचालक आजपासून मणिपूर भेटीवर**

सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत गुरुवार २० नोव्हेंबर रोजी मणिपूर भेटीवर जात आहेत. २०२३ मधील मणिपूर हिंसाचारानंतर सरसंघचालकांची ही पहिलीच भेट राहणार आहे. तीन दिवसांच्या वास्तव्यादरम्यान सरसंघचालक नागरिक, उद्योजक, आदिवासी समुदायाचे प्रतिनिधी यांच्याशी संवाद साधणार आहेत. २२ नोव्हेंबरपर्यंत त्यांचा मणिपूरमध्ये मुक्काम आहे.

# अनमोल बिष्णोईला भारतात आणले

### एनआयएने केली अटक, ११ दिवसांची कोठडी

**नवी दिल्ली, १९ नोव्हेंबर**

अमेरिकेतून प्रत्यार्पण केल्यानंतर बुधवारी दिल्ली विमानतळावर पोहोचताच लॉरेन्स बिष्णोई आणि गुंड अनमोल बिष्णोईला एनआयएने अटक केली. त्यानंतर पतियाळा न्यायालयात हजर केले असता, त्याला ११ दिवस एनआयएच्या कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला.



अटक केल्यानंतर त्याला एनआयएच्या मुख्यालयात आणले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांची हत्या केल्याचा अनमोल बिष्णोईवर आरोप आहे. सलमान खानच्या घरावरही त्याने गोळीबार केला होता. त्याला १५ दिवसांची कोठडी देण्यात यावी, अशी मागणी एनआयएने न्यायालयात केली होती. अमेरिकेने मंगळवारी त्याचे प्रत्यार्पण केले होते. अनमोल लॉरेन्स टोळीसाठी अमेरिकेतून गुन्हेगारी सिंडिकेट चालवायचा तसेच कारवायाही करायचा. त्यासाठी त्याने टोळीतील गुंडांचा वापर केला होता. इतर गुंडांच्या मदतीने तो विदेशातून खंडणी वसुली करायचा. अतिरेकी, विविध टोळ्यांमधील गुंड, शस्त्रास्त्र तस्करांमधील साटेलोटे आणि त्यांची निधी उभारणी व पायाभूत सुविधा नष्ट करण्याचा प्रयत्न एनआयएकडून केला जात आहे. अनमोल बिष्णोई सिद्धू मुसेवाला हत्याकांडातही सहभागी होता




# शहरातील सराफ दुकानांची आयकरकडून झाडाझडती

### केंद्रीय आयकर पथकाचा समावेश, मोठा पोलिस बंदोबस्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ नोव्हेंबर-**

सोलापूर शहरातील प्रसिद्ध अशा दोन सराफा दुकानात बुधवारी सकाळी आयकर विभागाने झाडाझडती घेतली. पण या दुकानांवर आयकरची धाड पडल्याची चर्चा सर्वत्र होती. दुकानातील सोन्याच्या दागिन्यांसह त्यांच्या व्यवहारासंबंधी तपासणी आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आली.

या तपासणीत केंद्रीय आयकर पथक देखील सहभागी असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांना प्राप्त झालेल्या माहितीनुसार, व्यवहारात अनियमितता आढळून आल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. त्यानुसार सदरची प्राथमिक तपासणी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. यावेळी ग्राहकांना खरेदी करण्यासाठी दुकानात जाण्यास पोलिसांनी मज्जाव केला होता. दिल्ली पासिंगची वाहने सराफा बाजारातील रस्त्यांवर उभी असल्याने सर्वत्र चर्चेचा विषय झाला होता. यावेळी सराफ बाजार परिसरात स्थानिक शहर पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. शहरातील दोन सराफा दुकानात सकाळीच तपासणी सुरू झाल्याने सोलापूर शहरातील सराफ व्यवसाईकांसह इतर व्यवसायिकांचे धाबे दणाणल्याचे वातावरण होते.




# नितीशकुमार आज घेणार शपथ

### रालोआच्या विधिमंडळ पक्ष नेतेपदी निवड

**◆ पाटणा, १९ नोव्हेंबर**

बिहारमध्ये नवीन सरकार स्थापन करण्याच्या प्रक्रियेने वेग धरला आहे. रालोआच्या विधिमंडळ नेतेपदी नितीशकुमार यांची बुधवारी एकमताने निवड करण्यात आली. सायंकाळी त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि राज्यपालांची भेट घेऊन सरकार स्थापनेचा दावा केला. उद्या, सकाळी ११.३० वाजता नितीशकुमार गांधी मैदानावर आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. विशेष म्हणजे ते दहाव्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील.

रालोआच्या सर्व घटक पक्षांची बुधवारी बैठक झाली. बैठकीत एकमताने नितीशकुमार यांची नेतेपदी निवड केली, अशी माहिती जदयूचे बिहारमधील प्रदेशाध्यक्ष उमेशसिंह कुशवाह यांनी दिली. नितीशकुमार यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करताना आरएलएमच्या नेत्या स्नेहलता यांनी, तेच पुन्हा मुख्यमंत्री होतील, असे



बुधवारी पाटणा येथे झालेल्या रालोआच्या बैठकीत नितीशकुमार यांची विधीमंडळ नेतेपदी एकमताने निवड करण्यात आली

सांगितले. रालोआ सरकारने महिला सशक्तीकरणासाठी काम केले आणि पुढेही करीत राहील. एलजेपी (आर) पक्षाकडून रालोआचा पाठिंबा कायम राहील. चिराग पासवान यांच्या वतीने मी नितीशकुमार यांचे अभिनंदन करतो, असे पक्षाचे नेते संजय पासवान यांनी सांगितले. दरम्यान, सम्राट चौधरी यांची भाजपाच्या विधिमंडळ पक्ष नेतेपदी निवड करण्यात आली. कॅबिनेटचा निर्णय मुख्यमंत्री घेतील, असे बिहारमधील भाजपाचे प्रदेशाध्यक्ष दिलीप जयस्वाल यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)




# जावेद सिद्दिकीला १३ दिवसांची कोठडी

**नवी दिल्ली, १९ नोव्हेंबर**

अल-फलाह विद्यापीठाचा संस्थापक जावेद अहमद सिद्दिकीला १३ दिवस अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीच्या कोठडीत ठेवण्याचा आदेश दिल्ली न्यायालयाने बुधवारी दिला. सरकारी पक्षाने केलेल्या युक्तिवादावर काळजीपूर्वक विचार केल्यानंतर, बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्यातील कलम १९ चे अनुपालन करण्यात आले, असे माझे मत असल्याचे अतिरिक्तसत्र न्यायाधीश शीतल चौधरी प्रधान यांनी सांगितले. गुन्हयाची तीव्रता अतिशय गंभीर आहे तसेच याच्या तपासाचा अत्यंत सुरुवातीचा टप्पा आहे. त्यामुळे आरोपीला १३ दिवस ईडीच्या कोठडीत ठेवणे योग्य वाटते, असे त्या म्हणाल्या. अटक केली नसती तर जावेद सिद्दिकी विदेशात फरार होण्याच्या प्रयत्नात होता.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





आध्यात्मिक गुरू दिवंगत श्री सत्य साई बाबा यांच्या पुट्टपर्थी येथे बुधवारी झालेल्या जयंती उत्सवाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थिती दर्शविली. यावेळी उपस्थित आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू

## जम्मू-काश्मीर काऊंटर इंटेलिजेन्स विंगने टाकले छापे

◆ **श्रीनगर, १९ नोव्हेंबर**

मंगळवारी जम्मू-काश्मीरच्या काऊंटर इंटेलिजेंस विंगने एका डॉक्टरशी संबंधित दहशतवादी कट रचल्याप्रकरणी खोऱ्यातील अनेक ठिकाणी छापे टाकले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

हे शोध व्हाईट कॉलर दहशतवादी मॉड्यूल किंवा दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणाशी जोडलेले नाहीत. श्रीनगर, अनंतनाग आणि कुलगाम जिल्ह्यांमध्ये हे छापे टाकण्यात आले. हे शोध एका डॉक्टरशी संबंधित प्रकरणाबद्दल आहेत, परंतु हे एक वेगळे प्रकरण आहे आणि ते व्हाईट कॉलर दहशतवादी मॉड्यूल किंवा दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणाशी जोडलेले नाही, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. तपास सुरू आहे आणि अधिक तपशिलांची वाट पाहत आहे, असेही त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# दहशतवादाला ठेचून काढणे हेच धोरण

## एससीओ शिखर परिषदेत जयशंकर यांची भूमिका

◆ **मॉस्को, १९ नोव्हेंबर**

दहशतवादापासून जनतेचे संरक्षण करण्याचा भारताला पूर्ण अधिकार आहे आणि आम्ही ते करत राहू. जगाने दहशतवादाच्या सर्व प्रकारांबद्दल शून्य सहनशीलता दाखवावी. काश्मीरच्या पहलगाममध्ये आणि त्यानंतर राजधानी दिल्लीत झालेला दहशतवादी हल्ला हा भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान असून, याविरोधात कठोर कारवाई सुरू आहे. दहशतवादाला ठेचून काढणे हेच आमचे धोरण आहे, असा इशारा परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत दिला.



रशियाची राजधानी मॉस्को येथे आयोजित एससीओ शिखर परिषदेला संबोधित करताना जयशंकर म्हणाले, राजधानी दिल्लीत झालेला कारमधील स्फोट हा दहशतवादी हल्ला होता. दहशतवादापासून देशवासीयांचे रक्षण करण्याचा आम्हाला अधिकार आहे. एससीओची स्थापना दहशतवाद, फुटीरतावाद आणि अतिरेकीवादाचा सामना करण्यासाठी झाली होती. गेल्या काही वर्षांत हे धोके आणखी गंभीर झाले असताना जगाने दहशतवादाबद्दल शून्य सहनशीलता दाखवणे आवश्यक आहे. एससीओने बदलत्या जागतिक परिस्थितीशी जुळवून घेतले पाहिजे आणि एक व्यापक अजेंडा तयार करून कार्यक्षमता सुधारायला हवी. आम्हाला असे वाटते की, सध्याची जागतिक आर्थिक परिस्थिती अनिश्चितता आणि अस्थिरतेच्या काळातून जात आहे. मागणी आणि पुरवठा साखळीत निर्माण झालेल्या गुंतागुंतीमुळे धोके वाढले. जोखीम कमी करण्यासाठी विविधीकरणाची तातडीची आवश्यकता आहे. व्यापक आर्थिक संबंधांद्वारे यावर मात करणे शक्य असून, ही प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक आणि न्याय्य असली पाहिजे. (वृत्तसंस्था)

### आव्हानांचा धोका पूर्वीपेक्षा वाढला

» दहशतवाद, फुटीरतावाद आणि अतिरेकीवादाचे आव्हान पूर्वीपेक्षा जास्त आहे. यावर मात करण्यासाठी एससीओमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. एससीओमध्ये केवळ रशियन आणि चिनी भाषा वापरल्या जातात यावर आमचा आक्षेप आहे. इंग्रजीला एससीओची अधिकृत भाषा बनवण्याचा निर्णय आणखी पुढे ढकलला जाऊ नये. संस्कृती आणि मानवतेशी संबंधित मुद्यांवर बोलताना जयशंकर म्हणाले, भारत आणि एससीओ देशांचे सांस्कृतिक संबंध खोलवर आहेत. भारताने अनेक देशांमध्ये भगवान बुद्धांच्या पवित्र अवशेषांचे प्रदर्शन आयोजित केले आणि वारसा संवर्धनात सहकार्य करण्यास देखील तयार आहे.

### भारताला एसयू-५७ विमाने देण्यास रशिया तयार

» **जयशंकर यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या चर्चेत त्यांनी भारताला रशियन एसयू-५७ लढाऊ विमाने देण्याची तयारी दर्शवली. कोणत्याही अटीशिवाय या विमानांसाठी तंत्रज्ञानदेखील हस्तांतरित केले जाणार आहे. रशियन एसयू-५७ विमाने अमेरिकेच्या एफ-३५ ला टक्कर देणारी मानली जातात. एफ-३५ प्रमाणेच, एसयू-५७ हे पाचव्या पिढीतील लढाऊ विमान आहे.**

## सीएनजीचा प्रश्न कायम; इंधन भरण्यासाठी रांगा

◆ **मुंबई, १९ नोव्हेंबर**

मुंबई आणि आसपासच्या भागातील सीएनजी पंपांवर मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशीही लांब रांगा लागल्या होत्या. कारण एका प्रमुख गॅस पाईपलाईनला झालेल्या नुकसानीमुळे पुरवठा खंडित झाला. यामुळे वाहनांना इंधन भरण्यास अडथळा निर्माण झाला होता.

महानगर गॅस लिमिटेड (एमजीएल) द्वारे चालविल्या जाणाऱ्या बहुतेक सीएनजी पंपांवर सकाळपासूनच लांब रांगा लागल्या होत्या. विशेषतः टॅक्सी आणि ऑटोरिक्षांच्या अनेक चालकांना नेहमीच्या १५ ते ३० मिनिटांच्या तुलनेत तीन ते चार तास वाट पाहावी लागली. महानगर गॅस लिमिटेडच्या म्हणण्यानुसार, राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स (आरसीएफ) कंपाऊंडमधील गेलच्या मुख्य पुरवठा पाईपलाईनला तृतीय पक्षाने नुकसान पोहोचविल्यानंतर रविवारी हा व्यत्यय सुरू झाला. वडाळा येथील एमजीएलच्या सिटी गेट स्टेशनला गॅस पुरवठा होतो. (वृत्तसंस्था)

# बद्रीनाथ बनणार स्मार्ट आध्यात्मिक शहर

## थेट पंतप्रधान कार्यालयाच्या देखरेखीत काम सुरू

◆ **चमोली, १९ नोव्हेंबर**

हिंदू धर्मातील चार धाम यात्रेला अतिशय महत्त्व आहे. या चार धामपैकी एक आहे बद्रीनाथ धाम. मात्र, उत्तराखंडचे बद्रीनाथ धाम आता केवळ तीर्थक्षेत्र राहिलेले नाही, तर लवकरच ते एक स्मार्ट आध्यात्मिक शहर म्हणून विकसित होईल.

भाविकांची वाढती संख्या आणि विद्यमान सुविधांचा अभाव लक्षात घेता, ४८१ कोटी रुपये खर्चून तयार केलेल्या मास्टर प्लॅन अंतर्गत बांधकामाचे काम वेगाने सुरू आहे. श्री बद्रीनाथ-केदारनाथ मंदिर समितीचे अध्यक्ष हेमंत द्विवेदी म्हणाले, या मास्टर प्लॅन अंतर्गत काम २०२६ च्या अखेरीस पूर्ण होईल. पाच वर्षांपूर्वी जेव्हा हा मास्टर प्लॅन सादर करण्यात आला तेव्हा त्याची अंतिम मुदत २०२५ निश्चित करण्यात आली होती.




सध्या, बद्रीनाथला अरुंद रस्ते, पार्किंग, सार्वजनिक सुविधांचा अभाव आणि वाहतूक कोंडी अशा समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या मास्टर प्लॅनचा उद्देश पुढील ५० वर्षांसाठी सुरक्षित, सुव्यवस्थित आणि आधुनिक मंदिर सुनिश्चित करणे आहे.

मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी बद्रीनाथ-केदारनाथ मंदिराच्या विकासाकडे विशेष लक्ष देत आहेत. पंतप्रधान कार्यालय (पीएमओ) या प्रकल्पावर सतत लक्ष ठेवून आहे. आमचे सरकार देखील नियमित आढावा घेते. मी स्वतः प्रगतीचे निरीक्षण करण्यासाठी घटनास्थळाला भेट देतो. मुख्य सचिव आणि गढवाल आयुक्त देखील कामाच्या गुणवत्तेचे मूल्यांकन करण्यासाठी आणि स्थानिक रहिवाशांकडून अभिप्राय गोळा करण्यासाठी वेळोवेळी भेट देतात. (वृत्तसंस्था)

### काय आहे नवीन योजना?

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील प्रकल्प म्हणून, बद्रीनाथ मास्टर प्लॅनची रूपरेषा मोदी सरकारने २०१४ मध्ये आखली होती. या प्रकल्पाचे काम २०२२ मध्ये सुरू झाले. या प्रकल्पाचा एकूण खर्च ४००-४८१ कोटी इतका आहे, ज्यामध्ये अंदाजे २०० कोटी आधीच खर्च झाले आहेत. पहिल्या टप्प्यात मंदिराभोवतीचे रस्ते रुंदीकरण, आगमन प्लाझा आणि नागरी सुविधा केंद्र बांधणे आणि बद्रीश आणि शेषनेत्र तलावांचे सुशोभीकरण यांचा समावेश होता.

दुसऱ्या टप्प्यात, नदीकाठ, रुग्णालय आणि वळण रस्त्याचे बांधकाम सुरू आहे. तथापि, नदीकाठचे बांधकाम सध्या थांबवण्यात आले आहे. हा थांबा प्रामुख्याने बद्रीनाथ मंदिराच्या खाली असलेल्या तप्त कुंडापासून ब्रह्मकपट मंदिरापर्यंतच्या परिसरात लागू आहे. अंतिम टप्प्यात, मंदिराभोवती ७५ मीटरच्या परिघात सुशोभीकरणाचे काम केले जाणार आहे. यासाठी ७२ इमारती पाडाव्या लागतील. सध्या २२ इमारती मालकांनी त्यांच्या इमारती रिकामी केलेल्या नाहीत.

# 'तलाक-ए-हसन'वर भडकले सर्वोच्च न्यायालय

## प्रथा रद्द करण्यावर विचार केला जाऊ शकतो

◆ **नवी दिल्ली, १९ नोव्हेंबर**

मुस्लिम समुदायातील एखाद्या पतीने स्वतः उपस्थित न राहता आपल्या वकिलाच्या माध्यमातून तलाक पाठविण्याच्या प्रथेवर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. कोणत्याही सभ्य समाजात याची परवानगी दिली जाऊ शकते का? असा प्रश्नही न्यायालयाने उपस्थित केलाय.

न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वातील तीन सदस्यीय न्यायासनाने म्हटले की, आपले पीठ तलाक ए हसन प्रथेला रद्द करण्यावर विचार करू शकते. बेनझीर हीना विरुद्ध भारत तसेच अन्य प्रकरणांची सुनावणी करताना न्या. सूर्यकांत, न्या. उज्ज्वल भुयान आणि न्या. एन. कोटिश्वरसिंह यांच्या न्यायासनाने, हे प्रकरण पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे सोपविण्याचेही संकेत दिले.

न्यायालयाने म्हटले की, ही प्रथा व्यापक स्वरूपात समाजाला प्रभावित करते. त्यामुळे न्यायालयाला सुधारणात्मक उपाय करण्यासाठी हस्तक्षेप करावा लागू शकतो. त्यांनी आरोपी पक्षाला म्हटले की, जेव्हा तुम्ही आम्हाला याविषयीचा थोडक्यात तपशील द्याल तेव्हा आम्ही हे प्रकरण घटनापीठाकडे सोपविण्यावर विचार करू. यातील ढोबळमानाने जे प्रश्न उपस्थित होताहेत, त्याची आम्हाला कल्पना द्यावी. नंतर आम्ही त्याचे स्वरूप पाहून त्यावर समाधान शोधण्याचा प्रयत्न करू. अशा प्रकारची प्रथा आधुनिक समाजाच्या प्रतिष्ठेला मारक असून महिलांच्या अधिकारांचे रक्षण व्हावे, याचीही गरज न्यायालयाने प्रतिपादन केली. (वृत्तसंस्था)

### तलाक-ए-हसन म्हणजे काय?

» तलाक-ए-हसन मुस्लिमांमध्ये तलाकचा एक प्रकार आहे, ज्या माध्यमातून पुरुष तीन महिन्याच्या कालावधीत दर महिन्याला एकदा या प्रमाणे तलाक शब्द उच्चारून विवाह संपवू शकतो. विशेष म्हणजे हे सर्व तो पती कोण्या दुसऱ्याच्या माध्यमातूनही करू शकतो. त्यासाठी त्याला स्वतःला हजर राहण्याची गरज नसते. तलाक ए हसन अंतर्गत, तिसऱ्या महिन्यात तलाक शब्द तिसऱ्यांदा उच्चारल्यानंतर औपचारिकरित्या घटस्फोट होतो.



# ६०० कुटुंबांना बेघर होण्याचा धोका

## वक्फ बोर्डाची सर्वोच्च न्यायालयात धाव

◆ **नवी दिल्ली, १९ नोव्हेंबर**

मुनांबममधील वादग्रस्त जमिनीच्या तपासासाठी आयोग स्थापन करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला केरळ उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी विशेष याचिका (एसएलपी) केरळ वक्फ संरक्षण वेदी यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे.

१० ऑक्टोबर रोजी, केरळ उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सरकारने स्थापन केलेल्या निवृत्त न्यायमूर्ती सी.एन. रामचंद्रन नायर यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी आयोग बेकायदेशीर घोषित करणारा एकल न्यायाधीशांचा आदेश रद्द केला. या जमिनीवर राहणाऱ्या ६०० कुटुंबांना बेघर होण्याचा धोका आहे.

एकल न्यायाधीशांनी मार्चमध्ये आयोगाची स्थापना रद्द केली होती. त्यांचे म्हणणे होते की वक्फ मालमत्तांशी संबंधित बाबी वक्फ कायदा, १९९५ अंतर्गत वक्फ बोर्ड आणि ट्रिब्यूनलच्या अधिकार क्षेत्रात येतात आणि सरकारला समांतर चौकशी करण्याचा कोणताही वैधानिक अधिकार नाही.

तथापि, विभागीय खंडपीठाने हा निर्णय उलटवत म्हटले की, केरळ वक्फ बोर्डाने (केडब्ल्यूबी) २०१९ मध्ये जमीन वक्फ म्हणून घोषित करण्याचा घेतलेला निर्णय कायदेशीररित्या अवैध होता. खंडपीठाने असेही म्हटले की १९५० मध्ये जमीन हस्तांतरण ही वक्फ डीड नव्हती तर भेटवस्तू डीड होती आणि जमीन वक्फ म्हणून घोषित करण्याची प्रक्रिया ही जमीन हडप करण्याचा प्रयत्न असल्याचे दिसून आले.

**काय आहे प्रकरण?**

बार अँड बेंचच्या अहवालानुसार, मुनांबममधील ही जमीन मूळतः ४०४.७६ एकर होती, परंतु समुद्राच्या धूपामुळे ती १३५.११ एकरपर्यंत कमी झाली आहे. १९५० मध्ये सिद्दीक सैत नावाच्या व्यक्तीने ही जमीन फारुख कॉलेजला दान केली. तथापि, तोपर्यंत अनेक कुटुंबे तिथे स्थायिक झाली होती आणि जमिनीचा वापर करत राहिली.

वक्फ बोर्डाचा दावा आहे की ही जमीन वक्फची होती, परंतु त्यानंतरच्या काळात कॉलेजने स्थानिक रहिवाशांना केलेल्या जमिनीच्या विक्रीत वक्फचा उल्लेख नव्हता. २०१९ मध्ये, केरळ वक्फ बोर्डाने औपचारिकपणे ही जमीन वक्फ मालमत्ता म्हणून नोंदणीकृत केली. सर्व पूर्वीचे विक्री व्यवहार बेकायदेशीर मानले गेले. (वृत्तसंस्था)

### राज्य सरकारची कारवाई आणि निषेध

» कुटुंबांच्या निषेधानंतर, केरळ सरकारने नोव्हेंबर २०२४ मध्ये न्यायमूर्ती (निवृत्त) रामचंद्रन नायर यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी आयोग स्थापन केला, ज्याने वादावर तोडगा सुचवला. या आयोगाला आव्हान देत, वक्फ संरक्षण समितीने उच्च न्यायालयात धाव घेतली.



## स्कॉर्पिओची ट्रकला धडक; ५ जणांचा मृत्यू, ७ गंभीर

◆ **कोंडागाव, १९ नोव्हेंबर**

छत्तीसगडमधील कोंडागाव जिल्ह्यात मंगळवारी रात्री स्कॉर्पिओच्या अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला, तर सात गंभीर जखमी आहे. रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला भरधान स्कॉर्पिओने धडक दिल्याने हा अपघात झाला. मृतकांमध्ये दोन कुटुंबांचा समावेश असून, ते बडे डोंगर गावातील रहिवासी आहे.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, मंगळवारी रात्री चित्रपट पाहून हे लोक घरी परतत असताना मसोरा टोल प्लाझाजवळ भरधाव स्कॉर्पिओने उभ्या ट्रकला धडक दिली. घटनेवेळी स्कॉर्पिओमध्ये एकूण १२ जण होते, त्यापैकी ५ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर ७ जण गंभीर जखमी आहे. जखमींना जगदलपूर येथील रुग्णालयात भरती करण्यात आले. (वृत्तसंस्था)

# बोचऱ्या प्रश्नामुळे ट्रम्प भडकले पत्रकारावर

## दिली प्रसारण परवानगी रद्द करण्याची धमकी

◆ **न्यू यॉर्क, १९ नोव्हेंबर**

व्हाईट हाऊसमध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना एका पत्रकाराने तीन बोचरे प्रश्न विचारताच ते त्या पत्रकारावर जाम भडकले. ट्रम्प यांनी एबीसी न्यूजच्या मुख्य प्रतिनिधी मेरी ब्रूस यांना 'भयानक पत्रकार' म्हणून दोषी ठरवले व त्यांच्या एबीसी न्यूजच्या प्रसारणाचा परवाना रद्द करण्याची धमकी दिली.

मेरी ब्रुस या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष व सौदी क्राऊन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांना प्रश्न विचारण्यासाठी ओव्हल कार्यालयामध्ये प्रवेश दिलेल्या पत्रकारांमध्ये होत्या.

तुम्ही राष्ट्राध्यक्ष असताना तुमच्या कुटुंबाने सौदी अरबमध्ये व्यवसाय करणे योग्य आहे का असा प्रश्न मेरी ब्रुस यांनी ट्रम्मप यांना विचारला.

ट्रम्प उत्तर देण्यापूर्वीच, मेरी ब्रुस यांनी सौदी नेत्याला एक प्रश्न विचारला की, तुमच्या राजेशाही व अमेरिकन गुप्तचर यंत्रणेने संगनमत करून तुम्ही एका पत्रकाराची क्रूर हत्या घडवून आणली. अशा परिस्थितीत अमेरिकन लोकांनी तुमच्यावर विश्वास का ठेवावा? आणि ट्रम्प तुमच्यावरसुद्धा.

तेव्हा ट्रम्प आणखी संतापले. तुम्ही कोमासाठी काम करता. एबीसी खोट्या बातम्या पसरवतात असे ट्रम्प म्हणाले. त्यांनी सौदी अरबमधील आपल्या कुटुंबाच्या व्यावसायिक कारवायांचे समर्थन केले.

२०१८ मध्ये सौदी राज्याचे टीकाकार आणि वॉशिंग्टन पोस्टचे पत्रकार जमाल खाशोग्गी यांच्या हत्येत राजकुमारचा काही दोष असल्याचा अमेरिकन गुप्तचर विभागाचा निष्कर्ष राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी फेटाळून लावला. सौदी नागरिक व व्हर्जिनियाचे रहिवासी असलेल्या खाशोग्गी हे बऱ्याच लोकांना आवडत नव्हते, असे त्यांनी सांगितले. ट्रम्प यांचे मताशी सहमती दर्शवित प्रिन्स मोहम्मद म्हणाले की, खाशोग्गीचा मृत्यू वेदनादायक व 'मोठी चूक' होती. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### प्राजक्ता-गश्मीरचा 'फुलवंती' आता हिंदीत



**मुंबई :** प्राजक्ता माळी आणि गश्मीर महाजनी ही जोडी आता मराठी मनोरंजन जगतात प्रेक्षकांच्या आवडीची झाली आहे. या दोघांच्या 'फुलवंती' चित्रपटाने प्रेक्षकांची पसंती मिळवली. आता या जोडीने प्रेक्षकांना अनोखी भेट दिली आहे. या दोघांनी समाज माध्यमांवर एक व्हिडीओ जारी करत एक महत्त्व पूर्ण घोषणा केली. प्राजक्ता आणि गश्मीरचा 'फुलवंती' आता हिंदी भाषेत प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. याचे डबिंग नुकतेच पार पडले. विशेष म्हणजे, हे हिंदीतील डबिंग प्राजक्ता आणि गश्मीर यांनीच केले. त्यांच्याच आवाजात आता प्रेक्षकांना 'फुलवंती' नव्याने अनुभवता येणार आहे. यातील गाणी देखील हिंदी प्रदर्शित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. हा चित्रपट राष्ट्रीय स्तरावर पोहोचावा म्हणून त्याचे डबिंग केले, असे गश्मीरने सांगितले.



# लालू कुटुंबीयांच्या निकटवर्तीयाला अटक

## घर खरेदी व्यवहारातील फसवणूक प्रकरण

◆ **नवी दिल्ली, १९ नोव्हेंबर**

गुरुग्राममधील घर खरेदीदारांच्या कथित फसवणुकीशी संबंधित अवैध सावकारी प्रकरणात राजदचे अध्यक्ष लालूप्रसाद यांच्या कुटुंबाच्या निकटचे मानले जाणारे जमीन व्यावसायिक अमित कात्याल याला अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) अटक केली आहे, असे अधिकृत सूत्रांनी सांगितले.

सोमवारी ईडीच्या गुरुग्राम क्षेत्रीय कार्यालयाने अवैध सावकारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) कात्यालला ताब्यात घेतले. गुरुग्राममधील एका विशेष न्यायालयाने त्यांना सहा दिवसांच्या ईडी कोठडीत पाठवले, असे त्यांनी सांगितले.

गुरुग्रामच्या सेक्टर ७० मध्ये १४ एकरपेक्षा जास्त जागेवर बांधलेल्या क्रिश फ्लोरेन्स इस्टेटमधील सदनिका न दिल्याच्या आरोपांशी संबंधित ही चौकशी आहे. हा प्रकल्प कात्यालची कंपनी, अँगल इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड विकसित करत होती.

कात्यालला २०२३ मध्ये ईडीने लालूप्रसाद, त्यांची पत्नी राबडी देवी आणि कुटुंबातील इतर सदस्यांशी संबंधित रेल्वेच्या कथित नोकरीच्या बदल्यात जमीन घोटाळ्याशी संबंधित वेगळ्या अवैध सावकारी प्रकरणात अटक केली होती.

क्रिश रिअलटेकद्वारे घर खरेदीदारांची ५०० कोटी रुपयांना फसवणूक केल्याच्या तिसऱ्या प्रकरणात व्यावसायिकावर आरोपपत्र दाखल केले होते. (वृत्तसंस्था)

# हेक्टोरिया हिमनदी वितळण्याचा वेग वाढला; धोक्याची घंटा!

**समुद्राच्या पातळीत वेगाने वाढीची शक्यता**

◆ **वॉशिंग्टन, १९ नोव्हेंबर**

अंटार्क्टिकाच्या हेक्टोरिया हिमनदीने शास्त्रज्ञांना धक्का दिला आहे. जानेवारी २०२२ ते एप्रिल २०२३ या १५ महिन्यांत हेक्टोरिया हिमनदी २५ किलोमीटर मागे सरकली आहे. नदी वेगाने वितळण्याची ही आधुनिक इतिहासातील सर्वात मोठी घटना होय. ही घटना इतर हिमनद्यांवर परिणाम करू शकते आणि समुद्राच्या पातळीवर वेगाने वाढ होऊ शकते, असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे.

२०२२ च्या सुरुवातीस हिमनदीसमोरील समुद्रातील बर्फाचा एक मोठा भाग तुटल्यामुळे हिमनदीचा तरंगणारा भाग पूर्णपणे विघटित झाला. नदीचा जमिनीशी जोडलेला भाग तरंगू लागल्यामुळे हिमनदी जलद वितळू लागली आणि तिचे आकुंचन झाले. नोव्हेंबर आणि डिसेंबर २०२२ मध्ये हिमनदी ८ किलोमीटर मागे सरकली. हिमखंड वितळत असताना भूकंपासारखी कंपने झाल्याची नोंद आहे. कोलोरॅडो बोल्डर विद्यापीठातील नाओमी ओचवाट आणि त्यांच्या टीमच्या अभ्यासानुसार, हिमनदीचा मुख्य भाग पातळ झाल्यामुळे तरंगू लागला आणि त्यामुळे ती वेगाने तुटली. 'एअरबस डिफेन्स अँड स्पेस'चे फ्रेझर क्रिस्टी म्हणतात की, उपग्रह डेटावरून हिमनदी जमिनीवर किती होती हे स्पष्ट दिसत नाही. ब्रिटनमधील लीड्स विद्यापीठाच्या अॅना हॉगच्या मते, बर्फाचा हा भाग आधीच तरंगत होता आणि ही एक सामान्य हिमनग तुटण्याची घटना होती. न्यूकॅसल विद्यापीठाच्या क्रिस्टीन बॅचलरच्या म्हणण्यानुसार, हा केवळ लहान हिमनदीचा घटक असून, जर अशा घटना थ्वेट्स किंवा पाइन आयलंडसारख्या मोठ्या हिमनद्यांमध्ये झाल्या, तर समुद्राच्या पातळीवर जलद वाढ होऊ शकते. (वृत्तसंस्था)

### संभाव्य आपत्ती टाळण्याचे प्रयत्न

» हवामान बदलामुळे अंटार्क्टिकाचा बर्फ वेगाने वितळत आहे आणि या घटनांनी जागरूक राहण्याची गरज असल्याचे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. हा अभ्यास 'नेचर जिओसायन्स' नियतकालिकेमध्ये प्रसिद्ध झाला असून, जगभरातील शास्त्रज्ञ जास्तीत जास्त माहिती गोळा करून भविष्यातील संभाव्य आपत्ती टाळण्याचे प्रयत्न करत आहेत. यासाठी उपग्रहांचीही मदत घेतली जात आहे.



पान १ वरुन

# पाटील पिता-पुत्राकडून दिलगीरी व्यक्त

दरम्यान सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या निवडणुकांमध्ये जिल्ह्यातील सर्व ठिकाणी फक्त भाजपाचे तिकीट आणि कमळ चिन्हावर निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला.

त्या प्रमाणे अनगर येथे भाजपाचे १७ उमेदवारानी अर्ज दाखल केला. मात्र त्यांच्या विरोधात एकही अर्ज दाखल न झाल्याने हे सर्व बिनविरोध होणार हे निश्चित आहे. याची औपचारिक घोषणा बाकी आहे. तर नगराध्यक्ष पद हे सर्वसाधारण महिलांसाठी राखीव आहे. या ठिकाणी माजी आमदार राजन पाटील यांची सून प्राजक्ता अजिंक्यराणा पाटील यांनी भाजपा तर्फे अर्ज दाखल केला. त्याला विरोध म्हणून राष्ट्रवादी पवार गटाच्या उज्वला थिटे यांनी अर्ज दाखल केला. थिटे यांना अर्ज दाखल करताना पाटील समर्थकांनी दहशत केल्याचा आरोप त्यांनी केला. पोलीस संरक्षणात थिटे यांनी शेवटच्या दिवशी पहाटेच्या सुमारास अर्ज दाखल केला. दुसऱ्या अपक्ष उमेदवार सरस्वती शिंदे यांनी देखील अर्ज दाखल केला. अर्जाच्या छाननी दिवशी शिंदे यांनी थिटे यांच्या अर्जावर हरकत घेतली. त्यानुसार निवडणूक निर्णय अधिकारी यांनी छाननी करताना थिटे यांनी दाखल केलेला उमेदवारी अर्जात सूचकाची सही नसल्या कारणाने उज्वला थिटे यांचा अर्ज बाद केला.

अपक्ष उमेदवार शिंदे अर्ज माघारी घेणार असल्याने प्राजक्ता पाटील यांचा नगराध्यक्ष होण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे भाजपा कार्यकर्त्यांनी मंगळवारी सायंकाळी जल्लोष केला. याप्रसंगी जल्लोषाच्या जोषात राजन पाटील यांचा मुलगा बाळराजे उर्फ विक्रांत पाटील यांनी थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाच जाहीर आव्हान दिल्याचे दिसून आले. बाळराजे म्हणाले, सगळ्यांचा नाद करा पण अनगरकरांचा नाद करू नका अजित पवार, हा असा व्हिडीओ प्रसारमाध्यमांसह समाज माध्यमांवर व्हायरल झाला. याची चर्चा, टीका मोठ्या प्रमाणावर झाली. बारामतीच्या पवार कुटुंबियांचा दबदबा संपूर्ण महाराष्ट्राला माहिती असून थेट उपमुख्यमंत्री अजित पवारांनाच जाहीर आव्हान दिले गेल्याने मोहोळ तालुक्यातील अनगरची मात्र महाराष्ट्रात चर्चा झाली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### मराठवाड्यात थंडीची लाट

**मुंबई** : राज्यात पारा झपाट्याने खाली घसरत असून थंडी वाढते आहे. उत्तर भारतातून येणाऱ्या थंड हवेमुळे महाराष्ट्रात गारठा वाढला आहे. पुढील काही दिवस थंडीची लाट कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. हिमाचल, जम्मू-काश्मीर, पंजाब, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि बिहारमध्ये थंडीच्या तीव्र लाटेचा इशारा देण्यात आला असून महाराष्ट्रातही याचा प्रभाव जाणवत आहे. परभणी आणि जेऊरमध्ये तापमान ७ अंशांपर्यंत खाली गेले आहे. जळगाव, निफाड, आहिल्यानगर, पुणे, मालेगाव, महाबळेश्वर, गोंदिया, भंडारा, यवतमाळ आणि वाशिम येथेही पारा १० अंशांखाली नोंदला गेला. दुसरीकडे दक्षिण भारतातील आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू या भागात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. जळगावमध्येही थंडीने यंदा विक्रम मोडला असून २३ वर्षांतील सर्वात कमी तापमान ७.१ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. डिसेंबर आणि जानेवारीत थंडी आणखी वाढण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

### जोडप्यासह पाच ड्रग्ज तस्करांना अटक

**जम्मू** : मंगळवारी जम्मू-काश्मीरमधील उधमपूर आणि पूंछ जिल्ह्यांमधील वेगवेगळ्या ठिकाणांहून एका जोडप्यासह पाच संशयित ड्रग्ज तस्करांना अटक करण्यात आली, असे पोलिसांनी सांगितले. जम्मूच्या बिश्नाह येथील सकिंदरपूर कोठे भागातील संशयित ड्रग्ज हॉटस्पॉटमधून अमजद खान उर्फ तय्या आणि त्याची पत्नी शमशाद अख्तर उर्फ पुट्टी यांना अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून २२.४५ ग्रॅम हेरॉईन जप्त करण्यात आल्याचे पोलिस प्रवक्त्याने सांगितले. किश्तवारच्या पद्दार भागातील रहिवासी मनोहर लाल याला उधमपूरच्या जखानी येथे वाहन तपासणीदरम्यान ४२२.९० ग्रॅम चरससह अटक करण्यात आली, असे प्रवक्त्याने सांगितले. लाल हा मोटारसायकलवरून जम्मूला जात असताना पोलिसांनी त्याला अडवले. उधमपूरमधील टिकरी येथे तपासणीदरम्यान त्याच्या बॅगेतून ४७२.२७ ग्रॅम चरस जप्त करण्यात आल्यानंतर सुनील कुमार या आणखी एका ड्रग्ज तस्कराला अटक करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. पूंछ जिल्ह्यातील फजलाबाद ब्रिज येथे झडतीदरम्यान पोलिसांनी सुरनकोट येथील इनाम-उल-हक या आणखी एका ड्रग्ज तस्कराला अटक केली आणि त्याच्याकडून ११.२० ग्रॅम हेरॉईन जप्त केले, असे प्रवक्त्यांनी सांगितले. अटक केलेल्या पाचही ड्रग्ज तस्करांवर नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्स (एनडीपीएस) कायद्याच्या वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### डॉ. उमर नबीच्या साथीदाराला कोठडी

**नवी दिल्ली** : १५ जणांचा बळी घेणाऱ्या लाल किल्ल्यावरील कार स्फोटातील आरोपी उमर उन नबी याचा सक्रिय सह-षडयंत्रकारी जसीर बिलाल याला मंगळवारी दिल्ली न्यायालयाने १० दिवसांची एनआयए कोठडी सुनावली. आरोपींना कोठडीत चौकशी करण्याची एनआयएची विनंती प्रधान जिल्हा आणि सत्र न्यायाधीश अंजू बजाज चांदणा यांनी मान्य केली. न्यायालयाच्या आवारात माध्यमांना प्रवेश देण्यास मनाई करण्यात आली. कामकाज जवळजवळ इन कॅमेरा झाले. न्यायालयाच्या आवारात पोलिस आणि रॅपिड ॲक्शन फोर्सचा मोठा बंदोबस्त होता. दंगलविरोधी उपकरणांमध्ये अनेक कर्मचारी सज्ज होते. अनंतनागमधील काझीगुंड येथील वाणीला सोमवारी श्रीनगरमध्ये अटक करण्यात आली, असे एका निवेदनात म्हटले आहे.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८५,१८६.४७ (+५१३.४५) |
| निफ्टी | २६,०५२.६५ (+१४२.६०) |



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२४,१०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. १,५७,२०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.४ | १५.३ |
| अमरावती | ३०.६ | ११.५ |
| भंडारा | २७.० | १०.० |
| बुलडाणा | २८.६ | १२.८ |
| चंद्रपूर | २९.८ | १३.८ |
| गडचिरोली | २९.२ | १२.० |
| गोंदिया | २८.२ | १०.४ |
| नागपूर | २८.४ | ११.४ |
| वर्धा | २९.१ | १२.४ |
| वाशीम | -.- | १०.६ |
| यवतमाळ | २९.० | १०.४ |

# निराशा लपविण्यासाठी यंत्रणेवर आरोप

## २०० हून अधिक मान्यवरांचे राहुल गांधींना पत्र

## निवडणूक आयोगाची प्रतिमा मलिन करीत आहे काँग्रेस

**नवी दिल्ली, १९ नोव्हेंबर**

स्वत:ची निराशा लपवण्यासाठी काँग्रेस पक्ष निवडणूक आयोगासारख्या सरकारी यंत्रणेवर आरोप-प्रत्यारोप करत असल्याचे म्हणत देशभरातील २०० हून अधिक मान्यवरांनी काँग्रेस खासदार राहुल गांधींना खरमरीत पत्र लिहिले आहे.



देशातील माजी न्यायाधीश आणि माजी प्रशासकीय अधिकारी, अशा सुमारे २०० जणांनी राहुल गांधींच्या नावे हे पत्र लिहिले आहे. त्यात म्हटले आहे की, आम्ही समाजातील वरिष्ठ नागरिक आहोत आणि भारताच्या लोकशाही व्यवस्थेवर प्रहार होतोय, हा आमच्यासाठी चिंतेचा विषय आहे. हा हल्ला बळाच्या आधारे नसून जहाल विषाक्त वक्तव्ये करून होत आहे. काही राजकीय नेते कोणतेही ठोस पुरावे आणि पर्याय न देता केवळ आपल्या नाट्यपूर्ण राजकारणापोटी हे प्रकार करत आहेत. त्यासाठी ते प्रक्षोभक विधाने आणि निराधार आरोपांचा आधार घेत आहेत.

या पत्रात सुमारे २७२ मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या आहेत. त्यात १६ निवृत्त न्यायमूर्ती, १२३ माजी आयएएस अधिकारी, १३३ निवृत्त लष्करी अधिकारी आणि १४ माजी राजदूतांचा समावेश आहे.

या पत्रात पुढे नमूद आहे की, भारतीय सशस्त्र दलाचे शौर्य आणि उपलब्धींवरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. याद्वारे त्यांची प्रतिमा डागाळण्याचा प्रकार होत आहे. एवढेच नाही तर न्यायपालिकेच्या निष्पक्षतेवरही शंका घेतली जात आहे. खासदार आणि उच्चाधिकाऱ्यांवर प्रश्नचिन्ह लावल्यानंतर आता हा हल्ला झेलण्याची वेळ भारताच्या निवडणूक आयोगावर येऊन ठेपली आहे.

पुढे लिहिले आहे की, या सर्वांनी अशीही घोषणा केली की आयोग भाजपाची बी टीम म्हणून काम करते आहे. अशी बेताल वक्तव्ये भावनात्मक स्वरूपात प्रभावी वाटू शकतात, पण चौकशीत कुठेही टिकाव धरू शकत नाहीत. कारण निवडणूक आयोगाने एसआयआरची प्रक्रिया जगजाहीर करूनच त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. याची निगराणी न्यायालयाने सांगितलेल्या पद्धतीने केली जात आहे. अपात्र नावांना हटवण्यात आले असून नव्या पात्र मतदारांना समाविष्ट करण्यात आले आहे. यावरून हे स्पष्ट आहे की, केले जाणारे आरोप स्वत:च्या राजकीय निराशेला लपविण्याचा केविलवाणा प्रयत्न आहे. (वृत्तसंस्था)

### पुरावे असल्याची ओरड, पण साधी तक्रार नाही

राहुल गांधी यांनी सातत्याने निवडणूक आयोगावर हल्ला केला आहे. त्यांनी इथवर आरोप केले आहे की, निवडणूक आयोग मतचोरीत सामील असल्याचे पुरावेही त्यांच्याकडे आहेत. विशेष म्हणजे, एवढे आरोप केल्यानंतर त्यांनी कोणतीही रीतसर साधी तक्रारही नोंदवलेली नाही. काँग्रेसचे इतर नेते, अन्य पक्षातील वरिष्ठ नेते, डाव्या विचारसरणीच्या संस्था आणि काही प्रसिद्धीलोलूपांनी 'एसआयआर'च्याविरोधातील वक्तव्यांमध्ये राहुल गांधींना साथ दिली आहे.

# 'एसआयआर' मुळे बांगलादेशींचा पळ

**कोलकाता, १९ नोव्हेंबर**

दक्षिण बंगालच्या भारत- बांगलादेश सीमेवरून बांगलादेशींनी पळ काढण्याचे प्रमाण मागील काही आठवड्यांपासून मोठ्या प्रमाणात वाढले आहे. येथे निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या एसआयआर प्रक्रियेसोबत त्याचा संबंध जोडला जात आहे, असे सीमा सुरक्षा दलाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. उत्तर २४ परगणा आणि मालदा जिल्ह्यासारख्या कुंपण नसलेल्या सीमाभागांतून दस्तावेज नसलेल्या बांगलादेशींचे घरी परतण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मागील दोन वर्षांच्या तुलनेत हे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असल्याचे बीएसएफ अधिकाऱ्याने सांगितले.

पूर्वी बांगलादेशात परतणाऱ्या बांगलादेशींचे प्रमाण दुहेरी आकड्यात असायचे. हे प्रमाण दररोज वाढत असून, आता ते तिहेरी आकड्यापर्यंत पोहोचले असल्याचे बीएसएफ अधिकाऱ्याने सांगितले. बेकायदेशीररीत्या सीमा ओलांडताना कुणी पकडला गेल्यास, तो मजूर असेल आणि घरी परतत असेल, असे आम्ही गृहित धरू शकत नाही. कदाचित ते गुन्हा करून पळ काढण्याचा प्रयत्न करीत असतील किंवा कट्टरवादी अथवा दहशतवादाशी संबंधित असतील आणि पळ काढायचा प्रयत्न करीत असतील, असे होणे शक्य असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. त्यांची बायोमेट्रिक माहिती उपलब्ध डेटात तपासली जाते आणि तपासकर्त्यांना कोणतीही आक्षेपार्ह गोष्ट आढळल्यास त्याच्या तपासात पोलिस सहभागी होतात. कुणी गुन्हेगारी कारवायांतील आढळल्यास त्याला राज्य पोलिसांच्या हवाली केले जाते. पण, त्यांच्याकडे दस्तावेज नसतील आणि त्यांना परतण्याची इच्छा असल्यास आम्हाला बॉर्डर गार्ड्स बांगलादेशसोबत (बीजीबी) संपर्क साधून मानक प्रक्रिया पूर्ण करावी लागते. बीजीबीने स्वीकारल्यास त्यांना औपचारिकपणे परत पाठवले जाते, अन्यथा वेगळी प्रक्रिया करावी लागते, असे बीएसएफच्या अधिकाऱ्याने सांगितले.

# 'नेपोटिझम'मुळे निवडणुकीत सामान्यांना नाही संधी



**प्रशांत माने**
मो.९८८११९१४४३

देश स्वतंत्र झाल्यानंतर स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशातील अनेक दिग्गजांची संस्थाने खालसा केली. पण ७८ वर्षांचा कालावधी लोटल्यानंतरही राजकारणात प्रस्थापित झालेल्या घराणेशाही म्हणजेच नेपोटिझमला मोडीत काढण्यात यश येत नसल्याची शोकांतिका आहे. एक तर राजकारणाचा घसरलेला दर्जा आणि बदलत्या राजकारणामुळे सर्वसामान्य कोणीही राजकारणाकडे वळत नसल्याचे कटूसत्य आहे. राजकारणात चांगल्या लोकांनी आले पाहिजे असे गोंडस वाक्य सातत्याने चर्चीले जाते, वास्तव मात्र यापेक्षा खूपच उलटे आहे. कारण निवडणुकांचा एकूणच इतिहास पाहता निवडणुकीसाठी धाडसाने उभारलेल्या उच्चशिक्षित, सभ्य लोकांना मतदारदेखील नाकारतात हे दिसून आलेले आहे. अपवाद वगळता अनेक आयएएस, आयपीसए, डॉक्टर, वकील, पत्रकारांसह समाजातील अनेक प्रतिष्ठांना निवडणुकीत परावभ स्वीकारावा लागल्याची वस्तुस्थिती आहे. अलीकडच्या काळात तर महाराष्ट्राचेच काय पण देशाचेही राजकारण वेगळ्याच वळणावर जात असल्याचे चित्र आहे. त्यामुळे सामान्य माणूस निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचे धाडसदेखील करत नाही. याला कारण म्हणजे लोकशाहीत निर्माण झालेली आजची राजकीय व्यवस्था होय.



सोलापूर जिल्ह्याचेच उदाहरण घ्यावयाचे झाल्यास जिल्ह्यातील ११ तालुक्यांची ओळख ही तालुक्यांच्या नावाने नव्हे तर तेथील राजकीय घराण्यांच्या नावाने होते, ही वस्तुस्थिती आहे. माळशिरस मोहिते-पाटील, करमाळा बागल, जगताप, पाटील, माढा शिंदे बंधू, साठे, पंढरपूर परिचारक, पाटील, भालके, मंगळवेढा आवताडे, मोहोळ राजन पाटील, बार्शी सोपल-राऊत-बारबोले, अक्कलकोट म्हेत्रे, पाटील, कल्याणशेट्टी, तानवडे, दक्षिण सोलापूर शिवदारे, देवकते, देशमुख, माने, हसापुरे अशी नावे जिल्ह्यातील तालुक्यांसाठी आवर्जुन चर्चीली जातात. तर सोलापूर शहरात सुशीलकुमार शिंदे, प्रणिती शिंदे, विजयकुमार देशमुख, कोठे, चाकोते, आडम अशी नावे लोक आवर्जुन घेतात. सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या राजकारणात ही राजकीय घराणी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने कार्यरत आहेत. सोलापूरची सत्ता यातीलच कोण्या घराणेशाहीच्या हातात असते. विशेष म्हणजे राजकीय पक्ष देखील या घराण्यांशिवाय कोणा इतरांना संधी देताना दिसत नाही. कारण निवडणुकीत जिंकणारा हा एकच महत्वाचा निकष राजकीय पक्षांसाठी गरजेचा असतो. साम, दाम, दंड, भेद यात माहिर असलेला असेल तर राजकीय पक्ष अशांना प्राधान्य देताना दिसतात. सध्या सुरु असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीतील उमेदवार पाहिले तर फक्त अन् फक्त नेपोटिझमच दिसून येते. मेरे बाद मेरा बच्चा हे केवळ एकच श्लोगन सध्याच्या राजकारणात तंतोतंत लागू पडत असल्याचे चित्र आहे. मग सामान्यांना कोण विचारते. सामान्यांनी निवडणुकीत उभे राहण्याचा विचार करणे देखील प्रचंड अवघड झाल्याचे एकूण चित्र आहे. निवडणुक आयोगाने ठरवून दिलेल्या खर्च मर्यादेला राजरोसपणे हरताळ फासला जातो, हे सर्वश्रृत आहे. परंतु कोणीही काहीही करू शकत नसल्याची शोकांतिका आहे. वाढती महागाई, प्रपंच-संसाराचा गाढा हाकण्यात वाकलेला सामान्य माणूस निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचा विचार करण्याच्यादेखील पलिकडचा आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे सामान्यांना मिळालेला केवळ एकमेव अधिकार म्हणजे मतदानाचा होय. परंतु मतदार याद्यातील घोळांमुळे सामान्यांचा हा अधिकार देखील हिरावला जातो की, काय अशी टांगती तलवार सामान्यांवर आहे. एकूणच काय तर देशातील संस्थाने खालसा झाली पण राजकारणातील घराणेशाही संपुष्टात येण्याबाबत साशंकताच आहे. कारण काही अपवाद वगळता प्रत्येक राजकारण्यांना सत्तेचा मोह सोडवत नाही. पैशातून सत्ता आणि सत्तेतून पैसा या यशस्वी फंड्यामुळे आपल्या पुढच्या पिढ्यांचाच राजकारणावर हक्क असल्यासारखा प्रकार सध्या राजकारणात सुरु आहे. ब्रिटीश गेले अन् देश स्वातंत्र्य झाला खरा पण घराणेशाहीच्या जाचातून सामान्यांना स्वातंत्र्य कधी मिळणार, हे मात्र धाडसाने कोणी सांगू शकेल असे वाटत नाही.

# आंध्रात आणखी सात माओवादी ठार

**अमरावती, १९ नोव्हेंबर**

आंध्रप्रदेशच्या मेरेदुमिल्ली येथे हिडमासह सहा माओवाद्यांचा खात्मा केल्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे बुधवारी परिसरात झालेल्या चकमकीत पोलिसांनी आणखी सात माओवाद्यांना चकमकीत ठार केले. यात तीन महिलांचा समावेश आहे, अशी माहिती आंध्रप्रदेशचे अतिरिक्त पोलिस महासंचालक (गुप्तचर) महेशचंद्र लड्डा यांनी येथे दिली.

मंगळवारची मोहीम सुरू ठेवताना जवानांनी आज झडलेल्या चकमकीत सात माओवाद्यांना ठार केल्याची माहिती चकमकस्थळावरून आली आहे, असे लड्डा यांनी सांगितले. मंगळवारी झालेल्या चकमकीच्या ठिकाणापासून जवळपास सात किमी अंतरावर आज चकमक झडली. अल्लुरी सीतारामराजू जिल्ह्यातील मेरेदुमिल्ली येथे सकाळी सात वाजता ही चकमक झडल्याची माहिती त्यांनी दिली. ठार झालेल्या माओवाद्यांत मेतुरी जोगा राव उर्फ टेक शंकर, ज्योती उर्फ सरिता, सुरेश उर्फ रमेश, लोकेश उर्फ गणेश, सैनू उर्फ वासू, अनिता आणि शम्मीचा समावेश आहे.

### तीन महिलांचा समावेश, शस्त्रे जप्त



माओवाद्यांकडून जप्त केलेली शस्त्रे

शंकर हा मूळचा श्रीकाकुलमचा रहिवासी असून, तो आंध्र-ओडिशा सीमा समितीचा प्रभारी होता. शस्त्रास्त्र उत्पादन आणि दळणवळण यासारख्या तांत्रिक बाबींमधील तो तज्ज्ञ होता, अशी निमलष्करी दलाने माहिती दिल्याचे लड्डा म्हणाले.

**विविध जिल्ह्यांत कारवाई; ५० माओवाद्यांना अटक**

गुप्तचर यंत्रणांनी दिलेल्या माहितीच्या आधारे आंध्रप्रदेश पोलिसांनी बुधवारी पाच जिल्ह्यांत समन्वयित कारवाई करीत ५० माओवाद्यांना अटक केली. अटक केलेल्या माओवाद्यांमध्ये दक्षिण बस्तर-दंडकारण्य परिसरातील विशेष क्षेत्रीय समिती, विभागीय समिती, एरिआ कमिटी आणि संघटनेच्या नियमित सदस्यांचा समावेश आहे. सुरक्षा दलाच्या वाढत्या दबावामुळे सुकमा, बिजापूर, नारायणपूर आणि पश्चिम बस्तरमधून कित्येक माओवाद्यांनी पळ काढला आहे. (वृत्तसंस्था)

### महत्त्वपूर्ण नेते अडकले

या कारवाईत माओवाद्यांची नेतृत्वफळी कोसळली असल्याची माहिती लड्डा यांनी दिली. अटक केलेल्यांत विशेष क्षेत्रीय समितीचे तीन आणि विभागीय समितीच्या काही माओवाद्यांचा समावेश असल्याचे लड्डा यांनी सांगितले. पोलिसांनी विविध जिल्ह्यांत केलेल्या कारवाईत ३८ शस्त्रे, ३०२ काडतुसे, डेटोनेटर्स, कॉर्डेक्स वायर, संचार उपकरणे आणि १३ लाख रुपयांची रोकड जप्त केली.



बिहारमध्ये नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत गायिका मैथिली ठाकूर आमदार म्हणून निवडून आली आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते रविशंकर प्रसाद यांची मैथिलीने बुधवारी भेट घेतली तो क्षण.

# मणिपूरमध्ये तीन बंडखोरांना अटक

**इम्फाळ** : मणिपूरमधील दोन जिल्ह्यांमधून विविध प्रतिबंधित संघटनांशी संबंधित तीन बंडखोरांना अटक करण्यात आली, असे पोलिसांनी बुधवारी सांगितले. मंगळवारी बिष्णुपूर जिल्ह्यातील मालोम मखा लीकाई भागातून बंदी घातलेल्या पीपल्स लिबरेशन आर्मीच्या एका सक्रिय कॅडरला अटक करण्यात आली आणि त्याच्या ताब्यातून ३.२५ लाख रुपयांची बेहिशेबी रोकड जप्त करण्यात आली, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. जिल्ह्यातील केबुल अवांग थाना लीरक येथील त्याच्या निवासस्थानावरूनही संघटनेच्या आणखी एका सदस्याला अटक करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील लंगोल हाऊसिंग कॉम्प्लेक्समधील भाड्याच्या घरातून बंदी घातलेल्या कांगलेईपाक कम्युनिस्ट पार्टीच्या एका कॅडरला अटक करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, मंगळवारी सुरक्षा दलांनी बिष्णुपूर जिल्ह्यातील नाचौ खा मामांग पॅटन भागातून शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ्याचा साठा जप्त केला.

# भारताने माझ्या आईचे प्राण वाचवले; तिला बांगलादेशला सोपवणार नाही

## शेख हसीनाच्या मुलाला पूर्ण विश्वास

**नवी दिल्ली, १९ नोव्हेंबर**

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे पुत्र सजीब वाजेद जॉय यांनी ढाकाच्या प्रत्यार्पणाच्या विनंतीवर जोरदार टीका केली असून त्यांच्या आईविरुद्ध सुरू असलेल्या न्यायालयीन प्रक्रियेला बेकायदेशीर म्हटले आहे. सजीब वाजेद यांनी दावा केला आहे की बांगलादेशमध्ये शेख हसीना यांच्या जीवाला गंभीर धोका आहे आणि भारताने त्यांचे प्राण वाचवले आहेत. बांगलादेश सरकारच्या प्रत्यार्पणाच्या विनंतीला बेकायदेशीर म्हणत वाजेद म्हणाले की भारत त्यावर कोणतीही कारवाई करणार नाही.





भारतीय लोकशाही आणि कायद्याच्या राज्यावर पूर्ण विश्वास व्यक्त करत वाजेद म्हणाले की नवी दिल्ली अशा बेकायदेशीर विनंतीकडे दुर्लक्ष करेल.

भारतात आश्रय दिल्यानंतर एएनआयला दिलेल्या मुलाखतीत सजीब म्हणाले की ऑगस्ट २०२४ मध्ये हसीनाला भारतात आणले तेव्हा कट्टरपंथी गटांनी आधीच हसीनाला मारण्याची योजना आखली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानताना ते म्हणाले, भारताने माझ्या आईचे प्राण वाचवले. जर ती बांगलादेशात राहिली असती तर तिला ठार मारले असते.

सजीबने १७ न्यायाधीशांना काढून टाकणारी विद्यमान न्यायालयीन प्रक्रिया बनावट असल्याचे म्हटले आणि बांगलादेशने पाठवलेल्या प्रत्यार्पणाच्या विनंतीला कोणत्याही प्रकारे वैध म्हणू नये, असेही नमूद केले. त्यांनी गंभीर आरोप केले की, खटल्यापूर्वी १७ न्यायाधीशांना काढून टाकण्यात आले, संसदीय मंजुरीशिवाय कायदे दुरुस्त करण्यात आले आणि बचाव पक्षाच्या वकिलांना न्यायालयात प्रवेश दिला गेला नाही. जेव्हा न्यायालयीन प्रक्रिया अस्तित्वात नसते तेव्हा जगातील कोणताही देश प्रत्यार्पण स्वीकारणार नाही. (वृत्तसंस्था)

### हा 'राजकीय उठाव' होता, जनआंदोलन नव्हे

जुलै २०२४ मध्ये झालेल्या निदर्शनांबद्दल, सजीबने कबूल केले की त्यांच्या सरकारने सुरुवातीला परिस्थिती हाताळण्यात चुका केल्या, परंतु त्यांनी या चळवळीचे वर्णन एक संघटित राजकीय उठाव म्हणून केले, उत्स्फूर्त सार्वजनिक संताप नाही. हसीनाच्या मुलाने दावा केला की अंतरिम युनूस सरकारने त्यांच्या कार्यकाळात दोषी ठरलेल्या हजारो दहशतवाद्यांना सोडले. त्यांनी आरोप केला की लष्कर-ए-तोयबा बांगलादेशात उघडपणे कार्यरत आहे आणि त्यांचे स्थानिक नेटवर्क भारतातील अलिकडच्या हल्ल्यांशी जोडलेले आहे.

# देशात दर आठव्या मिनिटाला बेपत्ता होतेय् एक मूल

## सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केली चिंता

**नवी दिल्ली, १९ नोव्हेंबर**

देशात दर आठ मिनिटांनी एक मूल बेपत्ता होत असल्याचा दावा करणाऱ्या वृत्तावर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी चिंता व्यक्त केली. न्यायालयाने हा गंभीर मुद्दा असल्याचे सांगितले आहे. देशातील दत्तक प्रक्रिया गुंतागुंतीची आहे आणि केंद्राला ही प्रणाली सोपी करण्यास सांगितले, असे न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने या प्रकरणात म्हटले आहे.

देशात दर आठ मिनिटांनी एक मूल बेपत्ता होत असल्याचे वर्तमानपत्रात वाचले. हे खरे आहे की नाही माहीत नाही; मात्र ही एक गंभीर समस्या आहे, असे नागरत्ना म्हणाले. मूल दत्तक घेण्याची प्रक्रिया कठोर असल्यामुळे त्याचे उल्लंघन होते. लोक मूल मिळविण्यासाठी बेकायदेशीर मार्गांचा अवलंब करतात. सुनावणीदरम्यान केंद्र सरकारने प्रतिनिधित्व करणाऱ्या सहायक महान्यायाभिकर्ता ऐश्वर्या भाटी यांनी बेपत्ता मुलांची प्रकरणे हाताळण्यासाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्यासाठी सहा आठवड्यांचा वेळ मागितला. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने सहा आठवड्यांचा वेळ देण्यास नकार दिला आणि एएसजीला ९ डिसेंबरपर्यंत प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

१४ ऑक्टोबरला खंडपीठाने केंद्र सरकारला सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना बेपत्ता मुलांची प्रकरणे हाताळण्यासाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्याचे निर्देश दिले होते. महिला आणि बाल विकास मंत्रालयाद्वारे चालवल्या जाणाऱ्या मिशन वात्सल्य पोर्टवर प्रकाशित करण्यासाठी त्यांची नावे आणि संपर्क तपशील द्यावा. जेव्हा जेव्हा पोर्टलवर मुलाच्या हरवण्याची तक्रार येते तेव्हा ती माहिती संबंधित नोडल अधिकाऱ्यांना कळवावी, असे निर्देश देण्यात आले होते.

सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी केंद्राला हरवलेल्या मुलांचा शोध घेण्यासाठी आणि अशा प्रकरणांची चौकशी करण्यासाठी गृह मंत्रालयाच्या अंतर्गत एक विशेष ऑनलाईन पोर्टल तयार करण्यास सांगितले होते. हरवलेल्या मुलांचा शोध घेण्याचे काम करणाऱ्या देशभरातील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील पोलिस अधिकाऱ्यांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. पोर्टलवर प्रत्येक राज्यातील एक समर्पित अधिकारी असू शकतो, जो हरवलेल्या व्यक्तींच्या तक्रारींची जबाबदारीदेखील घेऊ शकतो, असे न्यायालयाने म्हटले होते. (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# नक्षल चळवळीच्या अखेरच्या घटका

२०१० मध्ये दंतेवाड्यात झालेल्या माओवाद्यांच्या हल्ल्यात ७६ जवान हुतात्मा झाले होते. २०१३ मध्ये झिरम खोऱ्यातील भ्याड हल्ल्यात काँगेसचे वरिष्ठ नेते विद्याचरण शुक्ला, नंदकुमार पाटील यांच्यासह २७ जणांचा मृत्यू झाला होता. २०१७ मध्ये छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यातील चकमकीत 'सीआरपीएफ'च्या २५ जवानांना हौतात्म्य आले; तर २०२१ मध्ये टकुलगुडम येथे नक्षलवाद्यांच्या गुरिल्ला पद्धतीने केलेल्या हल्ल्यात २५ जवान वीरगतीस प्राप्त झाले. अगदी अलिकडे म्हणजे गेल्या मार्च महिन्यात छत्तीसगडमधील राणीबोधली येथील हल्ल्यात ५५ सैनिक हुतात्मा झाले. सुमारे पाचशेहून अधिक जवानांच्या मृत्यूस कारणीभूत असलेला अत्यंत जहाल माओवादी माडवी हिडमा यास मंगळवारी, १८ नोव्हेंबरला सुरक्षा रक्षकांनी कंठस्नान घातले. या चकमकीत हिडमाची पत्नी राजक्का हिच्यासह अन्य सहा नक्षलवादीही ठार झालेत. सर्वाधिक आक्रमक आणि अत्यंत निष्ठुर मानल्या जाणाऱ्या बटालियन एकचा तो प्रमुख होता. त्याच्यावर तब्बल सहा कोटींचे बक्षीस होते. नक्षलवादी चळवळीतल्या सर्वांत क्रूर चेहऱ्याचा अंत ही नक्षलविरोधी लढ्यातील छोटीशी घटना नाही. या घटनेच्या दुसऱ्याच दिवशी मेरेदुमिल्ली येथून ७ किमी. अंतरावर चकमक होऊन ३ महिलांसह ७ नक्षली ठार झाले. आपल्या सुरक्षा जवानांचे ते मोठे यश तर आहेच, शिवाय माओवादी चळवळीवर अखेरचे घाव घातले घालण्याच्या प्रयत्नांना यश मिळत असल्याचे शुभसंकेतही आहेत. २१ मे २०२५ रोजी छत्तीसगडच्या बस्तर भागात झालेल्या चकमकीत माओवाद्यांचा तत्कालीन सर्वोच्च नेता बसवराजू यासह २७ माओवाद्यांचा खात्मा केला गेला होता. त्याचा परिणाम म्हणून ६ जूनला १२ माओवाद्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत गडचिरोली येथे आत्मसमर्पण केले. लगेच १८ जूनला आंध्र प्रदेशातील अल्लुरी सीतारामराजू जिल्ह्यातल्या चकमकीत माओवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य गजरला रवी ठार झाला. धास्तावलेला जहाल माओवादी व केंद्रीय समितीचा सदस्य असलेल्या भूपतीने ३ ऑक्टोबरला सशस्त्र लढा थांबविण्याची भूमिका जाहीर केली. पुढे त्याने १५ ऑक्टोबरला ६१ माओवाद्यांसह आत्मसमर्पणही केले. माओवाद्यांच्या सशस्त्र चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या अनेकांचे श्वास आता कंठाशी आले आहेत. एक तर शरण या किंवा संपून जा, असे दोनच पर्याय त्यांच्यासमोर आहेत. एकेकाळी चाळीसच्या वर सदस्य असलेल्या माओवाद्यांच्या केंद्रीय समितीत या घडीला केवळ सहाच सदस्य उरले असल्याची माहितीही पुढे येत आहे. याचा अर्थ असा की, नक्षल्यांची चळवळ पार खिळखिळी झाली आहे आणि ती आता शेवटच्या घटका मोजत आहे. आंध्र प्रदेशातील अल्लुरी सीतारामराजू जिल्ह्यात माडवी हिडमा आणि त्याच्या पत्नीचा झालेला खात्मा ही नेहमीची नक्षलविरोधी कारवाई नव्हती. केंद्र सरकारने 'शून्य सहनशीलता' (झीरो टॉलरन्स) या धोरणातून सुरू केलेल्या नक्षलविरोधी मोहिमेचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. यापूर्वी बसवराजूचा खात्मा आणि 'टॉप कमांडर' भूपतीने त्याच्या सहकाऱ्यांसह केलेले आत्मसमर्पण हेसुद्धा याच धोरणानुसार टाकले गेलेले महत्त्वाचे आणि दमदार पाऊल होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मार्च २०२६ पर्यंत देशाला नक्षलमुक्त करण्याचा जो संकल्प जाहीर केला आहे, त्यादृष्टीने या साऱ्या घटना, 'ठरवले तर काहीही करता येते' या अदम्य इच्छाशक्तीची साक्ष देणाऱ्या ठरतात. अशी इच्छाशक्ती काँगेसच्या काळात कधीही दिसत नव्हती. परंतु, केंद्र सरकारने राज्य सरकारांना सोबत घेऊन गंभीरपणे नक्षलवादी चळवळीच्या निर्मूलनाचा अजेंडाच राबवण्यास सुरुवात केली आहे आणि ठोस व यशस्वी कारवाया सुरू आहेत.

भारतात नक्षलवाद केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न नाही. आदिवासी भागाच्या विकासाकडे झालेले दुर्लक्ष आणि सामाजिक विषमतेतून जन्मलेली ती गुंतागुंतीची समस्या आहे. माओवादी चळवळीचा अंत यापूर्वी कधीही दृष्टिपथात आला नाही, त्याचे कारण ही गुंतागुंत होय. अशा हिंसक चळवळी संपवण्यासाठी अनेक आघाड्यांवर एकत्रित, सुसंगत आणि सातत्यपूर्ण काम करावे लागते. विद्यमान सरकारने धोरणात्मक सक्रियता दाखविल्याने या चळवळीच्या अंताची चाहूल लागली आहे. नक्षलवादाची मूळ ताकद त्यांचे वरिष्ठ नेतृत्व आणि भौगोलिक बालेकिल्ल्यात होती. बसवराजू, विवेक दा व हिडमा यांसारख्या प्रमुख नेत्यांचा अंत म्हणजे माओवादी चळवळीच्या वैचारिक, धोरणात्मक आणि लष्करी नेतृत्वाचा कणा मोडण्यासारखे आहे. २०१९ पासून राबविण्यात येत असलेल्या विशेष रणनीतीनुसार, देशाच्या सुरक्षादलांनी छत्तीसगड-झारखंड सीमेवरील बुढा पहाड आणि बिहारच्या चक्रबांध यासारख्या अतिदुर्गम नक्षली बालेकिल्ल्यांत कायमस्वरूपी छावण्या उभारल्या. त्यामुळे नक्षलवाद्यांचे आश्रयस्थान हिरावले गेले. गृह मंत्रालयाच्या माहितीनुसार, २०१० मध्ये तब्बल ९६ जिल्ह्यांमध्ये असलेला नक्षलवादाचा प्रभाव आता ४५ जिल्ह्यांपर्यंत संकुचित झालेला आहे. हा नक्षलविरोधी अभियानाचा विजय आहे. माओवादी चळवळ खिळखिळी करण्यासाठी नक्षलविरोधी सशस्त्र कारवायांसोबतच विकासाचा व सुसंवादाचा मार्ग प्रशस्त करणे हे सरकारचे मोठे यश मानले पाहिजे. सरकारने आकर्षक पुनर्वसन योजना लागू केल्या. नक्षलवाद्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधण्यासाठी 'नवजीवन'सारख्या योजना राबवली. याच योजनेंतर्गत हिडमाच्या पूर्वती गावाला भेट देऊन त्याची आई माडवी पोज्जे यांच्याशी संवाद साधला गेला होता. आईनेही हिडमाला आत्मसमर्पण करण्याचे आवाहन केले होते. पण त्याने मनावर घेतले नाही. शेवटी त्याचा अंत झाला. भूपतीने आपल्या सहकाऱ्यांसह केलेले आत्मसमर्पण हे सरकारच्या धोरणाचे मोठे फलितच आहे. संघर्ष नव्हे, तर संवाद हाच पर्याय आहे, हे एका 'टॉप कमांडर'ने मान्य करणे, हा माओवादी चळवळीच्या वैचारिक बैठकीला धक्का लागल्याचे द्योतक आहे. एकीकडे आपल्या तत्त्वज्ञानाच्या पराभवाने अस्वस्थता येणे आणि दुसरीकडे आपल्या नेत्यांचा अंत पाहणे ही बाब नक्षल्यांसाठी असह्य झालेली आहे. एकट्या गडचिरोली जिल्ह्यात गेल्या दोन दशकात ७०० हून अधिक नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. आता नक्षलग्रस्त भागात रस्ते, पूल आणि भ्रमणध्वनीचे मनोरे, रोजगाराच्या व्यवस्था उभारल्या जात आहेत. तसेच स्थानिक जनतेचा मुख्य प्रवाहाशी संपर्क वाढला आहे. आदिवासी दुर्गम भागात ग्रामपंचायत निवडणुकीसारख्या लोकशाही प्रक्रियेत लोकांचा सहभाग वाढणे, त्यांना मूलभूत सुविधा मिळणे आणि उद्योगांना प्रोत्साहन मिळणे या साऱ्या बदलांमुळे कथित 'शोषणविरोधी लढाई'च्या नक्षलवाद्यांच्या दाव्याची धार आता पार बोथट झाली आहे.

नक्षलवादी संघटना भारतीय संविधान आणि लोकशाही मानत नाहीत. त्यांचा उद्देश संसदीय लोकशाही उलथून पाडणे हा आहे. भारतासारख्या सार्वभौम लोकतांत्रिक राष्ट्रात हिंसेच्या बळावर राजकीय-प्रशासकीय व्यवस्था बदलण्याची किंवा नवी व्यवस्था लादण्याची मुभा दिली जाऊ शकत नाही. त्यामुळे आपले सार्वभौमत्व प्रश्नांकित होते. सरकारतर्फे नक्षल्यांच्या बाबतीत झीरो टॉलरन्सचे जे धोरण राबविले जात आहे, ते भारतात संविधानाचे आणि कायद्याचे राज्य आहे, हेच सिद्ध करण्यासाठी आहे. नक्षल्यांचा निःपात होणे हे लोकशाहीसाठी, संविधानासाठी आणि भारताच्या अखंडतेसाठी देखील महत्त्वाचे आहे. हिडमासारख्या म्होरक्याचा खात्मा हे नक्षलविरोधी लढ्यातील मोठे यश असले तरी लढाई अद्याप शिल्लक आहे. जंगलातील नक्षलवादाची ताकद कमी होत असतानाच शहरी नक्षलवादाचा धोका वाढला आहे. बुद्धिजीवी वर्तुळात घुसून 'फेक नॅरेटिव्ह' पसरवण्याचा नक्षलप्रेमींचे प्रयत्न वाढले आहेत. या पांढरपेशा 'स्लिपर सेल'वर कठोर कारवाई करणे आणि त्यांच्या विचारांचा प्रसार थांबवणे देखील नक्षलविरोधी लढ्यातील महत्त्वाचा भाग आहे. नक्षलवादाविरुद्धच्या लढाईचा अंतिम टप्पा केवळ जहाल माओवाद्यांचा खात्मा करणे किंवा त्यांना शरण आणणे एवढाच नाही. नक्षलवाद फोफावण्यासाठी कारण ठरलेल्या समस्यांचे निर्मूलन, शहरी भागांतील नक्षलप्रेमींच्या मुसक्या आवळणे आणि जंगलातल्या नक्षल्यांना संपविणे अशा सर्व आघाड्यांवर काम करावे लागेल. सुदैवाने तिन्ही आघाड्यांवर काम सुरू झालेले आहे. समस्त भारतीयांनी नक्षलविरोधी कारवाईतील त्यांचे योगदान म्हणून सरकारच्या या प्रयत्नांना पाठिंबा तेवढा द्यावा एवढेच. बाकीचे काम सरकारी यंत्रणा करीत आहेतच.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# स्वागतार्ह ऑस्ट्रेलियन पायंडा

इंटरनेटवरील सोशल मीडिया जगभरातील नागरिकांच्या आयुष्यातील आणि समाजातील एक महत्त्वपूर्ण माध्यम बनला आहे. सोशल नेटवर्किंग हा इंटरनेटच्या महाजालातील परवलीचा शब्द आहे. सोशल मीडियावर असणे आत्ताच्या काळाची अनिवार्य गरज झाली आहे. तिथे नसणे हे काळाबरोबर नसल्याचे लक्षण मानले जाते. सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेकांना लोकांपर्यंत आपले विचार, मते, माहिती पोहोचवण्याचा एक नवा मार्ग पुढे आला आहे. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हा मुला-मुलींच्या आयुष्यात अगदी सहज समाविष्ट झाला आहे. त्यांना दिवसातले अनेक तास स्मार्टफोन, ॲप्स, सोशल नेटवर्कवर घालवायचे झाले आहेत. हे व्यासपीठ अनेक फायदे देते. संवाद, कल्पनाशक्ती, ज्ञान, सृजनात्मकता वाढीस लागते, पण त्याच वेळी काही धोकेही आहेत. वेळेची उलाढाल, मानसिक आरोग्यावर परिणाम, गोपनीयतेचा प्रश्न, सायबरबुलिंग, चुकीची माहिती इत्यादी. अशा स्थितीत मुलांना किती वर्षाचे झाल्यावर सोशल मीडिया वापरण्याची परवानगी द्यावी, हा एक मोठा सामाजिक-नीतिबद्ध प्रश्न बनला आहे. ऑस्ट्रेलिया सरकारने या पृष्ठभूमीवर मध्यंतरी एक अभिनव पण वादग्रस्त पाऊल उचलले. १६ वर्षाखालील मुलांना सोशल मीडियावर खाते उघडण्यास किंवा ठेवण्यास रोखणे किंवा त्यांना खाते मिळण्यापूर्वी थांबवणे, असा हा कायदा आहे. थोडक्यात सांगायचे तर, ऑस्ट्रेलियाच्या सरकारने जाहीर केले आहे की, १६ वर्षांखालील मुलांनी सोशल मीडियावर खाते उघडणे किंवा कार्यरत राहणे टाळावे. यासाठी संबंधित सोशल मीडिया कंपन्यांवर वयाची खात्री करण्याची जबाबदारी टाकण्यात आली आहे. त्यांनी नियम न पाळल्यास मोठ्या दंडाची कारवाई केली जाणार आहे.

या कायद्यामागील भूमिका चर्चेत येऊन गेला काही काळ अनेक मतमतांतरे समोर येत राहिली. या कायद्याचा उद्देश म्हणजे अल्पवयीन मुलांना सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे होणाऱ्या मानसिक आणि सामाजिक नुकसानापासून वाचवावे. सरकारचे मत आहे की, या वयात मुलांनी आभासी जगात हरवण्यापेक्षा वास्तव जगातले अनुभव, शिक्षण आणि प्रत्यक्ष संवादावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. अशी बंदी घालण्यामागे अनेक कारणे देण्यात आली आहेत. सोशल मीडियाचा मुलांच्या मानसिक आरोग्यावर होणारा नकारात्मक प्रभाव हा या बंदीमागील सर्वांत मोठ्या कारणांपैकी एक मुद्दा आहे. सायबर बुलिंग, ऑनलाईन शोषण आणि तुलना करण्याची मानसिकता यासारख्या समस्यांमुळे मुले मानसिक तणावाचा सामना करतात, असे मत मांडले गेले आहे. सोशल मीडियाचे व्यसन ही एक गंभीर समस्या बनत चालली आहे. मुले तासन्‌तास स्मार्टफोनवर



घालवतात. त्यामुळे शैक्षणिक कामगिरी आणि सामाजिक संबंध प्रभावित होतात. आणखी एक दखलपात्र मुद्दा म्हणजे सोशल मीडियावर खोट्या माहितीचा प्रसार होण्याची शक्यता अधिक असते. मुले या खोट्या माहितीवर विश्वास ठेवतात. त्याचा त्यांच्या विचारांवर परिणाम होतो. शिवाय सोशल मीडियावर गोपनीयता राखणे कठीण असते. मुलांची वैयक्तिक माहिती चोरली जाण्याचा धोका असतो. त्यामुळे बेसावध राहून मुले एखाद्या अडचणीत सापडू शकतात.

असे असले तरी, बंदी घालणे कितपत व्यवहार्य आहे, असाही मुद्दा उपस्थित केला जात आहे. वस्तुतः कुठलीही बंदी कधीही प्रभावी ठरत नसते, असे म्हटले जाते. त्या पृष्ठभूमीवर या मुद्द्याची दुसरी बाजू समजून घेणेही आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे सोशल मीडियाचा वापर मोबाईल ॲप तसेच संगणकावरील सॉफ्टवेअरद्वारे होतो. काही सोशल मीडिया सॉफ्टवेअरवर बंदी घालणे म्हणजे 'प्लेस्टोअर' वरून हटवणे, ब्राऊजरवरून हाताळणे, फायरवॉलमार्फत टाळणे हे करता येऊ शकते. मात्र असे झाल्यास याच धाटणीचे पण नवीन उत्पादन निर्माण होऊ शकते. त्याचे नामकरण आणि प्रकार थोडा वेगळा असू शकतो. पूर्वी काही देशांनी पोर्नोग्राफिक वेबसाईट्सवर बंदी आणली. मात्र काही काळातच वेगळ्या नावांनी अशा वेबसाईट्स पुन्हा सुरू झाल्या आणि बंदीचा फज्जा उडाला. असे काही ऑस्ट्रेलियात घडते का, हे पाहावे लागेल. या घडामोडी पाहता भारतासाठी काही धडे आणि उपाय असू शकतात का, असा प्रश्न उपस्थित होतो. भारत हा प्रचंड लोकसंख्येचा, विविध प्रकारची सामाजिक आणि आर्थिक पृष्ठभूमी असलेला देश आहे. त्यामुळे येथे ऑस्ट्रेलियासारखा थेट बंदीचा कायदा लागू करणे व्यवहार्य ठरणार नाही. परंतु या निर्णयातून काही महत्त्वाचे धडे नक्कीच घेता येतील. या संदर्भातला पहिला मुद्दा म्हणजे टप्प्याटप्प्याने मर्यादा घालता येतील. पूर्ण बंदी घालण्याऐवजी भारतात वयोगटानुसार मर्यादा लागू करता येतील. उदाहरणार्थ, १३ ते १६ वयोगटासाठी मर्यादित वापर, वेळेची अट, पालकांची संमती आणि सुरक्षिततेचे नियम ठेवता येतील.दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे डिजिटल शिक्षण आणि जागरूकता. यासाठी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये डिजिटल साक्षरतेचे शिक्षण देण्यात यावे. मुलांना सोशल मीडियाचा जबाबदारीने आणि सुरक्षितपणे वापर कसा करावा हे शिकवणे अत्यावश्यक आहे. पालक आणि शिक्षकांनाही या विषयावर प्रशिक्षण द्यावे. पालकांनी मुलांशी खुला संवाद ठेवावा, त्यांच्या ऑनलाईन क्रियाकलापांबद्दल माहिती ठेवावी आणि त्यांच्या वापरावर योग्य मर्यादा ठेवाव्यात. फक्त बंदी न घालता मुलांना समजावून सांगणे अधिक परिणामकारक ठरते. याखेरीज सरकारने सोशल मीडिया कंपन्यांवर अल्पवयीन वापरकर्त्यांच्या सुरक्षेसाठी कठोर नियम लावावेत. वयाची खात्री, सुरक्षित सामग्री आणि वापर करावयाच्या वेळेवर नियंत्रण या गोष्टी बंधनकारक कराव्यात. पूर्ण बंदीऐवजी दिवसातून ठरावीक वेळेसाठीच सोशल मीडियाचा वापर करण्याची मर्यादा ठेवणे हा अधिक वास्तववादी मार्ग ठरू शकतो.

भारतात या विषयाकडे पाहताना संतुलित दृष्टिकोन आवश्यक आहे. पूर्ण बंदी न लावता शिक्षण, जागरूकता, पालकांचा सहभाग आणि तांत्रिक नियंत्रण यावर भर द्यायला हवा. शेवटी मुलांचा डिजिटल प्रवास सुरक्षित, जबाबदार आणि सकारात्मक बनवणे ही फक्त सरकारची नव्हे, तर समाजातील प्रत्येक पालक, शिक्षक, आणि तंत्रज्ञान कंपनीची सामूहिक जबाबदारी आहे. अलिकडच्या काळात नेटवर्क चॅटमध्ये कर्मचारी फारच वेळ घालवतात असे दिसून आल्याने जगभरातील बहुतेक कार्यालयांमध्ये व्यक्तिगत रूपाने नेट वापरण्यास बंदी असते. अशा वेळी हे महाभाग ऑफिसची वेळ संपल्यानंतर घरी येऊन पुन: लॅपटॉप उघडून बसतात आणि कोणत्या तरी आभासी मित्रवर्तुळात मग्न होतात असे आढळून आले आहे . आपले दैनंदिन आयुष्य सोशल मीडियावर प्रकाशित करणे हा काहींचा छंद झाला आहे. अनेकांना 'ई व्यसनाधीन' बनवायचे काम त्यामुळे होत आहे. कुठलीही गोष्ट मर्यादित प्रमाणात मूल्य देते. सोशल मीडियाचेही असेच आहे. गरज असेल तरच ते वापरावे. मानव हा समाजशील प्राणी आहे. जात, धर्म, प्रांत, देश यांच्या सीमा ओलांडून मैत्रीचे बंध जोडणे, विचारांचे पूल बांधणे हे केवळ सोशल मीडियामुळेच शक्य होत आहे, हे कोणीही नाकारू शकणार नाही. पण त्याचा संयत, नियंत्रित आणि व्यापक सामाजिक हित डोळ्यांसमोर ठेवून वापर केला जाणे ही आवश्यक बाब आहे. आणि हे केवळ स्वयंशिस्तीच्या माध्यमातूनच शक्य आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# राहुल गांधींच्या नेतृत्वात पराभवाचे शतक!

२४३ सदस्यांच्या बिहार विधानसभा निवडणुकीत ६१ जागा लढवणाऱ्या काँग्रेसला फक्त ६ जागा जिंकता आल्या. काँग्रेसच्या विजयाचा स्ट्राईक रेट हा फक्त १० टक्के राहिला. असे करत काँग्रेसने २०१० मधील नीचांकी म्हणजे ४ जागा जिंकण्याचा आपला स्वत:चाच विक्रम मोडला. काँग्रेसच्या जागाच कमी झाल्या नाही तर मतांच्या टक्केवारीतही घट झाली आहे. देशातील सर्व राज्यातून काँग्रेस आपला जनाधार गमावत आहे. फक्त जनाधारच नाही तर आपले नेते आणि कार्यकर्तेही गमावत आहे. बुडत्या जहाजातून उंदीर बाहेर पडावे, तसे काँग्रेसचे अनेक नेते पक्ष सोडून जात आहेत.

बिहार विधानसभा निवडणुकीच्या आधी मतचोरीच्या मुद्यावरून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी रान पेटवले होते. निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करत बिहारमध्ये मतदार अधिकार यात्राही काढली होती. मात्र, जनतेने राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाचा मतचोरीचा आरोप फेटाळून लावला; त्यांना त्यांची जागा आणि लायकी दाखवून दिली. काँग्रेसने जिंकलेल्या ६ पैकी ३ जागा या अतिशय निसटत्या मतांनी जिंकल्या आहेत. १००-२०० मते इकडची-तिकडे झाली असती, या जागांवर काँग्रेसचा पराभव झाला असता. त्यामुळे काँग्रेसने प्रत्यक्षात ३ जागा जिंकल्या, असे म्हणावे लागेल.

राहुल गांधींना राजकारणात पदार्पण करून २१ वर्षे पूर्ण झाली आहेत, पण आपल्या २१ वर्षांच्या राजकीय कारकीर्दीत ते पक्षाला एकही मोठी निवडणूक जिंकून देऊ शकले नाहीत. या २१ वर्षांच्या कारकीर्दीत त्यांच्या नेतृत्वात लढलेल्या विविध राज्यांतील एकूण ९५ विधानसभा निवडणुकांत काँग्रेसला पराभवाचे तोंड पाहावे लागले. यात २०१४, २०१९ आणि २०२४ या तीन लोकसभा निवडणुकींचाही समावेश आहे. एवढेच नाही, तर राहुल गांधी यांचा स्वत:चाही २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत अमेठी मतदारसंघात पराभव झाला. त्यांनी राजकारणात पदार्पण केल्यानंतर २००४ आणि २००९ ची लोकसभा निवडणूक काँग्रेस पक्षाने जिंकली, पण या दोन निवडणुका जिंकण्याचे श्रेय राहुल गांधींना देता येणार नाही; ते काही प्रमाणात त्यांच्या मातोश्री सोनिया गांधी यांना द्यावे लागेल.



भाजपा नेते नरेंद्र मोदी यांचा देशाचे सर्वांत यशस्वी पंतप्रधान आणि अमित शाह यांचा सर्वांत यशस्वी गृहमंत्री असा उल्लेख करतात. त्याचप्रमाणे राहुल गांधी यांचा उल्लेख काँग्रेस पक्षाचे सर्वांत अपयशी नेते, असा करावा लागेल. २०२६ आणि २०२७ मध्ये देशातील किमान आठ-दहा राज्यांत विधानसभा निवडणुका होणार आहेत. यातील एकाही राज्यात काँग्रेसच्या विजयाची शक्यता नाही; उलट पराभवाचीच खात्री आहे. तसे झाले तर राहुल गांधी यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्ष आपल्या पराभवाचे शतक साजरे केल्याशिवाय राहणार नाही. कारण आतापर्यंत देशातील ९५ विधानसभा निवडणुकांत काँग्रेस पक्षाचा पराभव झाला आहे. आणखी पाच राज्यात काँग्रेसचा पराभव होणे फारसे कठीण नाही.

पंतप्रधान मोदी यांच्या बाबतीत जसे 'मोदी है तो मुमकिन है' असे म्हटले जाते, तसे काँग्रेस पक्षात राहुल गांधी यांच्याबाबतीत काहीच अशक्य नाही. याला त्यांचा राजकारणातील धरसोडपणा आणि सातत्य तसेच चिकाटीचा अभाव हे प्रमुख कारण आहे. मोदी आणि शाह यांचे राजकारण २४ बाय ३६५ दिवसांचे असते. म्हणजे वर्षातील ३६५ दिवस आणि दिवसातील २४ तास या दोघांच्या मनात पक्षाला निवडणुकीत कसे जिंकून द्यायचे, याचे विचार सुरू असतात. त्याप्रमाणे त्यांचे नियोजनही सुरू असते. हे दोन्ही नेते स्वत: तर रात्रंदिवस काम करतात, पण आपल्या पक्षाच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना कामाला लावतात.

एका राज्यात विजय मिळाल्यानंतर भाजपाचा फोकस निवडणुका होणार असलेल्या दुसऱ्या राज्यात वळलेला असतो. निवडणूक कशी लढवावी, त्यांचे नियोजन कसे करावे आणि ती कशी जिंकावी हे मोदी आणि शाह या दोन नेत्यांकडून शिकण्यासारखे आहे. याच्या उलट राहुल गांधी यांचे राजकारण लहरी आहे. त्यांचा मूड असेल तर ते पक्षाचे काम करतील, पदयात्रा काढतील, ढोर मेहनत करतील आणि मूड नसेल तर पक्षाला वाऱ्यावर सोडत परदेशात निघून जातील. जिंकणारी निवडणूक कशी हारावी, हे राहुल गांधी यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. आपल्या २१ वर्षांच्या राजकीय कारकीर्दीत राहुल गांधी नव्या एकाही राज्यात काँग्रेस पक्षाला सत्तेवर आणू शकले नाही; उलट सत्ता असलेल्या अनेक राज्यांतील काँग्रेसची सत्ता गमावली. अनेक राज्यांत काँग्रेस पक्षाला आपल्या पराभवाची मालिका तोडता आली नाही. विशेष म्हणजे देशातील या सर्व राज्यांत कधी काळी काँग्रेसची सत्ता होती. आता देशात काँग्रेस सत्तेवर असलेली राज्ये ही दुर्बीण घेऊन शोधावी लागत आहे. एका हाताची बोटेही जास्त होतील, एवढ्या म्हणजे कर्नाटक, तेलंगणा आणि हिमाचल प्रदेश या तीन राज्यांत सध्या काँग्रेसची सत्ता आहे. या राज्यातील काँग्रेसची सत्ताही शेवटचे आचके देत आहे. राहुल गांधी यांच्या नेतृत्वात काँग्रेसचा नुसता पराभवच नाही तर दारुण पराभव होत आहे. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षनेतेपद मिळेल, एवढ्या म्हणजे किमान १० टक्के जागाही काँग्रेस पक्ष जिंकू शकला नाही. कधीकाळी बिहार, गुजरात आणि उत्तरप्रदेश या राज्यात काँग्रेसची सत्ता होती. आता गेल्या २५ आणि ३० वर्षांपासून राज्यात काँग्रेसचा सत्तेचा वनवास सुरू आहे. या राज्यात काँग्रेस कधी सत्तेवर होती, हे लोकांना आता आठवतही नाही. केरळ, कर्नाटक, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड ही राज्ये कधीकाळी काँग्रेसचा गड समजली जात होती. आता या राज्यांत काँग्रेसची स्थिती दयनीय आहे. गुजरात, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू या राज्यात तर काँग्रेस कधीकाळी सत्तेवर होती, हे सांगूनही खरे वाटत नाही.

उत्तरप्रदेशसारख्या देशातील सर्वांत मोठ्या राज्यात १९९० नंतरच्या प्रत्येक विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची स्थिती ढासळत गेली. आज जेवढ्या राज्यांत भाजपाची सत्ता आहे, तेवढ्याच राज्यांत कधी काँग्रेसची सत्ता होती. पण पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात भाजपाने संपूर्ण चित्र बदलवून टाकले. कधीकाळी लोकसभेत भाजपाचे फक्त दोन खासदार निवडून आले होते, पण भाजपाने आत्मविश्वास कधी गमावला नव्हता. विजयाची जिद्द कधी सोडली नव्हती. त्यामुळे भाजपाने दोन जागांवरून २७२ जागांवर झेप घेतली. याउलट काँग्रेसने विजयाची जिद्द सोडली आहे. पराभूत मानसिकतेत काँग्रेस पक्ष गेला आहे.

काँग्रेस हे बुडते जहाज असल्याचे काँग्रेसच्या नेत्यांना वाटू लागले आहे. काँग्रेसमध्ये आपल्याला राजकीय भवितव्य नाही, काँग्रेसमध्ये राहिलो तर आपले राजकीय अस्तित्व धोक्यात येईल, असे काँग्रेसच्या नेत्यांना वाटू लागले आहे. त्यामुळे राहुल गांधींच्या नेतृत्वात काँग्रेस पक्ष पराभवाचे शतक कधी गाठणार, याची आता देशवासीयांना उत्सुकता आहे.

९८८१७१७८१७

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# तहानलेल्या लोकांची वेदना

कधी काळी नदीचे पाणी, विहिरीचे पाणी किंवा तलावाचे पाणी पिऊन पिढ्या जगल्या. गावकुसाशी वाहणारी नदी म्हणजे गावाची जीवनरेखा आणि विहिरीचा थंडगार घोट म्हणजे समाधान. त्या काळी कोणाला कल्पनाही नव्हती की माणूस एक दिवस पाण्याचाही व्यापार करेल. पण कुठल्या तरी महाभागाने मोफत मिळणाऱ्या या संपत्तीला बाटलीत कैद करून विकण्याची शक्कल लढवली आणि त्या एका कल्पनेतून आज जगभरात पाण्याचा उद्योग अरबो-खरबो रुपयांचा व्यवसाय झाला आहे. पूर्वी ज्यासाठी निसर्गाकडे ऋण मानायचो, तेच पाणी आज एक लिटरच्या बाटलीत २० रुपयांना विकले जात आहे. काही कंपन्यांनी तर या पाण्याचा दर ८०, १०० आणि त्याहून अधिक रुपये नेमला. एक लिटरच्या पाण्याची बाटली १०० रुपयांना? आणि दुसरीकडे शेतकरी जिवापाड मेहनत करून पिकवलेल्या एक किलो धान्याची किंमत त्यापेक्षा कमी? हा विरोधाभास नाही तर हा व्यवस्थेचा उपहास आहे. पण या वास्तवाकडे कोणाचेच लक्ष नाही. कोणाचीही भुवई हलत नाही. सुरुवातीला बाटलीबंद पाण्याचा बाजार सुरू झाला. नंतर जार आले आणि आज तर चिल्ड वॉटर कॅन रस्त्यावर, चौकात, दुकानात सर्वत्र सर्रास विकले जातात. त्या कॅनमध्ये असलेले पाणी खरोखर 'मिनरल वॉटर' आहे का? ते शुद्ध आहे का? त्या कॅनची स्वच्छता होते का? या कोणत्याही प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. कारण कोणी तपासतच नाही.

लोकांना स्वच्छ पाणी पुरवणे हे सरकारचे मूलभूत कर्तव्य आहे. पण नळांमधून गढूळ, अशुद्ध किंवा कमी प्रमाणात पाणी आले तर सामान्य माणूस काय करणार? त्याला बाटलीबंद किंवा कॅनमधील पाणी घ्यावेच लागते; आणि हीच असहायता कंपन्यांसाठी सुवर्णसंधी ठरली आहे. सरकारकडून मिळणाऱ्या पाण्याची गुणवत्ता दिवसेंदिवस खालावत गेली, त्याच वेळी वॉटर फिल्टर कंपन्यांनी घराघरात जागा मिळवली. केंट, ॲक्वागार्ड यांच्यासारख्या कंपन्यांनी प्रचंड विस्तार केला. पूर्वी गावातील लोक 'नैसर्गिक' पाणी पिऊन तंदुरुस्त राहत. त्यातून त्यांची रोगप्रतिकारकशक्ती वाढायची. पण आज प्युरिफायरमधून निघणाऱ्या 'अतिशुद्ध' पाण्याने शरीराची इम्युनिटी कमी करण्याचे काम सुरू आहे; ज्यात नैसर्गिक खनिजे असतात ते निघून जातात आणि शरीर नाजूक होत जाते. हे कोणालाच दिसत नाही का? कोणालाच विचारावंसं वाटत नाही का? आपण प्रगतीच्या नावाखाली निसर्गापासून किती दूर आलो आहोत, याची जाणीवही समाजाला करून देणारे कोणी नाही. सर्वांत मोठी शोकांतिका म्हणजे सरकार गप्प आहे. स्वच्छ पाणी मिळणे हा हक्क आहे, सुविधा नाही. पण या हक्काचे रक्षण कोण करणार? आज प्रश्न पाण्याच्या बाटलीच्या किमतीचा नाही. प्रश्न आहे समाजाच्या आरोग्याचा, शेतकऱ्याच्या श्रमांचा आणि लोकांच्या हक्कांचा. सरकारने आता तरी कान उघडावे. नळातून स्वच्छ पाणी देणे हे त्यांचे कर्तव्य आहे, व्यवसाय करण्याची मुभा देणे नव्हे. पाण्याच्या नावाखाली सुरू झालेल्या या निर्लज्ज नफेखोरीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ठोस पावले उचलली नाहीत तर उद्या श्वास घेण्यासाठीही बाटल्या विकल्या जातील आणि तेव्हा आपण सर्व जण आपल्या निष्क्रियतेची किंमत मोजत राहू. पाणी म्हणजेच जीवन. पण हेच जीवन आज व्यवसायाच्या गणितात कैद झालं आहे. महाराष्ट्रातल्या कोणत्याही गल्लीबोळात जा, चिल्ड वॉटर या नावाखाली कुणीही एक साधा वॉटर फिल्टर लावून पाणी विकताना दिसेल. या पाण्याची गुणवत्ता तपासण्याची शासनाकडे खरंच कोणती यंत्रणा आहे का? आठवड्याला, महिन्याला किंवा किमान वर्षातून एकदाही अशा कॅनमधील पाण्याची चाचणी केली जाते का? ही पाण्याची बाजारपेठ आता अरबो-खरबोंच्या व्यवहारात रूपांतरित झाली आहे. हे असे सुरू राहिले तर दिवस दूर नाही, जेव्हा हवासुद्धा बाटलीत बंद होईल आणि लोकांना श्वास घेण्यासाठी पैसे मोजावे लागतील. ज्या देशात नदी, विहीर, तलाव या निसर्गाने दिलेल्या संपत्तीवर लोक पिढ्यान्‌पिढ्या जगले, त्या देशातच श्वासही विकला जाईल, हे कल्पनेतही न मावणारे पण हळूहळू सत्यात उतरणारे चित्र आहे. पाण्याचा प्रश्न हा आता फक्त संसाधनाचा नाही, तर आपल्या अस्तित्वाच्या भविष्याचा प्रश्न बनला आहे. सरकारने आता तरी जागे होऊन लोकांच्या जीवनाशी खेळ करणाऱ्या या बेकाबू पाण्याच्या व्यापारावर नियंत्रण आणले पाहिजे नाहीतर पुढची पिढी आपल्यालाच प्रश्न विचारेल की, जिथे पाणी मोफत मिळत होतं, तिथं तुम्ही जगाला तहानलेलं का ठेवलं?

९९२२९९९५८८

## आजचे संघगीत-४८

गुरुवार, २० नोव्हेंबर २०२५

### तेच खरोखर विजयी जीवन

राष्ट्रास्तव जे झिजले कणकण तेच खरोखर विजयी जीवन ॥धृ.॥

आपत्तींशी सतत झुंजुनी निंदेचे शर प्रखर सोसुनी ।
जनजननीचे पूजन करि जे निजप्राणांचे करुनि निरांजन ॥१॥

हिंदुभूमिचे कुणी कंठमणि असती परि जे पैंजण होउनि ।
तिच्या यशाची गाता गाणी निशिदिन वदती रुणझुण रुणझुण ॥२॥

राजवैभवा जे न भाळले संस्कृतिकार्या फळले फुलले ।
सत्ता मदिरा त्यजुनी सजले करण्या सेवागंगासेवन ॥३॥

विश्वाचा हा विशाल बाग स्वदेश शोभो सजीव भाग ।
असे जाणुनी करुनी त्याग देशाचे जे करि नंदनवन ॥४॥

बुद्धिदास्य विषमता विनाशक दानवतेचे दुर्ग भयानक ।
वारुनि आले वीरव्रती जे चराचराचे करि संजीवन ॥५॥

यज्ञांतिल जे समिधा झाले जीवनास त्या बंधन कसले?
दुर्बलतेचे पाश गळाले, करि जे ऐसे सीमोल्लंघन ॥६॥

## वाचक पत्रे

### मल्हारी मार्तंड नवरात्र

मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेपासून ते मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीपर्यंत मल्हारी मार्तंड नवरात्र साजरे केले जाते. या नवरात्राला खंडोबाचे नवरात्र असे देखील म्हटले जाते. या काळात भगवान शंकराचा अवतार असलेल्या मल्हारी मार्तंड भैरवनाथाची (खंडोबा) विशेष आराधना केली जाते आणि चंपाषष्ठीच्या दिवशी मुख्य उत्सव साजरा केला जातो. प्रतिपदा ते षष्ठीपर्यंत सहा दिवस घट बसवतात. देव्हाऱ्यातील टाकास अभिषेक करून नंदादीप अखंड तेवत ठेवला जातो. कुटुंबप्रमुख या सहा दिवसांत उपवास करतात आणि मल्हारी सप्तशतीची ५ किंवा २२ पारायणे करतात. या काळात ब्राह्मण, सुवासिनी तसेच वाघ्या आणि मुरळी यांना भोजन देण्याची प्रथा आहे. चंपाषष्ठीला कुळाचार करून या नवरात्राची सांगता केली जाते.

महाराष्ट्रातील जेजुरी, मळवड, निंबलगाव, खंडोबा टेकडी यांसह अनेक ठिकाणी हे नवरात्र अत्यंत भक्तिभावाने साजरे केले जाते. भंडारा, गोलाई नृत्य, भजने आणि वाघ्यामुरळी यांचे वादन यामुळे मंदिर परिसर दैवी वातावरणाने भारलेला असतो. तसेच यातून लोकपरंपरेची झलक बघायला मिळते. मल्हारी मार्तंड नवरात्र हे श्रद्धा, परंपरा आणि लोकसंस्कृती यांचे अतिशय सुंदर असे मिश्रण आहे.

**वर्षा आवदे**/नागपूर

### उत्साह हीच तरुणाईची ओळख...

उत्साह माणसाला पुढे नेतो, संकटांना तोंड देण्याची ताकद देतो. तरुण मन हे चैतन्याने, जिज्ञासेने आणि कर्तृत्वाने परिपूर्ण असते. जेव्हा या सर्वांना उत्साहाची जोड मिळते, तेव्हा अशक्यही शक्य होते. प्रत्येक महान व्यक्ती आपल्या तरुण वयातच उत्साह, ध्येय आणि परिश्रम यांच्या जोरावर आदर्श ठरली. उत्साही तरुण हार मानत नाही, पराभवाला शिकवण मानतो आणि प्रत्येक संकटात संधी शोधतो. शिक्षण, उद्योग, विज्ञान, कला किंवा खेळ प्रत्येक क्षेत्रात उत्साही तरुण नवसंजीवनी देतो. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात संधी अनंत आहेत, पण त्यांचा लाभ फक्त त्या व्यक्तीलाच होतो ज्याच्यात उत्साह आहे. निराशा, भीती आणि आळस यावर मात करूनच उत्साही तरुण समाजाच्या प्रगतीचे शिल्पकार ठरतात. उत्साह हा केवळ भावना नसून तो जीवनाचा प्रेरणास्रोत आहे. तो मनाला चेतवतो, शरीराला सशक्त करतो आणि विचारांना सकारात्मक दिशा देतो. जिथे उत्साह असतो, तिथे परिश्रम आणि यश आपोआप येतात. उत्साह हीच खरी तरुणाईची ओळख आहे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### वीजवाहिन्यांची देखभाल आवश्यक

आजकाल विद्युत कंपनीतील वीज वितरण व्यवस्था योग्य नसल्याचे दिसून येते. त्यामुळे पावसाळ्यात वीज वारंवार खंडित होते. सर्वत्र वेल खांबांवर वाढलेले दिसतात, झाडांच्या फांद्या वीजवाहिनीत घुसलेल्या दिसतात. वीज मंडळातील अभियंते-अधिकारी याला दोषी असावेत किंवा त्यांचा वचक तांत्रिक कर्मचाऱ्यांवर नसावा. वरील सर्व दोषांमुळे, एनर्जी ऑडिटमध्ये वाढलेला लाईन लॉसचा खर्च, वीज ग्राहकांकडून वेळोवेळी वीज दर वाढवून वसूल केला जात आहे. आपल्या राज्याचे वीजदर इतर राज्यांपेक्षा जास्त आहेत. याचे मोठे कारण वीजवाहिनींची नियमित देखभाल नसणे. त्याचप्रमाणे सर्व शहरांत सर्व ठिकाणी टीव्ही केबलचे जाळे पसरलेले आहे. प्रामुख्याने ही केबल व्यवस्था फारच अस्ताव्यस्त असून नीटपणे केबल टाकली जात नाही. वीज कंपनीने या केबल टाकणाऱ्यांना व्यवस्थित केबल टाकण्यासाठी सुचविले तर वीजयंत्रणेवर भार येणार नाही, पण ऐकतो कोण!

**पद्माकर नानोटे**/७२१८८९७४५२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## महत्वाचे...



### महापालिकेच्या वतीने माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

महानगरपालिकेच्या वतीने भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंती दिनानिमित्त इंद्रभूवन परिसरातील पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील आयुक्त यांच्या कार्यालयात इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अशोक खडके, सिद्राम तम्मिगार आदी मान्यवर उपस्थित होते.

### एमआयएमला सोबत घेण्यास शिवसेनेचा विरोध

**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

**निष्ठावान शिवसैनिक आणि पारंपारिक मतदारांमध्ये नाराजी पसरू शकते**

एमआयएमला सोबत घेण्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख प्रा. अजय दासरे यांनी विरोध दर्शविला आहे. एमआयएम आणि शिवसेनेचे विचारधारा भिन्न आहे. आघाडीत घेतल्यास निष्ठावान शिवसैनिक आणि पारंपारिक मतदारांमध्ये तीव्र नाराजी पसरू शकते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी महाविकास आघाडीत एमआयएम सोबत घेण्यास माझा तीव्र विरोध असेल अशी ठाम भूमिका प्रा. दासरी यांनी मांडली. जिल्हाप्रमुख दासरी यांच्या भूमिकेमुळे राज्यातील महाविकास आघाडीच्या राजकीय समीकरणांवर स्थानिक पातळीवर मतभेद असल्याचे स्पष्ट दिसत आहे. सोलापूर सारख्या शहरात दोन्ही पक्षांचे लक्षणीय अस्तित्व असल्याने एमआयएमला सोबत घेतल्यास जागावाटप आणि समन्वय साधने शिवसेना ठाकरे पक्षासाठी मोठी डोकेदुखी ठरू शकते तरी देखील अखेरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनाच असल्याचे दासरी म्हणाले.

### वागदरी येथे महिला सक्षमीकरण कार्यक्रम; जय गारमेंटचे आयोजन

**वागदरी, ता.१९ नोव्हेंबर-**

ग्रामीण भागातील महिलांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि स्थानिक स्तरावर वस्त्रोद्योग वाढवण्यासाठी करजगी (ता. अक्कलकोट) येथील जय गारमेंट्सतर्फे वागदरी येथे महिला सक्षमीकरण व वस्त्रउद्योग मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. या सत्राचे मार्गदर्शन जय गारमेंट्सचे सीईओ आसिफ यत्नाळ यांनी केले.सत्रादरम्यान आसिफ यत्नाळ यांनी जय गारमेंट्स नॅनो युनिट प्रकल्पाबाबत माहिती दिली. या प्रकल्पाअंतर्गत ग्रामीण भागात लहान-लहान शिवणकाम व वस्त्रउत्पादन केंद्रे उभारली जातात, ज्यामुळे महिलांना घराजवळच रोजगाराची संधी उपलब्ध होते. आत्तापर्यंत ८ नॅनो युनिट्स सुरु असून सोलापूर जिल्ह्यात ४० युनिट्स सुरू करण्याचे लक्ष्य आहे. या युनिट्समुळे महिलांना शिवणकाम, कटिंग, फिनिशिंग यांसारखी कौशल्ये आत्मसात करता येतात तसेच उत्पादनासाठी कच्चामाल, प्रशिक्षण आणि तयार वस्तूंची खरेदी याबाबत संपूर्ण सहकार्य जय गारमेंट्सकडून दिले जाते. या प्रकल्पामुळे सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात महिला स्वावलंबन आणि आर्थिक उन्नती साधली जाईल, असा विश्वास व्यक्त केला.



### शिक्षण मंडळात झाशीची राणी लक्ष्मीबाई, माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या कार्यालयात झाशीची राणी लक्ष्मीबाई व माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, महेश वालावलकर, सारंग अंजीखाने, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, नंदकुमार फुलारी, तरंगिणी कोंडा, भालचंद्र साखरे, नाशिर खान, सायली ढोले उपस्थित होते.

### धर्माचे आचरण करा, स्वधर्माने वागा व अभिमानाने जगा

**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

श्री गुरुने दिलेले लिंग रक्षण करते. सर्व देवी देवतांनी लिंग धारण केल्याने पावन झाले. ईस्ट लिंग धारण केल्याने देवच तुमच्याजवळ आहे. वीरशैवात देहच देव आहे. देहालय म्हणजे शिवालय होय. अक्कम महादेवी व हेम रेड्डी मल्लम्मा या शिवभक्ती करून श्रेष्ठ झाल्या त्याप्रमाणे वीरशैव समाजातील सर्वांनी लिंग धारण करून धर्माचे आचरण करून, स्वधर्माने वागून अभिमानाने जगणे गरजेचे आहे असे प्रतिपादन श्री गुरु मनीकंठ महास्वामीजी यांनी वीरभद्र मंदिर नाझरे (ता.सांगोला) येथे आशीर्वाचनात केले. श्री हनुमंताला दीक्षा देणारे वीरभद्र होय. शिवभक्त दक्ष प्रजापती दरबारात शिवाला निमंत्रण नव्हते. याचा राग सर्व शिवभक्तांना व पार्वतींना आला. तरीही पार्वती शंकराला म्हणाली आपण जाऊच व हट्ट धरल्याने महादेव गेले. तेथे कोणीच विचारेना, त्यामुळे पार्वतीला वाईट वाटले. पती निंदा सहन झाली नाही. सतीने प्राण त्याग केला. भगवान शंकर क्रोधीत झाले व तांडव करून जटा दगडावर आपटल्याने विरभद्र महाराज उत्पन्न झाले. वीरभद्राचा इतिहास फार मोठा आहे. त्यामुळे तुम्ही शूर वीरा सारखे रहा. वीरभद्राचा आशीर्वाद तुम्हा सर्वांना मिळो व यासाठी लिंग पूजा करून वीरभद्राचे नामस्मरण करा, जीवनात काही कमी पडणार नाही असेही गुरु सिद्ध मनीकंठ शिवाचार्य महास्वामींनी आशीर्वाचनात सांगितले.

# नगराध्यक्षांसाठी ११४ तर नगरसेवकांसाठी १७१९ अर्ज वैध

**तर दोन्ही पदांसाठी ५८३ अर्ज छाननीत बाद**

**● पुढाऱ्यांनी चालू केले प्रचाराचे कार्य, २३ तारखेलाही अनेकजण माघार घेण्याची शक्यता**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील अकरा नगरपरिषदा आणि एक नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी ११४ उमेदवारांचे अर्ज वैध झाले असून, नगरसेवकपदाच्या २८९ जागांसाठी १७१९ अर्ज दाखल झाले आहेत. तर अनगर नगरपंचायतीच्या नगरसेवकपदाच्या १७ च्या १७ जागा बिनविरोध झाल्या आहेत. नगराध्यक्ष पदासाठी तीन अर्ज दाखल आहेत. मात्र मंगळवारी छाननीत उज्वला थिटे यांचा अर्ज बाद ठरल्याने नगराध्यक्ष पदही जवळपास अविरोध ठरले गेले आहे.

दरम्यान, छाननीमध्ये अध्यक्षपदाचे ३३ अर्ज आणि सदस्य पदासाठी ५५० अर्ज असे एकूण ५८३ अर्ज बाद ठरले आहेत. दरम्यान, अर्ज माघार घेण्याची तारीख २३ नोव्हेंबर असून, या दिवशीही अनेकजण माघार घेण्याची शक्यता आहे. सोमवारी अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस असल्याने या दिवशी तहसील कार्यालयांना यात्रेचे स्वरूप आले होते. रात्री उशिरापर्यंत अर्ज भरून घेण्याची प्रक्रिया सुरू होती. त्यानंतर मंगळवार, बुधवारी दाखल अर्जाची छाननी करण्यात आली. शुक्रवार, दि. २३ नोव्हेंबर पर्यंत उमेदवारांना अर्ज मागे घेता येणार आहे. त्यानंतर अंतिम उमेदवार ठरणार असून, २ डिसेंबर रोजी मतदान घेण्यात येणार आहे. तर याचा निकाल दुसऱ्याच दिवशी लागणार आहे. आता निवडणुकीस उभे ठाकलेल्या काही उमेदवारांनी प्रचारही सुरू केल्याचे सांगण्यात येत आहे.

**छाननीत तालुकानिहाय इतके आहेत वैध अर्ज**

बार्शी नगराध्यक्षपदासाठी १० अर्ज दाखल झाले होते तर त्यातील ९ अर्ज वैध ठरले तर नगरसेवकपदासाठी २९६ अर्ज दाखल होते; त्यातील १८९ अर्ज वैध ठरले. तर पंढरपूर अध्यक्षपदासाठी ८ अर्ज आले होते; त्यातील ७ अर्ज वैध तर सदस्यपदासाठी ३६६ अर्ज आले आणि यातून ३२३ अर्ज वैध ठरले. अक्कलकोटच्या नगराध्यक्षपदासाठी ११ अर्ज तर यातील ७ अर्ज वैध, सदस्यपदासाठी १७५ पैकी १०२ अर्ज वैध ठरले. अकलूज अध्यक्षपदासाठी ७ पैकी ६ अर्ज वैध तर सदस्यपदासाठी १४६ पैकी १०४ वैध, सांगोला: ३१ पैकी २४/ ३३९ पैकी २६१, करमाळा: १५ पैकी १३/२५४ पैकी १९०, कुर्डुवाडी: १० पैकी १०/ १६४ पैकी १४९, मंगळवेढा १९ पैकी १४/ १६० पैकी १४०, मोहोळ: १८ पैकी १२/ १७० पैकी १२५, दुधनी: ७ पैकी ५/ ९७ पैकी ५५, मैदर्गी: ८ पैकी ५/ ८४ पैकी ६३, अनगर नगरपंचायतसाठी ३ पैकी २ अर्ज वैध तर १८ पैकी १८ अर्ज वैध ठरले आहेत.



### सुरवसे प्रशालेत जनजातीय गौरव दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

स्वतंत्रता सेनानी भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती निमित्त सोलापुरातील सुरवसे हायस्कूल येथे अभाविप द्वारे आयोजित केलेल्या विशेष व्याख्यानात प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी बिरसा मुंडा यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकत त्यांनी केलेले सामाजिक, राष्ट्रीय कार्य व संगठन कौशल्य अद्भुत होते असे नमूद केले.

त्यांनी आपल्या प्रभावी भाषणात बिरसा मुंडा यांच्या साहसपूर्ण जीवनकार्याचा, जनजाती समाजाला दिलेल्या प्रेरणेचा आणि त्यांच्या संघर्षमय आंदोलनाचा वेध घेतला. 'उलगुलान' या त्यांच्या क्रांतिकारी आंदोलनाचे महत्त्व उत्कृष्टपणे समजावून सांगितले तसेच वर्तमान काळात विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजकार्य व राष्ट्र उभारणीत योगदान द्यावे असे आवाहनही केले. प्राचार्या गीतांजली पिरगोंडे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना तत्कालीन परिस्थितीत बिरसा मुंडा यांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे सांगितले. सोलापूर जिल्हा सह संयोजक शिवलिंग बिराजदार यांनी प्रस्तावना व अभाविप मांडणी केली. यावेळी प्रा. लांडगे उपस्थित होते.

### पार्किंगमधून दुचाकीची चोरी

**सोलापूर :** कोर्टाच्या आतील पार्किंग परिसरातून एका महिलेची दुचाकी चोरी झाल्याची घटना १० नोव्हेंबर रोजी घडली असून तक्रारीनुसार जेलरोड पोलीस ठाण्यात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी मनीषा नितीन गाडे (वय ३४, आंबड, ता. माढा,) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी आपली लाल रंगाची टीव्हीएस ज्युपिटर (गडी क्रम ंकएम एच ४५ ए पी ५८६५) ही मोटारसायकल १० नोव्हेंबर रोजी सकाळी १०.०० ते ११.०० वाजण्याच्या दरम्यान कोर्टाच्या आतील पार्किंगमध्ये हॅण्डल लॉक करून उभी केली होती. मात्र चोरट्याने मोटारसायकल चोरून नेल्याचे उघड झाले. गुन्हा नोंदवला असून तपास पोलिस हवालदार गायकवाड करीत आहेत.

**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस विशेषतः गाव मौजे धोत्री, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील व पंचक्रोशीतील लोकांना आमचे अशिलांचे वतीने जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेले मुळ मालक राजेंद्र माणिक जाधव यांचे मालकी वहिवाटीचे गांव मौजे धोत्री येथील शेतजमीन गट नं. ७०/१/अ त्यांच्या मालकीचे क्षेत्र ०१ हे. ६५ आर ही संपुर्ण चतुःसिमापुर्वक मिळकत आमचे अशिल बाळासाहेब नामदेव इंगवले, रा. ११, जवाहर नगर, पुणे विद्यापीठ रोड, पुणे यांनी खरेदी घेण्याचे ठरवुन तसा व्यवहार झालेला आहे व त्याबाबत साठेखताचा रजिस्टर दस्त व कुलमुखत्यारपत्राचा रजिस्टर दस्त आमचे अशिलांचे नावे दिलेले आहे. सदरची मिळकत भोगवटादार वर्ग २ ची असून, तिचे भोगवटादार वर्ग १ मध्ये रूपांतर करणेसाठी सक्षम अधिकारी सो. यांचेकडे परवानगी मागणेकामी कायदेशीर प्रक्रिया चालु आहे. तेव्हा सदर मिळकतीबाबत कोणाचीही काहीएक तक्रार असल्यास आमचे अशिलांचे वर नमुद पत्त्यावर लेखी व योग्य त्या कागदपत्रांसह आमचे अशिलांची खात्री करून द्यावी. मुदतीत हरकत न आलेस सदरची मिळकत निर्वेध, निष्कर्जीत व निजोखमी आहे व ज्याचा हक्क आहे त्याने तो जाणीवपुर्वक सोडुन दिलेला आहे, असे समजण्यात येईल.

**परिशिष्ठ :** मिळकतीचे वर्णन :- गाव मौजे धोत्री, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नं. ७०/१/अ क्षेत्र ०१ हे. ६५ आर, ०१ रू. ५५ पैसे यांसी चतुः सिमाः-पुर्व-गट नं. ७० पैकी, पश्चिम- धोत्री संगदरी रस्ता, दक्षिण गट नं. ६९, उत्तर- धोत्री मुस्ती शिव रस्ता येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे. दिनांक :- १९/११/२०२५

सही/-
**ॲड. लालखान रज्जाक शेख**
बी.एस. एल. एलएल.बी
मु.पो गलांडवाडी नं. १, ता. इंदापूर जि. पुणे
मो. नं. ९७६६८९८०८७

**जाहीर समन्स/नोटीस**

पुढील नेमली तारीख - २४/१२/२०२५
आर टी एम अपिस - ५२४/२०२४

**सोलापूर येथील मे, उपविभागीय अधिकारी क्र.१ यांचे न्यायालयात**

**धोंडीराम विश्वनाथ दिक्षीत,** वगैरे ---- अपेलंट
विरूद्ध
**अमोल शिवाजी ढेरे,** वगैरे ---- रेस्पॉडंट

प्रति,
**कान्होपात्रा बजरंग ढेरे**
रा. पानगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर
**सारीका नाना मुळे**
रा.पानगांव, ता.बार्शी जि. सोलापूर

ज्याअर्थी अपेलंटने तुमचेविरुध्द या मे. मंडळ अधिकारी पानगांय, ता. याशी, जि. सोलापूर यांनी दि.१८/०९/२०२४ रोजी मंजूर केलेला फेरफार क्र.८४९८ नामंजूर करण्यात आलेबाबत दिलेला निर्णय रद्द करण्यात यावा म्हणून सदरचे अपिल आणलेले आहे. सदर अपिलात तुम्ही रेस्पॉडंट/प्रतिवादी नं.७ व ८ म्हणून सामील आहात. तुम्हास अपिलात नमूद पत्त्यावर समन्स/नोटीस काढली परंतु तुम्ही सदर ठिकाणी राहत नसलेचा रिपोर्ट/पोष्ट पाकीट परत आलेले आहे. तसेच तुम्ही कोठे गेला आहेत हे माहिती नाही, कोणी माहिती सांगत नाहीत तुमचा निश्चित असा ठावठिकाणा आढळून येत नाही, सदर अपिलाकामी तुम्ही प्रतिवादी/रिस्पॉडंट म्हणून सामील आहात.

त्याअर्थी तुम्हास सदर जाहीर समन्सद्वारे कळिवण्यात येते की, आपण सदर अपिलाकामी जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमली तारीख २४/१२/२०२५ रोजी स्वतः अगर माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे, कैफियत लेखी स्वरुपात मा. न्यायालयात दयावी, मुदतीत आपण हजर होवून आपली कैफियत/म्हणणे दिले नाहीतर आपणास सदर नोटीसची बजावणी होवूनहो आपणास कांहीही सांगावयाचे नाही असे समजून मा. न्यायालयाचे सदरकामी यथायोग्य हुकूम होतील याची नोंद घ्यावी.

सदरचे जाहीर समन्स आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे ता.१९/११/२०२५.

सही/-
**उप-विभागीय अधिकारी**
सोलापूर क्र १, सोलापूर

### जुळे सोलापूर डी-मार्ट जवळ होतेय वाहतूक कोंडी

**सोलापूर,दि.१९ नोव्हेंबर-**

जुळे सोलापूर येथील डी-मार्ट परिसरात वाहतूकीची कोंडी होत असल्याने वाहनधारकांसह पादचाऱ्यांना ट्रॅफिक जामच्या समस्येला सामोरे जावे लागत नाही. या परिसरात दत्त मंदिरासमोरील रेल्वे पुलाच्या विस्तारीकरणाचे काम सुरू आहे. त्यामुळे या पुलावर अधिकच गर्दी होत आहे. ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे त्यामध्ये अधिकच भर पडत आहे. येथील पुलाचे काम खुपच संथगतीने सुरू असून त्याचा परिणाम वाहतूकीवर होत आहे.



### स्व.लता व आशा यांच्या बहारदार गाण्यांचा कार्यक्रम उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ नोव्हेंबर-**

कराओके आर्टिस्ट असोसिएशन ऑफ म्युझिक सोलापूरर शाखा वतीने सोमवार दि. १७ रोजी सायंकाळी सहा ते रात्री नऊ यावेळेत साक्षी देवस्थळी व संगीता कोळी प्रस्तुत स्व.लता दीदी व आशाजी यांच्या अजरामर गाण्यांवर आधारित सदाबहार मराठी, हिंदी गीतांचा कराओके कार्यक्रम सोलापुरातील इंडियन मेडिकल असोसिएशन हॉल, डफरीन चौक येथे पार पडला.

सांस्कृतिक परंपरेला उजाळा देत लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्या अजरामर गीतांचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. स्वरसूरांच्या सोहळ्यात स्थानिक कलाकारांनी दोन्ही दिग्गज गायिकांची सुवर्ण गाणी सादर करत प्रेक्षकांना जुन्या आठवणींच्या जगात नेले. कार्यक्रमाची सुरुवात लता दीदींच्या भक्तिगीतांनी झाली. त्यानंतर अजीब दास्तान है ये, लग जा गले, ऐ माझी जिंदगी अशी एकापेक्षा एक सरस गीते सादर करण्यात आली. आशा भोसले यांच्या पिया तू, दिल चीज़ क्या है, ढोलकी-लावणी अशा धमाकेदार गाण्यांनी उत्साहाची लहर निर्माण झाली. नागरिकांसह, रसिकप्रेमी, संगीतप्रेमी, मोठ्या संख्येने उपस्थित होते. कलाकारांना टाळ्यांचा कडकडाट आणि 'वा!' अशा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

संस्थेचे अध्यक्ष रवी ताकपेरे, उपाध्यक्ष रवी गायकवाड, उपाध्यक्षा साक्षी देवस्थळी, महिला संघटक संगीता कोळी, खजिनदार वेणूगोपाल उत्तूर या सर्वांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. यावेळी प्रसाद भालके, शोभा वाघमारे, संगीता उमर्जीकर, डॉ मुकुंद लिमये, दत्तात्रय सुतार, अश्विनी दोरकर, अस्मिता कुलकर्णी व इतर गायक उपस्थित होते.

# शहरात कुष्ठरुग्ण शोध मोहीमेस सुरुवात; २०२ सर्वेक्षण टीम १४ दिवस राहणार कार्यरत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शहरात कुष्ठरुग्ण शोध मोहीम सुरू झाली आहे. निदान न झालेले कुष्ठरुग्ण शोधून त्यांच्या उपचाराची त्वरित सुरुवात करणे व विकृती टाळणे या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे. ही नागरिकांसाठी एक महत्त्वाची सुवर्णसंधी असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत शहरात २०२ सर्वेक्षण टीम कार्यरत असून प्रत्येक टीममध्ये १ आशा स्वयंसेविका व १ पुरुष स्वयंसेवक यांचा समावेश आहे. ही सर्व टीम दररोज २५ घरांना भेट देऊन सकाळी ७ वाजल्यापासून सर्वेक्षण करतील. महिला स्वयंसेविका घरातील महिला सदस्यांची तर पुरुष स्वयंसेवक पुरुष सदस्यांची शारीरिक तपासणी करतील. घरातील सर्व सदस्यांना कुष्ठरोगाविषयी माहिती देणे व जनजागृती करणे हेही या मोहिमेचा भाग आहे.

सर्वेक्षणाच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवण्यासाठी ३९ पर्यवेक्षक नियुक्त करण्यात आले असून ते चेकलिस्टनुसार किमान १० टक्के घरांना भेट देऊन टीमना मार्गदर्शन करतील. मोहिमेबाबत जनजागृती वाढविण्यासाठी आरोग्यमंत्री महोदयांनी सरपंचांना दिलेले पत्र सर्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची विशेष काळजी घेण्यात आली आहे. सर्वेक्षणादरम्यान आढळणाऱ्या संशयित रुग्णांना सिव्हिल हॉस्पिटल येथील ओपीडी क्र. ३७ मध्ये तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून पुष्टीकरण केले जाणार आहे. निदान झालेल्या रुग्णांना त्वरित उपचार दिले जातील. सर्व टीमना दिलेल्या फॉरमॅटप्रमाणे अहवाल वेळेत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ही मोहीम शहरात १४ दिवस राबविली जाणार आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या या उपक्रमाम ुळे शहरातील न निदान झालेले रुग्ण शोधून त्यांना त्वरित उपचार मिळण्यास चालना मिळणार आहे.

**तपासणीसाठी आलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यास माहिती द्यावी**

आरोग्य कर्मचारी तपासणीसाठी घरात येत असताना शरीरावर असलेला कोणताही खाजणारा किंवा न खाजणारा चट्टा, त्वचेवरील संवेदना कमी होणे अशा लक्षणांची माहिती त्यांना द्यावी, असे आवाहन आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर शहर महानगरपालिका हद्दवाढ भागातील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. १८७/१अ, यांसी नविन सर्व्हे नं. १७८/१अ यापैकी कलावती नगर भाग-१ मधील प्लॉट नं. ५२ याचे क्षेत्र १२०० चौ.फुट अथवा १११.५२ चौ. मीटर यावर संपूर्ण क्षेत्र विट सिमेंटने बांधलेले बांधकाम असून यासी वर पन्हाळी पत्रे घातलेले आहेत, यात ६ रूम, संडास, बाथरूम आहे. यासी चतुःसीमाः-
पुर्वेस :-बंडु माशाळकर यांची घरजागा, दक्षिणेस :-बंडु माशाळकर यांची घरजागा
पश्चिमेस :-प्लॉट नं. ५१, उत्तरेस :-रस्ता
येणेप्रमाणे चतुःसीमेतील प्लॉट घरजागा त्यातील दगड, विटा, दरवाजे, खिडक्या वगैरे तदंगभूत वस्तूंसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह.
ही मिळकत, सौ. जयलक्ष्मी आनंद कद्दरगी, रा. E/4/735 दर्गा रोड, हफ्तेगुंबझ जवळ, भवानी नगर, मक्तमपूर, कलबुर्गी, कर्नाटक यांचे मालकीचे असून त्यांनी ही प्लॉट घरजागा आमचे अशिलास मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्काने कायम खुष खरेदीने देण्याचे ठरवून कब्जेपावती करारनामा लिहून दिला आहे. त्यांनी ही मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनजोखमी असल्याचे खात्री दिली आहे, तरीही या प्लॉट घरजागेवर कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास त्यांनी खालील नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणत्याही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल ठरल्यानुसार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.
ता. १९/११/२०२५

सही/-
अशिलातर्फे **ॲड. राजरतन द. श्रीराम**
ऑ. १६१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५
मो. ९८८१२४०५१६

**जाहीर समन्स/नोटीस**

पुढील नेमली तारीख - २४/१२/२०२५
आर टी एस अपिल - ४९८/२०२४

**सोलापूर येथील मे, उपविभागीय अधिकारी क्र.१ यांचे न्यायालयात**

**धोंडीराम विश्वनाथ दिक्षीत,** वगैरे -- अपेलंट
विरूद्ध
**अमोल शिवाजी ढेरे,** वगैरे -- रेस्पॉडंट

प्रति,
**कान्होपात्रा बजरंग ढेरे**
रा. पानगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर
**सारीका नाना मुळे**
रा.पानगांव, ता.बार्शी जि. सोलापूर

ज्याअर्थी अपेलंटने तुमचेविरुध्द या मे. शेत जमीन न्यायाधिकरण तथा तहसिलदार बार्शी यांनी दि.३०/०७/२०२४ रोजी संचिका क्र.ए.एल.टी/एसआर-२६/२०२३ मध्ये केलेला निर्णय रद्द करण्यात यावा म्हणून सदरचे अपिल आणलेले आहे. सदर अपिलात तुम्ही रेस्पोंडंट/प्रतिवादी नं.७ व ८ म्हणून सामील आहात. तुम्हास अपिलात नमूद पत्त्यावर समन्स/नोटीस काढली परंतु तुम्ही सदर ठिकाणी राहत नसलेचा रिपोर्ट/पोष्ट पाकीट परत आलेले आहे. तसेच तुम्ही कोठे गेला आहेत हे माहिती नाही, कोणी माहिती सांगत नाहीत तुमचा निश्चित असा ठावठिकाणा आढळून येत नाही, सदर अपिलाकामी तुम्ही प्रतिवादी/रिस्पॉइंट म्हणून सामील आहात.

त्याअर्थी तुम्हास सदर जाहीर समन्सद्वारे कळिवण्यात येते की, आपण सदर अपिलाकामी जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमली तारीख २४/१२/२०२५ रोजी स्वतः अगर माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे, कैफियत लेखी स्वरुपात मा. न्यायालयात दयावी. मुदतीत आपण हजर होवून आपली कैफियत म्हणणे दिले नाहीतर आपणास सदर नोटीसची बजावणी होवूनही आपणास कांहीही सांगावयाचे नाही असे समजून मा. न्यायालयाचे सदरकामी यथायोग्य हुकूम होतील याची नोंद घ्यावी.

सदरचे जाहीर समन्स आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे ता. १९/११/२०२५

सही/-
**उप-विभागीय अधिकारी**
सोलापूर क्र १, सोलापूर

**जाहीर नोटीस/समन्स**

रे.मु.नं.१००/२०१२
नि.नं. २६८

**मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, बार्शी यांचे न्यायालयात**

**तानाजी शाहु पवार** ----- वादी
विरूद्ध
**शाहु दत्तात्रय पवार वगैरे ७** ----- प्रतिवादी

प्रति,
प्रतिवादी नं. ६ अ) सलिल अंकुश वाघमारे, ६ब) सुधी अंकुश वाघमारे, ६क) सचिन अंकुश वाघमारे, सर्व रा. व्हनकळस प्लॉट, अलिपूर रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर ....यांसी

ज्याअर्थी यातील वादी तानाजी शाहू पवार यांनी हल्लीचा दावा रे.मु.नं. १००/२०१२ हा प्रतिवादी नं. ६ अंकुश सदाशिव वाघमारे व इतर यांचे विरूद्ध डिक्लेरेशन व वाटपासाठी आणलेला आहे. प्रतिवादी नं. ६ हे मयत झाल्यानंतर वादी यांनी त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी अर्ज केलेला होता. त्या अर्जावर आदेश होऊन प्रतिवादी नं. ६अ), ब) व क) यांना जाहीर समन्स काढणेचे देखील आदेश झालेले आहेत.

त्याअर्थी, वर नमुद प्रतिवादी नं. ६अ), ब) व क) यांना याद्वारे जाहीर नोटीस/समन्स देण्यात येते की, प्रतिवादी नं. ६अ),ब) व क) हे वर नमुद ठिकाणी अगर जेथे कोठे असतील त्यांनी या जाहीर नोटीस/ समन्स प्रसिद्ध झालेपासुन ३० दिवसांचे आत अगर पुढील नेमलेली तारीख दि. २९/११/२०२५ रोजी दाव्याकामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा स्वतः अगर विधिज्ञांमार्फत समक्ष हजर राहुन दाव्यात कागदपत्रानिशी त्यांनी त्यांची कैफियत, म्हणणे अगर हरकत द्यावी. सदर विहित मुदतीमध्ये प्रतिवादी नं. ६अ), ब) व क) हजर न झालेस अथवा त्यांनी त्यांचे म्हणणे, कैफियत सादर न केल्यास त्यांचे विरूद्ध दाव्याची एकतर्फा चौकशी होवुन त्यांचे अपरोक्ष दाव्याचा गुणदोषावर निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी, कळावे ही जाहीर नोटीस/ समन्स दिलेला. १७/११/२०२५

क.लिपीक
कोर्टाचा शिक्का
सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व स्तर, बार्शी

**जाहीर प्रसिद्धीकरण**

पुढील नेमली ता. २०/१२/२०२५
दि.कि.अ.नं.५१/२०२५

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो वरिष्ठ यांचे न्यायालयात**

१) **श्रीमती पुनम महेश पांडुळे,** वय ३० वर्षे
धंदा, घरकाम, रा. दहिटणे, ता. बार्शी, जि, सोलापूर
२) **पलक महेश पांडुळे,** वय ०८ वर्षे
धंदा, शिक्षण, रा. सदर- अज्ञान -- अर्जदार
३) **विघ्नेश महेश पांडुळे,** वय ०५ वर्षे
धंदा, शिक्षण, रा. सदर- अज्ञान
(अर्जदार नं. १ स्वतःकरीता व अज्ञान
अर्जदार नं. २.३ची अ.पा.क. जनकआई म्हणून)
विरूद्ध
**कोणी नाही** -- सा.वाला

ज्याअर्थी अर्जदार हे वर नमूद ठिकाणचे रहिवासी असून अर्जदार नं. १ ही अर्जदार नं. २,३ यांची आई आहे. अर्जदार नं.१ चे पती म्हणजेच अर्जदार नं.२,३ चे वडिल महेश ज्योतीराम पाडुळे हे होते. सदर महेश ज्योतीराम पाडुळे हे पोलिस खात्यात मुख्यालय सोलापूर ग्रामीण येथे कार्यरत होते ते अर्जदारासह मौजे वैराग-मानेगांव ता. बार्शी येथे राहत होते. तेथे राहून ते ये-जा करत होते. सदर महेश हे दि.१२/०२/२०२५ रोजी वैराग नजीक मानेगाव ता. बार्शी येथील राहते घरी येथे मयत झालेले आहेत, मयतास अर्जदार हेच कायदेशीर वारस असून अर्जदाराशिवाय मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत महेश ज्योतीराम पाडुळे यांचे पश्चात अर्जदारांना शासकीय योजनेचा लाभ मिळणेकरीता, अनुकंपा योजनेचा लाभ मिळणे, मयताचे नांवावर जमा असलेल्या रक्कमा, फॅमिली पेन्शनची मागणी केली असता तेथील अधिकारी यांनी अर्जदारांना वारस/उत्तराधिकार प्रमाणपत्राची मागणी केली असे कथन करुन अर्जदारानी ते मयत महेश ज्योतीराम पाडुळे यांचे कायदेशीर वारस असलेबाबत वारस/हेअरशिप प्रमाणपत्राची मागणीकरताअर्ज केलेला आहे

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळिवण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनांसंबंधाने वा अन्य कोणाचे कांही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमले तारीख २०/१२/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे तारीखः १३/११/२०२५

कोर्टाचा शिक्का
सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व स्तर, बार्शी

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे...

### रेल्वेची १७ वर्षांखालील व्हॉलिबॉल स्पर्धा २६ नोव्हेंबरला

**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

भारतीय संविधानानिमित्त १७ वर्षांखालील मुले व मुलींची व्हॉलिबॉल स्पर्धा रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात होईल. मध्य रेल्वे इन्स्टिट्युट व विभागीय स्पोर्टस् असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजिली आहे. इच्छुक संघानी २३ नोव्हेंबरपर्यंत जयलक्ष्मी मुकुंद (मो.९८२२१६७८६७) अथवा नीलेश वरवडकर (मो.९८५०६५३६३६) यांच्याकडे नोंदणी करावी, असे इन्स्टिट्युटचे सचिव किशोर पिल्ले यांनी कळविले आहे.

### बार्शीचा स्केटिंगपटू अथर्वची रशियातील कॅम्पसाठी निवड

**बार्शी, दि.१९ नोव्हेंबर-**

येथील सुयश विद्यालयातील अथर्व विशाल उंदरे याची रशियात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय आईस हॉकी इनलाईन स्केटिंग कॅम्पसाठी निवड झाली. बॅन्डी असोसिएशन ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय बॅन्डी(आईस हॉकी इनलाईन स्केटिंग) स्पर्धा हिमाचल आईस रिंक डेहराडून येथे झाली. या स्पर्धेत महाराष्ट्राने तृतीय क्रमांक संपादिला. यात अथर्वचा समावेश होता. त्याचे संस्थापक शिवदास नलवडे, मार्गदर्शिका प्रतिभा, प्रसाद नलवडे, मुख्याध्यापिका अलका जगताप, उपमुख्याध्यापक संदीप येवले, क्रीडाशिक्षक अतुल जाधव यांनी कौतुक केले.





### राज्य सॉफ्टटेनिस स्पर्धेसाठी संगमेश्वरच्या चौगुले, जाधव यांची निवड

**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

पुणे येथे झालेल्या शालेय विभागीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेमध्ये संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या केतकी चौगुले, भक्ती जाधव यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक पटकाविला. या कामगिरीवर दोघांचीही बारामती येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ.आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते , प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी अभिनंदन केले.

### वेळापूरची प्राजक्ता बनसोडे महाराष्ट्र खो-खो संघात

**वेळापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

इंग्लिश स्कूल, वेळापूर व अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळाची प्राजक्ता सोमनाथ बनसोडेची शालेय राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली. नाशिक (पंचवटी) येथे झालेल्या राज्य स्पर्धेत प्रशालेने १९ वर्षांखालील गटात पाचवे स्थान मिळविले. या कामगिरीवर तिची निवड झाली. तसेच १९ वर्षांखालील मुलांच्या गटातून राखीव खेळाडू म्हणून प्रणव दिलीप आडसूळ याची निवड झाली. दोघांना क्रीडाशिक्षक सतीश कदम, शिवाजी जाधव, सोमनाथ बनसोडे, अर्धनारी नटेश्वर क्रिडा मंडळाचे अध्यक्ष जावेद मुलाणी, श्रीनाथ खटके, जावेद आतार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुजित कदम, उपाध्यक्ष डॉ. सुभाष कदम, संचालिका डॉ. मीनाक्षी कदम, सचिवा डॉ. प्रियदर्शनी महाडिक, तेजस्विनी कदम, शाळा समिती चेअरमन प्रतापराव पाटील, प्राचार्य आर. बी. पवार, उपमुख्याध्यापक पठान शिवशरण, पर्यवेक्षक बी. एस. सावळे, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष अमोल मंडलिक, व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिलीप जगदाळे, उपाध्यक्ष प्रियंका पोरे आदींनी अभिनंदन केले.



# अभिनव, प्रांजलीचा सुवर्णवेध



सुवर्णपदक विजेते अभिनव देशवाल व प्रांजली प्रशांत धुमल (मध्यभागी)

## डेफलिम्पिक नेमबाजी

**टोकियो, १९ नोव्हेंबर**

येथे सुरु असलेल्या २५ व्या डेफलिम्पिकमध्ये भारतीय नेमबाजांनी आपली उत्तम कामगिरी कायम राखली. बुधवारी अभिनव देशवाल व प्रांजली प्रशांत धुमलने १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक जिंकले, तर कुशाग्र सिंग राजावतला ५० मीटर रायफल प्रोन प्रकारात कांस्यपदकावरप समाधान मानावे लागले. या स्पर्धेत आतापर्यंत भारतीय नेमबाजांनी एकूण ११ पदके जिंकली आहेत. अभिनव आणि प्रांजलीने चीन तैपेईच्या या-जू काओ व मिंग-जुई हसू या जोडीवर १६-६ असा विजय मिळवत अव्वल स्थान पटकावले.

कुशाग्राने २२४.३ अशा अंतिम गुणांसह कांस्यपदक मिळविले. युक्रेनच्या दिमित्र पेट्रेन्कोने २५१.० गुणांसह सुवर्णपदक जिंकले व डेफ वर्ल्ड आणि ऑलिम्पिक विक्रम मोडला. जर्मनीच्या कॉलिन मुलरने २४५.४ गुणांसह रौप्यपदक जिंकले. सुवर्णपदकासाठीच्या अंतिम सामन्यात प्रारंभापसूनच अभिनव व प्रांजलीने आपले वर्चस्व राखले आणि कधीही आपल्या प्रतिस्पर्ध्यांना मुसंडी मारण्याची संधी दिली नाही. या जोडीने यापूर्वी पात्रता फेरीत स्वतःच्या डेफ विश्व व ऑलिम्पिक विक्रमाची बरोबरी केली होती. त्यांनी ५६९-२० गुणांसह एकत्रित गुण मिळवले, अभिनवने २८७-१२ गुणांसह (९७,९५,९५) आणि प्रांजलीने २८२-८ गुणांसह (९५,९४,९३) गुणांसह पात्रता फेरीत अव्वल स्थान पटकावले. सोमवारी वैयक्तिक प्रकारात दोन्ही नेमबाजांनी रौप्यपदकेही जिंकली होती. महिला वैयक्तिक विजेती अनुया प्रसाद व रुदर विनोद कुमारचा समावेश असलेली दुसरी भारतीय जोडी ५५३-१० गुणांसह पात्रता फेरीत केवळ सातव्या स्थानावर राहू शकली. अनुया २८०-५ गुणांसह (९३,९१,९६) व रुदरने २७३-५ गुणांसह (९२,९०,९१) गुण मिळवले. इराणच्या महला समी आणि बिजान गफारीने युक्रेनच्या सोफिया ओलेनिच व अलेक्झांडर कोलोदीवर मात करून कांस्यपदक जिंकले. महित संधू व नताशा जोशी गुरुवारी ५० मीटर ३ पोझिशन महिला स्पर्धेत आपले नशीब अजमावणार आहे. महितने यापूर्वी १० मीटर एअर रायफल मिश्र सांघिक आणि वैयक्तिक प्रकारात अनुक्रमे सुवर्ण व रौप्यपदक जिंकले आहे.



# एम २ ब्लास्टर्स संघ विजेता

## प्रिसिजन प्रीमिअर लीग सिझन-३

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

प्रिसिजन प्रीमिअर लीग सिझन-३ या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत एम २ ब्लास्टर्स संघाने विजेतेपद पटकाविले.

प्रिसिजन फाउंडेशनच्या वतीने ही स्पर्धा आयोजित केली होती. जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात एम २ ब्लास्टर्स संघाने एम ३ रॉयल्स संघावर मात केली. सुरुवातीला फलंदाजी करताना एम ३ रॉयल्स संघाने ५ गडी गमावत ७१ धावा केल्या . प्रत्युत्तरात एम २ ब्लास्टर्सने संयमी आणि अचूक खेळ करत केवळ ५ गडींच्या मोबदल्यात विजय मिळवला.

बक्षीस समारंभ प्रिसिजनचे मुख्य वित्त अधिकारी रवींद्र जोशी, अकाऊंट विभागाच्या उपव्यवस्थापिका आरोही देवस्थळी, मनुष्यबळ विकास विभागाचे वरिष्ठ व्यवस्थापक राजकुमार काशिद, तसेच जनसंपर्क विभागाचे माधव देशपांडे आणि विनायक दुदगी यांच्या हस्ते संपन्न झाला.

**वैयक्तिक बक्षिसाचे मानकरी**

मॅन ऑफ द मॅच : महेश फापागिरे
मॅन ऑफ द सीरिज : किरण पवार
उत्कृष्ट गोलंदाज : विक्रम बोंडगे (८ विकेट)
उत्कृष्ट फलंदाज : आकाश सुतार (१४७ धावा)

# वखारिया विद्यालय उपळे दुमालास विजेतेपद

## डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त शालेय खो-खो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ नोव्हेंबर-**

शालेय खो-खो स्पर्धेत उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयाने १४ वर्षांखालील गटात विजेतेपद व १७ वर्षांखालील गटात उपविजेतेपद संपादिले. संघास क्रीडा विभाग प्रमुख महाले यांचे मार्गदर्शन लाभले.

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र विद्यालय, बार्शी यांच्या वतीने ही स्पर्धा शिवशक्ती मैदान येथे पार पडली. या स्पर्धेत सोलापूर जिल्हा व धाराशिव जिल्ह्यामधील सर्व शाखेतील संघांनी सहभाग घेतला होता.




या स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती धावणे यांच्या हस्ते झाले. बक्षीस वितरण सोलापूर जिल्हा तालुका क्रीडाधिकारी सचिन रणदिवे व संस्था सदस्य भालके यांच्या हस्ते झाले व विजेत्या संघाचे व मार्गदर्शक शिक्षकांना मुख्याध्यापक रेवडकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# राज्य शालेय खो-खो स्पर्धेत वाडीकुरोलीच्या वसंतराव काळे प्रशालेस उपविजेतेपद

## दोघींची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

राज्य शालेय खो-खो स्पर्धेत वाडीकुरोली (ता. पंढरपूर) येथील वसंतराव काळे प्रशालेने १४ वर्षांखालील मुलींच्या गटात उपविजेतेपद संपादिले. यातून ऋतुजा सुरवसे व कार्तिकी यलमार यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली.

परभणी येथे झालेल्या स्पर्धेत त्यांनी ही कामगिरी केली. त्यांना क्रीडा शिक्षक अतुल जाधव यांचे मार्गदर्श लाभले. त्यांचे श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कल्याणराव काळे, सचिव बाळासाहेब काळे, सर्व संचालक, प्राचार्य एस. आर. कुलकर्णी, पर्यवेक्षक. एस. एम. शेख यांनी अभिनंदन केले.



**उपविजयी संघ :** ऋतुजा मारुती सुरवसे ,कार्तिकी मारुती यलमार, श्रेया मनोहर यलमार भक्ती ज्योतीराम चौधरी, समृद्धी गणेश यलमार ,श्रावणी संतोष काळे ,सायली राजेंद्र सातपुते ,धनश्री दयानंद क्षिरसागर, मेहजबीन अझहर मणियार, अंकिता लालासो नाईक नवरे ,ईश्वरी नवनाथ काटकर ,समृद्धी शरद यलमार



# जि.प. जळोली शाळेस दुहेरी मुकुट

## लंगडी मोठा गट मुले व मुली गटात विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.१९ नोव्हेंबर-**

जिल्हा परिषदेच्या क्रीडा स्पर्धेत जळोली शाळेन लंगडीच्या मोठया गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. या कामगिरीवर संघाची बीटस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली,

करकंब विद्या विकास मंदिर उंबरे पागेच्या प्रांगणात झालेल्या या स्पर्धेत लंगडी, खो-खो, कबड्डी व बुद्धीबळ आदी स्पर्धांचे १ली ते ५वी,६वी ते ८वी या दोन गटात आयोजन केले होते. शाळेने लंगडी लहान गटात मुले मुलीमध्ये व खो-खो मोठा गटातही उपविजेतेपद संपादिले. वैयक्तिक स्पर्धेत पूर्वा मनोज नरसाळे, संघर्ष केशव नरसाळे यांनी धावणेमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. या स्पर्धांना पंढरपूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हनुमंत नरसाळे यांनी यावेळी भेट दिली. विद्या विकास मंदिर उंबरे पागेचे मुख्याध्यापक शहाजी पाटील, उंबरे केंद्राचे केंद्रप्रमुख पा.वा. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक अनिल जगताप, शिक्षक ज्ञानेश्वर दुधाणे, जयवंत कापसे, नागनाथ गायकवाड, सिध्देश्वर लोंढे, कैलास नरसाळे, बाळासाहेब खांडेकर, शिक्षिका देवकी कलढोणे (दुधाणे) यांनी परिश्रम घेतले.

# वळसंग कन्नड व लिंबीचिंचोळीस दुहेरी मुकुट

## जिल्हा परिषद वळसंग केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. १९ नोव्हेंबर-**

जिल्हा परिषदेच्या वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत कबड्डी लहान गटात वळसंग कन्नड व लिंबीचिंचोळी प्रशालेने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

वळसंग श्री शंकरलिंग प्रशालेत ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेचे उद्घाटन प्रशालेचे मुख्याध्यापक विरेश थळंगे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख इंद्रसेन पवार होते. उद्घाटनानंतर सर्व खेळाडूंना क्रीडा शपथ देण्यात आली. यावेळी घोडके, अमिन पटेल उपस्थित होते. या स्पर्धा पार पाडण्यासाठी क्रीडा अधिकारी कस्तुरे, सहाय्यक क्रीडाधिकारी म्हेत्रे, पंच भिमराव पाटील, थोरात, राठोड, गाडवे, गणेर, अशोक नरुटे, श्रीमती रणदिवे, श्रीमती कुनाळे, श्रीमती चव्हाण श्रीमती तोळणूरे, सौ. वाले, गुणलेखक व वेळाधिकारी म्हणून काम पाहिले.



**अंतिम निकाल याप्रमाणे (विजयी व उपविजयी) : लहान गट : सांघिक :** कबड्डी : मुले : वळसंग कन्नड, नाईकनगर. मुली : वळसंग कन्नड, वळसंग मराठी. लंगडी : लहान गट मुले : लिंबी चिंचोळी,तिर्थ मराठी. मुली : लिंबी चिंचोळी, तिर्थ मराठी. खोखो : लहान गट मुले : वळसंग मराठी, वळसंग उर्दू. मुली : वळसंग मराठी.

**वैयक्तिक :** १०० मी धावणे : लहान गट मुले : मोहमदअली पाटील (लिंबी चिंचोळी), कार्तिक किणगी (वळसंग कन्नड). मुली : ईश्वरी दारफळे (लिंबी चिंचोळी), रागिणी सोनकांबळे (वळसंग मराठी). २०० मी धावणे मुले : मोहमदअली पाटील (लिंबी चिंचोळी), कार्तिक किणगी (वळसंग कन्नड). २०० मीटर धावणे मुली : इश्वरी दारफळे (लिंबीचिंचोळी), रागिणी सोनकांबळे. बुद्धिबळ : मुली : स्वराली बिराजदार (तिर्थ मराठी), ईशानी गोतसर्वे (आचेगाव), महेतबीन पाटिल (लिंबी चिंचोळी मराठी). मुले : श्रीराम बिराजदार (तिर्थ मराठी), आरमान मुल्ला (लिंबी चिंचोळी), सारंग पाटील (आचेगाव).

**मोठा गट : सांघिक :** कबड्डी मोठा गट मुले : तिर्थ मराठी, वळसंग कन्नड. मुली : तिर्थ मराठी, वळसंग मराठी. लंगडी मुले : लिंबीचिंचोळी, वळसंग कन्नड. मुली : लिंबीचिंचोळी, वळसंग उर्दू. खोखो मुले : वळसंग मराठी, मुली : वळसंग मराठी, वळसंग उर्दू. **वैयक्तिक :** १०० व २०० मीटर धावणे मुले : सैपन कंडे (लिंबी चिंचोळी), खदिर शेख (वळसंग मराठी). मुली :

ऐश्वर्या दारफळे (लिंबी चिंचोळी), संगमेश्वरी स्वामी (वळसंग कन्नड). बुद्धीबळ : मुले : विशाल शिरूर (वळसंग मराठी),

उमर फुलारी (तिर्थ मराठी), सुमित हिरेमठ (लिंबीचिंचोळी). मुली : ओजस्वी बोराळे (तिर्थ मराठी), शबेनुर मंद्रुपकर (लिंबीचिंचोळी).



# ‘फॅबटेक’च्या विद्यार्थ्यांची मैदानी स्पर्धेत कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१९ नोव्हेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे अंतर्गत शेळवे (ता.पंढरपूर) येथे झालेल्या विविध मैदानी स्पर्धेत फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला येथील अभियांत्रिकीतील १४ विद्यार्थ्यांनी कामगिरी केली.

त्यांना क्रीडा शिक्षक मोहन वाघमारे व बिरा वगरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेच्या अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ. अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा.प्राजक्ता रूपनर, प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे, उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर, पॉलिटेक्निकचे प्राचार्य तानाजी बुरूंगले यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी :** शेखर लवटे (थाळी फेक, प्रथम), सायली वाघमोडे (तृतीय), सिद्धार्थ उपासे (शंभर मिटर धावणे, द्वितीय), धनश्री बजबळकर (दोनशे मिटर धावणे), सोहम आसबे (१५०० मीटर धावणे, तृतीय), उमेश मासाळ (पाच हजार मिटर धावणे, द्वितीय), सोनम पाटील (गोळा फेक तृतीय व भालाफेक द्वितीय), निकिता शिंदे (तृतीय), कोमल जगदाळे (तिहेरी उडी, तृतीय). ४ बाय १०० मीटर रिले : मुले द्वितीय (संकेत कारंडे, सिद्धार्थ उपासे, बाळासाहेब शिंदे, सुयश ढाकळे, विश्वास कोरे). मुली तृतीय (प्रतिक्षा होळकर, नेहा जाधव, धनश्री बजबळकर, कोमल जगदाळे, पूर्वा इनामदार, पूजा शेंडगे).

# छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजला सर्वसाधारण विजेतेपद; वेटलिफ्टिंग स्पर्धेतील कामगिरी



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धेत छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या वेटलिफ्ट्सरनी सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. महिलांनी तीन सुवर्ण, दोन रौप्य तर पुरुषांनी चार सुवर्णपदके पटकाविली. त्यांना प्रा. संतोष गवळी, प्रा सचिन गायकवाड, मारुती घोडके, नितीन गोरे यांच्या मार्गदर्शन लाभले. त्यांचे मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष मनोहर सपाटे, जनरल सेक्रेटरी प्रा. महेश माने, खजिनदार महादेव गवळी प्राचार्य डॉ.अरुण मित्रगोत्री यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी : महिला :** आर्या इब्राहम इब्रामपूरकर (५८ किलो), हर्षिता पठारे (६३ किलो), प्रांजली पगारे ८६ किलोवरील (सुवर्ण). साक्षी आहेरवाडी (७७ किलो) वैष्णवी माने (८६ किलो, रौप्य). पुरुष : हार्दिक लबडे (६० किलो), आर्यन सणस (७१ किलो), आयुष मुरूमकर (८८ किलो) आदित्य चव्हाण (११० किलोवरील, सुवर्ण).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### बोरीउमरगेत गुरूवारी धानेश्वरी देवी यात्रा महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१९ नोव्हेंबर-**



तालुक्यातील बोरी उमरगे मिरजगी फाटा येथील जागृत श्री धानेश्वरी देवी चेट्टी आमवस्या यात्रा महोत्सव निमित्त गुरुवारी दि.२० रोजी म. नी. प्र. बसवलिंग महास्वामीजी वीरक्त मठ अक्कलकोट यांच्या नेतृत्वाखाली विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केल्याची माहिती वे. इरय्या मठपती स्वामी यांनी दिली. गुरुवार दि.२० रोजी पहाटे श्री धानेश्वरी देवीस महारुद्रभिषेक होणार असून सकाळी ९ वा. ध्वजारोहण होणार आहे. दुपारी ११ वाजता श्री धानेश्वरी देवी पालखी व पुरवंत मिरवणूक कार्यक्रम होणार आहे. दुपारी बारा नंतर सिद्धाराम मसुती यांचेकडून महाप्रसाद वाटप होणार आहे. सर्वांनी या धार्मिक कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.



### अक्कलकोटला आदर्श भक्तीपीठ करणार

**नगराध्यपदाचे राष्टावादी (शप)चे उमेदवार इकरार शेख यांची घोषणा**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ नोव्हेंबर**

स्वामी समर्थांची अक्कलकोट नगरी स्वच्छ सुंदर आणि आदर्श भक्ती पीठ व्हावे यासाठी आपण कार्यरत राहणार आहे. असे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार इकरार शेख यांनी केले. शेख पुढे म्हणाले की, मी नेहमी मंत्रलयात जात असतो स्वामी समर्थ भक्तांसाठी सोई सुविधा देण्यासाठी प्रयत्न करणार असून शहरात अस्वच्छता, खड्डे, मोकाट जनावरे दहा दिवसाला पाणी. नगरपालिका शाळांची गुणवत्ता खालावली आहे. भूयारी गटारांची कामे उत्तम दर्जाची झाली पाहिजे. जाणीवपूर्वक रेंगाळलेली रस्त्यांची कामे आदी अनेक समस्या आहेत.यासाठी प्रयत्न करणार आहे.स्वामी समर्थ दर्शनासाठी लाखो भाविक येतात पण चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध नाहीत. या सर्व सोई सुविधा देण्यासाठी मी राष्ट्रवादी शरद पवार गटा कडून उभे आहेत. त्यासाठी आपण जनसेवेसाठी कार्यरत राहण्यासाठी मला मोट्या मतधिक्काने विजय करा अशी ग्वाही इकरार शेख यांनी दिली. यावेळी दुधनी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजेंद्र इंगळे यांनी आपण दुधनी आदर्श शहर बनविण्याचे अभिवचन दिले.या वेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष बंदेनवाज कोरबू सौरभ लांडगे आदी उपस्थित होते.

### सहकार भारतीचे संस्थापक सदस्य वसंत देवधर यांचे निधन

**पुणे, दि. १९ नोव्हेंबर-**



सहकार भारतीचे संस्थापक सरचिटणीस, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते, जनसेवा सहकारी बँकेचे पहिले कार्यकारी संचालक वसंत नारायण देवधर (वय ९१) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे त्यांचे पुतणे भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते, पूर्व राष्ट्रीय सचिव सुनील देवधर, आनंद आणि विवेक देवधर आहेत. महाराष्ट्रातील अनेक बँकांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण कार्यक्रम घेतले. महाराष्ट्राबरोबरच त्यांनी आसाममध्ये देखील नागरी बँक सुरू केली होती. संघाच्या घोष वादनामध्ये देखील त्यांचा विशेष हातखंडा होता. संघकार्य आणि सहकार चळवळीशी संबंधित असंख्य पुस्तके, अहवाल, जुने रेकॉर्ड त्यांनी जपून ठेवले होते.

## निधन वार्ता...

### गौराबाई म्हेत्रे

**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**



येथील गौराबाई सिद्धेश्वर म्हेत्रे (वय ६५) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन विवाहीत मुले, तीन विवाहीत मुली, सुना, नातवंडे असा परीवार आहे. राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त विज्ञान शिक्षक सिद्धेश्वर म्हेत्रे यांचे पत्नी होत. गुरूवारी दुपारी एक वाजता मळसिध्द मंदिरजवळ म्हेत्रे वस्तीतील शेतात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

### संजय डुरे-पाटील

**वैराग, दि. १९ नोव्हेंबर-**



बार्शी तालुक्यातील इर्ले येथील संजय साहेबराव डुरे- पाटील (वय ५५) यांचे अल्प आजाराने निधन झाले. इर्ले सोसायटीचे चेअरमन व ग्रामपंचायतचे उपसरपंच म्हणून काम केले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगाअसा परिवार आहे. न्यू इंग्लिश स्कुल उंडेगावाचे मुख्याध्यापक विजयकुमार डुरे-पाटील यांचे तसेच शेतकरी कामगार पक्षाचे जेष्ठ नेते कै. भाई सुभाष डुरे पाटील यांचे ते चुलत भाऊ, जेष्ठ बंधू होत.

### सिद्धाराम ढमामे

**सोलापूर, दि.१९ नोव्हेंबर-**



सिद्धाराम मल्लपा ढमामे (वय ६८) यांचे१९ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुली, दोन मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे. वृत्तपत्र विक्रेता भीमाशंकर ढमामे यांचे ते चुलते होत.

### कमल अस्वरे

**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**



विजापूर रोडवरील आदित्य नगर येथील कमल श्रीरंग अस्वरे (वय ८२ ) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात २ मुले, ४ मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे. गुरुवारी सकाळी ११ वाजता मोदी स्मशाभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

# जिल्ह्यातील साखर कारखानदारांचे दराबाबत अद्यापही मौन

## जिल्हाधिकाऱ्यांचा ३० तारखेचा अल्टीमेटम; शेतकरी संघटना आंदोलनाच्या पवित्र्यात

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.१९ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील जवळपास ४० पैकी २५ साखर कारखान्यांचा गळीत हंगाम दर न जाहीर करता सुरळीतपणे सुरू आहे. शेजारच्या जिल्ह्यातील कारखान्यांनी दर जाहीर करुनच गळीत हंगाम सुरू केला पण सोलापूर जिल्ह्यातील एकाही साखर कारखान्याने यंदाच्या गळीत हंगामात पहीली उचल तसेच अंतीम दर जाहीर केला नाही. जिल्ह्यातील कारखानदारांनी दराबाबत कायमच मौनी भुमिका का घेतात असा प्रश्न ऊस उत्पादक शेतकऱ्यातून विचारला जात आहे. याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी ३० नोव्हेंबरपर्यंत दर जाहीर करण्याचा अल्टीमेटम दिला आहे. तोपर्यंत दर जाहीर न झाल्यास शेतकरी संघटना आंदोलनाच्या तयारीत आहेत.

हंगाम सुरू होऊन जवळपास १८ दिवस झाले आहेत. यामध्ये १५ लाख ९१ हजार ७७ हजार मेट्रिक टन ऊसाचे गाळप झाले आहे.ऊस दरासाठी सोलापूर जिल्ह्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आंदोलन केले दरासाठी माळशिरस तालुक्यातील शेतकरी संघटनेने तर सर्व कारखान्यास निवेदन दिले होते तसेच ऊस वाहतूक सुद्धा रोखली होती. तरीही एकाही साखर कारखानदारांनी ऊस दर जाहीर करण्याची तसदी घेतली नाही. ऊस दराबाबत सर्व शेतकरी संघटना आक्रमक झाल्या आहेत. पण सोलापूर जिल्ह्यातील कारखानदार काही केल्या जुमानत नाहीत. दराबाबत सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सर्व कारखानदारांना ३० नोव्हेंबर पर्यंत दर जाहीर करण्याचा अलटीमेटम दिला आहे. पण अजुन एकाही कारखानदाराने दरच जाहीर केलेला नाही. इतर शेजारच्या जिल्ह्यातील साखर कारखानदारापेक्षा सोलापूर जिल्ह्यातील कारखानदार ५०० प्रतिटन दर कमी देतात. खरेतर सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्रात



सर्वाधिक ४० साखर कारखाने असणारा जिल्हा म्हणुन नावलौकिक पण ऊस दर देण्यात सर्वात मागे असणारा जिल्हा हा सुद्धा ह्या जिल्ह्याचा नावलौकिक म्हणावा लागेल. शेजारच्या जिल्ह्यातील दराची स्थिती जरंडेश्वर ( सातारा) ३५००, सोमेश्वर (पुणे) ३५८३, राजाराम बापु (सांगली) ३५००, बिंद्री सहकारी (कोल्हापूर) ३६००. सोलापूर जिल्ह्याच्या लगत असणाऱ्या जिल्ह्यात प्रतिटन जवळपास ५०० ते ६०० रुपये टन एवढा जास्तीचा दर शेतकऱ्यांना मिळतो मग सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारच ऊसाला चांगला दर का देत नाहीत असा प्रश्न सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी विचारीत आहेत.

जिल्ह्यातील साखर कारखानदार वेगवेगळ्या राजकीय पक्षात आहेत. मग दर देताना ते एक कसे होतात हा आत्मचिंतनाचा विषय आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे जिल्ह्यातील साखर कारखानदार दरवर्षीच गळीत हंगाम सुरू करताना दर जाहीर करुनच गळीत हंगाम सुरू करतात मग सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारांना काय होते. सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारांवर आंदोलनाची दरवर्षीच वेळ का येते हा मोठा गंभीर प्रश्न आहे.

# आदर्श आचासंहितेचे पालन करा

## उपअधीक्षक वाळके यांचे आवाहन



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १९ नोव्हेंबर-**

राजकीय पुढाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनीही आदर्श आचासंहितेचे पालन करणे पोलिसांना अपेक्षीत असल्याचे उपअधीक्षक संतोष वाळके यांनी पत्रकार परिषदेमध्ये सांगितले.

नगर परिषद, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भयमुक्त व भ्रष्टाचार विरहीत होण्याच्या दृष्टीने पोलीस प्रशासन सज्ज आहे.मात्र मतदारांनी त्यांना या संदर्भात आलेल्या कोणत्याही अडचणी बाबत तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन येथील पोलीस उप अधीक्षक संतोष वाळके यांनी केले आहे.

राजकीय पुढाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनीही आदर्श आचासंहितेचे पालन करणे पोलिसांना अपेक्षीत आहे.त्यांनी मतदारांना प्रलोभने,आमिषे दाखवू नयेत,समाजात मतदारांत त्यांनी दहशत निर्माण करू नये.यासाठी मागील रेकॉर्ड वरून जवळपास ३५० गुन्हेगारांवर कारवाया केल्या आहेत.तडीपारीचे आणखी २५ प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. शिवाय शांततेचा भंग करणार नसल्याचे अनेकांकडून बंधपत्र घेतले आहेत.

फिरत्या पथकासारखी विविध पथके तयार केली आहेत.माळशिरस तालुक्यातील इतर पोलीस ठण्यांबरोबरच आणखी जादा पोलीस कुमक मागवण्यात आली आहे.शहरातील १०५ पैकी शस्त्र जमा करून घेतली आहेत. शहरातील १४ मतदान केंद्र संवेदनशील म्हणून जाहीर करण्यात आली आहेत.त्यामुळे अशा परिस्थितीत या निवडणुका निर्विघ्न पार पाडण्याच्या दृष्टीने नागरिकांनीही सतर्क रहात अवैध शस्त्र वा अवैध पैशांचा वापर अगर अन्य कोणत्याही अडचणी दिसल्यास तातडीने पोलिसांना संपर्क करावा, पोलीस त्यांचे नाव गुप्त ठेवतील असे आवाहन त्यांनी केले.यावेळी अकलूज पोलीस निरीक्षक नीरज उबाळे हे ही उपस्थित होते.



# सांगोला विद्यामंदिरकडून सांगोला आगारास बाक भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१९ नोव्हेंबर -**

सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेज यांच्या तर्फे सांगोला बसस्थानक परिसरात प्रवाशांच्या सोयीसाठी बाक भेट देण्यात आले.

प्राचार्य अमोल गायकवाड यांच्या हस्ते सांगोला आगारचे सहा.वाहतूक अधिक्षक पंकज तोंडे, वाहतूक नियंत्रक प्रशांत चंदनशिवे यांना सदर बाक देण्यात आले. यावेळी सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेज येथील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# तरुणांची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या आरोपीचा जामीन अर्ज सत्र न्यायालयाने फेटाळला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ नोव्हेंबर-**

येथील अनेक तरुणांची लाखो रुपये घेऊन रेल्वेत नोकरी लावतो असे सांगून बनावट कागदपत्रे देऊन फसवणूक करणाऱ्या आरोपीचा जामीन अर्ज जिल्हा सत्र न्यायालयाने फेटाळला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास अधिकारी यांनी तपास पूर्ण करुन दोषारोप बार्शी न्यायालयात दाखल केले.




पांगरी पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, फिर्यादी बार्शी येथील खाजगी बँकेमध्ये डेप्युटी मॅनेजर या पदावर काम करत असून त्याची तोंड ओळख असलेला समाधान बालाजी वट्टमवार, रा. सुभाषनगर, बार्शी याने रेल्वेत नोकरीला आहे, असे सांगून फिर्यादीस देखील रेल्वेत नोकरी लावतो असे म्हणून त्यास विश्वासात घेऊन, तुला रेल्वेमध्ये सुरक्षा ठेव म्हणून सात हजार रुपये भरावे लागतील असे सांगून फिर्यादीकडून पैसे घेतले व फिर्यादीस रेल्वेचा शिक्का असलेली पावती त्याने दिली. त्यामुळे फिर्यादीचा आरोपीवर विश्वास बसला. तसेच आरोपी वारंवार आणखी रक्कम घेत गेला. फिर्यादीची कुर्डूवाडी येथे ज्युनिअर अकाउंटंट या पदावर नेमणूक केलेली आहे, त्यासाठी एकूण दोन लाख चौऱ्याऐंशी हजार रुपये लागतील व तुला ७३,०००/- रुपये पगार मिळेल असे सांगितले. या दरम्यान फिर्यादीने आरोपीस एक लाख एक्काहत्तर हजार रुपये एवढी एकूण रक्कम दिलेली होती व आरोपीने फिर्यादीस रेल्वेमध्ये नोकरी लागल्याबद्दलचे जॉइनिंग लेटर व अग्रीमेंट लेटर दिले. ही कागदपत्रे घेऊन फिर्यादीने रेल्वे विभागात चौकशी केली असता त्यास समजले की, सर्व कागदपत्रे बनावट असुन आपली फसवणूक झालेली आहे. याबाबत फिर्यादीने पांगरी पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली आहे. त्यानंतर आरोपीस पोलिसांनी अटक करुन अधिक तपास केला असता आणखी काही तरुणांची फसवणूक झाल्याचे तपासात निष्पन्न झाले. यातील फसवणुकीची एकूण रक्कम ३३,३९,१२६/- रुपयांपर्यंत पोहोचली. आरोपी समाधान बालाजी वट्टमवार याने दोषारोपपत्र न्यायालयात दाखल झाल्यानंतर बार्शी येथील जिल्हा सत्र न्यायालयात त्याचे विधीज्ञ यांचेमार्फत जामीन अर्ज दाखल केला होता. या अर्जावर सुनावणी दरम्यान या घटनेतील फसवणूक झालेले तरुण यांनी जामीन अर्जावर हरकत घेऊन विधीज्ञांमार्फत न्यायालयात आपले म्हणणे मांडले. हरकतदार यांचे विधीज्ञ आणि सरकारी वकील यांनी आरोपीचा जामीन अर्ज फेटाळण्यासाठी जोरदार युक्तिवाद केला. सरकारी पक्षाच्या व हरकतदार यांचेवतीने विधीज्ञांनी न्यायालयासमोर आरोपीच्या कृत्यामुळे हरकतदार प्रसन्न लुंगारे व सौरभ महंकाळे व फिर्यादी यांना झालेला मानसिक, आर्थिक त्रास आणि साक्षीदारांच्या सुरक्षिततेविषयी उपस्थित झालेला धोका यावर जोर दिला. यावर जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. व्ही. के. मांडे यांनी सरकारी वकील आणि हरकतदार यांचे वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर केला. या प्रकरणात हरकतदारांचेवतीने ॲड. सुहास कांबळे, सरकारी पक्षातर्फे ॲड. दिनेश देशमुख यांनी काम पाहिले.




# आर्या फार्मसीच्या विद्यार्थ्यांची लकी हॉस्पिटलला भेट

**तभा वृत्तसेवा,**
टेंभुर्णी, दि.१९ नोव्हेंबर-

टेंभुर्णी (ता.माढा) येथील आर्या कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी कुर्डूवाडी येथील अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या लकी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलला भेट दिली. हॉस्पिटलमध्ये विद्यार्थ्यांना विविध विभागाची तसेच उपकरणांची सखोल माहिती मिळाली. सोनोग्राफी, सिटीस्कॅन, आय सी यु विभाग, शस्त्रक्रिया विभाग, डिजिटल एक्स-रे, इमर्जन्सी वार्ड, ऑपरेशन थिएटर या गोष्टी प्रत्यक्ष पाहायला मिळाल्या. डॉ. लकी जोशी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांना हॉस्पिटलमधील कामकाजाची सखोल माहिती दिली. हॉस्पिटलमध्ये मिळालेल्या माहितीमुळे ज्ञानात भर पडल्याची प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य धनंजय चव्हाण यांनी आभार व्यक्त केले.

यावेळी प्रा. तुषार कन्हेरे, प्रा. हर्षवर्धन वाघमारे, प्रा. संजीवनी कुटे, प्रा. अमृता कसबे, विजय शिंदे, अक्षय गुड, आयेशा शेख उपस्थित होते. समन्वयकाचे काम प्रा. तुषार कन्हेरे यांनी केले.

# बार्शी नगरपरिषदेत एकाचा अर्ज मागे, १६९ अर्ज शिल्लक

**बार्शी, दि. १९ नोव्हेंबर-**

बार्शी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी दाखल झालेल्या २९६ अर्जापैकी १०७ अर्ज छाननीमध्ये बाद झाले. तर १७० अर्ज शिल्लक राहिले आहेत. त्यापैकी प्रभाग १७ ब मधील प्रकाश भगवान माने यांनी बुधवारी आपला अर्ज मागे घेतला. त्यामुळे नगरसेवक पदासाठी सध्या १६९ अर्ज राहिल्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तैमुर मुलाणी यांनी सांगितले. बार्शी नगर परिषदेच्या ४२ नगरसेवकांचा नगरसेवकांच्या जागांसाठी तब्बल १६९ उमेदवार रिंगणात उरले आहेत. शुक्रवारी दि. २१ रोजी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यानंतरच खरे चित्र स्पष्ट होणार आहे. परंतु तरीही सध्या बार्शीत भाजप-सेना महायुती विरुद्ध शिवसेना- राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष यांच्यातच तुल्यबळ लढत होणार असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

# हिंदवी स्वराज्याचा इतिहास शिक्षणात समाविष्ट करण्यासाठी मुख्यमंत्री, शिक्षणमंत्र्यांकडे प्रस्ताव

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १९ नोव्हेंबर-**

महाराष्ट्राच्या शालेय अभ्यासक्रमात इ.स. १५९२ ते १८५७ या कालखंडातील हिंदवी स्वराज्याचा तेजस्वी आणि गौरवशाली इतिहास समाविष्ट करण्यात यावा यासाठी संस्थापक अध्यक्ष मारुती सिंधुबाई दिंगबर सुरवसे यांच्या अभ्यासातुन शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थान तर्फे राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्याकडे मंत्रालयात दस्तऐवजीकरणांवर आधारित आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात आला.

प्रस्तावात इ.स.१५९२ ते १८५७ पर्यंतचा इतिहास, दुर्गनिर्मिती व दुर्ग तंत्र, न्यायव्यवस्था, लष्करी संघटन, समुद्री सामर्थ्य, स्त्री संरक्षणाची धोरणे, कृषीव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि सामाजिक सुधारणा यांचा सखोल अभ्यास विद्यार्थ्यांना मिळावा, असा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच शिंदे, होळकर, भोसले, पवार आदी मराठा घराण्यांनी स्वराज्याचा विस्तार अखिल भारतात कसा साधला, याबाबत अनुभवाधारित अध्यापनाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे.

याप्रसंगी शिवसेवक प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष मारुती सुरवसे, उपाध्यक्ष अशोक झाडे, नाशिक विभाग प्रमुख अभिजीत महाले, आणि पनवेल विभाग प्रमुख सुरेश जगदाळे उपस्थित होते. प्रस्तावाच्या सादरी करणावेळी प्रतिष्ठानतर्फे विद्यार्थ्यांना इतिहास फक्त घटनांच्या पाठांतरापुरता मर्यादित न ठेवता राष्ट्रभान, नेतृत्वगुण आणि जबाबदारीची जाणीव देणारा विषय बनविण्यावर भर देण्यात आला. प्रस्तावात अनुभवाधारित शिक्षणासाठी किल्लाभेटी, ऐतिहासिक प्रकल्प, नकाशाभिवाचन, डिजिटल स्वराज्य मॉड्यूल्स, ऐतिहासिक सादरीकरणे आणि वर्गाबाहेरील अभ्यास उपक्रमांचा समावेश करण्याची शिफारस करण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना इतिहास शिकण्यापेक्षा जगण्यासारखा वाटेल, असे सुरवसे यांनी स्पष्ट केले.

या प्रस्तावाच्या प्रत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्यांसह राज्यातील २६ मंत्री, आमदार आणि विधानपरिषद सदस्यांना देखील देण्यात आली असून, हा शिक्षण विषयक उपक्रम राज्यस्तरावर व्यापक चर्चेला येत आहे. विशेष म्हणजे विधानपरिषद सदस्य भाजपा महासचिव आ.विक्रांत पाटील आणि दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांनी या प्रस्तावावर तातडीने सकारात्मक कारवाई करण्यासाठी मुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्यांना अधिकृत शिफारस पाठवली आहे.

राज्यभरातील विविध हजारो शिवसेवक, विविध सामाजिक संस्था, इतिहासकार आणि विद्यार्थ्यांच्या पालकांकडून या उपक्रमास मोठा प्रतिसाद मिळत असून, शालेय शिक्षण विभागाने प्रस्तावाचा गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी वाढत आहे. प्रस्ताव स्वीकारला गेल्यास राज्यातील विद्यार्थ्यांसाठी स्वराज्य इतिहासाचा अभ्यास केवळ पुस्तकापुरता न राहता संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासाचा महत्त्वपूर्ण घटक ठरणार आहे. या प्रस्तावामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात स्वराज्यकालीन प्रशासन, नेतृत्व, राष्ट्रभान, सहिष्णुता, धैर्य आणि सामाजिक मूल्यांची सखोल पायाभरणी होईल, असा विश्वास शिवसेवक प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष मारुती सुरवसे यांनी व्यक्त केला आहे. शिक्षण क्षेत्रात एक ऐतिहासिक बदल घडवू शकणारी ही पहिली राज्य सरकारच्या निर्णयाची प्रतीक्षा करत आहे.

## महत्वाचे...



### कौशल्यातून यशाचा मार्ग; दमाणी अंधशाळेत प्रा. धन्यकुमार बिराजदार यांचा कानमंत्र

**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

नुसते डोळे असण्यापेक्षा दृष्टी असणे आवश्यक असून याच दृष्टीमुळे मनुष्य विविध क्षेत्रात यश संपादन करू शकतो. आयुष्यात मनाच्या शक्तीची ओळख करून घेण्यासाठी भौतिक चक्षुपेक्षा अंतर्गत चक्षूंची गरज असते, असे मत हरिभाई देवकरणचे प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी भैरूरतन ज्ञानज्योती ग्रामीण अभिवृद्धी संस्था व दमाणी अंधशाळा, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमात संस्थेचे सचिव संतोष भंडारी, मुख्याध्यापक प्रकाश दर्शनाळे, प्रोजेक्ट मॅनेजर ज्योती जाधव, गीतांजली यादव उपस्थित होते. यावेळी प्रा. बिराजदार यांनी जगातील विविध क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींच्या यशोगाथेवर प्रकाश टाकला. आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेत दिव्यांग विद्यार्थ्यांनी साहित्य, उद्योग, संगीत, निवेदन यासह विविध क्षेत्रात आपली ओळख निर्माण करावी. आपण डोळ्यांनी बाहेरचे जग पाहतो पण सुप्त शक्तीची ओळख दिव्यांग विद्यार्थी सहज करून घेऊ शकतो. विविध स्पर्धा परीक्षेत दिव्यांग विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असून त्यांचा आदर्श समोर ठेवून सतत प्रयत्न करावा असे नमूद केले. यावेळी प्रशालेतील अनेक विद्यार्थ्यांनी गायनातून कला आपली सादर केली. सूत्रसंचालन ज्योती यादव यांनी केले.

### विद्यानगर शेळगी येथे भरपाईच्या वादातून तरुणाला मारहाण, चार जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

विद्यानगर शेळगी येथे जखमी झाल्याची भरपाई मागत एका तरुणाला मारहाण झाली. या घटनेची तक्रार जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात करण्यात आली असून चार जणांविरोधात मारहाण, धमकी व शिवीगाळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये फिर्यादी योगेश संगप्पा मकाई (वय २९, रा. विद्या नगर, शेळगी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, (दि.१७) नोव्हेंबर रोजी रात्री सुमारास ९.३० वाजता विद्यानगर, शेळगी परिसरात ही घटना घडली. फिर्यादीची चुलत बहीण पूजा ही आरोपींच्या ड्रेनेज कामातील चुकांमुळे जखमी झाल्याने भरपाई मागितल्याचा राग धरून आरोपींनी हल्ला केल्याचे तक्रारीत नमूद आहे. आरोपी विष्णु वर्धन शेकदार, रोहित हिप्परगे, गोविंद तांदळे व विशाल अळळो (रा. विद्या नगर, शेळगी) यांनी फिर्यादी व त्याचा चुलत भाऊ विश्वास यांना शिवीगाळ करून हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच आरोपी विष्णु वर्धन शेकदार, रोहित हिप्परगे यांनी तुमची वेळ संपली आहे, तुम्हाला संपवितो. अशी जीवे मारण्याची धमकी दिली, असेही तक्रारीत म्हटले आहे. घटनेनंतर (दि.१८) नोव्हेंबर रोजी पहाटे १.५४ वाजता पोलिसांत गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलिस हवालदार वाडीकर करीत आहेत.



### अन्नछत्र मंडळातर्फे श्रीरंग खवरे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १९ नोव्हेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखालील अन्नछत्र मंडळ हे आम्हां इचलकरंजीकरांचे भक्ती-शक्ती स्थळ असल्याचे भाजपा पूर्व मंडल इचलकरंजीचे शहराध्यक्ष श्रीरंग खवरे यांनी सांगितले. ते येथे सहपरिवार आले असता न्यासाचे पुरोहित विश्वंभर पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी एस.के.स्वामी, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.

# डॉक्टर व्हायचं होतं पण झालो वकील : पद्मश्री ॲड. उज्वल निकम

### प्रकट मुलाखतीमधून ॲड. उज्वल निकम यांनी उलगडला जीवन प्रवास





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ नोव्हेंबर-**

आईची इच्छा होती मी डॉक्टर व्हावे म्हणून प्रयत्न केला परंतु अवघ्या २ मार्कांने माझी डॉक्टर होण्याची इच्छा अपूर्ण राहिली पण वडीलांच्या इच्छेने मी वकील झालो. असे सांगून विशेष सरकारी वकील पद्मश्री खासदार उज्वल निकम यांनी आपला जीवन प्रवास उलगडला. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर यांच्या वतीने बुधवारी शिवछत्रपती रंगभवन मध्ये आयोजित प्रकट मुलाखतीमध्ये ते बोलत होते. प्रिसिजन कंपनीचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे यांनी त्यांची मुलाखत घेतली. घरात वडील बॅरिस्टर होते म्हणून वडीलांची इच्छा होती की मी वकील व्हावे पण माझी इच्छा नव्हती. सहकाराच्या एका खटल्याने वकीलीची सुरूवात झाली. जळगांव येथील खटल्यातून मला मुंबई बॉम्बस्फोटात विशेष सरकारी वकील म्हणून काम करण्याची संधी मिळाली. जळगांव ते मुंबई असा प्रवास करत असताना अनेक संवेदनशील आणि महत्वाच्या खटल्यात सरकारची बाजू मांडून गुन्हेगारांना शिक्षे पर्यंत पोहोचवण्यात यश आले. त्यातच मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात महत्वाची भूमिका आंतरराष्ट्रीयस्तरावर मांडता आली. माझी भावना नेहमी माझा देश प्रथम अशीच आहे म्हणूनच दहशतवादी कसाबला फाशी पर्यंत आणि पाकीस्तानचा दहशतवादी चेहरा उघडा पाडण्यापर्यंत यश मिळाले.

संजय दत्त आणि ९३ चा बॉम्बस्फोट या प्रश्नावर ते म्हणाले संजय दत्त याने जर आधीच सुरक्षा यंत्रणांना सांगितले असते तर बॉम्बस्फोट झाले नसते. नेता असो की अभिनेता खोटी गांधीगीरी पांघरून पाप धुता येत नाही. आंतकवादाला कोणताच धर्म नसतो असेही ते म्हणाले. कसाब आणि बिर्याणी हे केवळ एक वकीली युक्तीवाद होता. मिडिया ट्रायलचा न्यायाधीशावर परिणाम होत नाही असे माझे मत आहे. तरूण वकीलांनी कायद्याचा अभ्यास चांगला करावा, नेहमी सत्य सांगावे, कायद्याचे संरक्षण करावे असा सल्लाही त्यांनी एका प्रश्नावर दिला. निरपेक्ष आणि निधर्मी भावनेतूनच खरा न्याय मिळतो.

निवडणुकीला उभा राहणे ही चूक का या प्रश्नावर ते म्हणाले. अवघ्या १० दिवसापुर्वी निवडणुकीला उभे राहण्यासाठी सांगण्यात आले त्यामुळे तयारी नव्हती तरीही निवडणूक लढवली जर माझा मतदारसंघ तुरूंग असता तर मी इतर कोणालाही पराभूत केलो असतो असे ते गंमतीने म्हणाले. मी स्वतःला डॉन सम जतो मी बलवान आहे. अनेक गुन्हेगार मला घाबरतात असेही ते म्हणाले.

कुटुंबाला वेळ देता का या प्रश्नावर ते म्हणाले माझा देशच माझे कुटुंब आहे. जळगांव पासून सुरू झालेला जीवनाचा प्रवास मुंबई आणि आता राज्यसभेचा खासदार असा यशस्वीपणे सुरू आहे. यामध्ये मी समाधानी आहे असेही ते म्हणाले. तब्बल दीड तास सुरू असलेल्या प्रकट मुलाखतीमध्ये माधव देशपांडे यांनी अनेक महत्वाचे प्रश्न विचारत निकम यांना बोलते केले. पद्मश्री ॲड उज्वल निकम यांनीही दिलखुलासपणे प्रत्येक प्रश्नाला उत्तरे दिली.

प्रारंभी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह जितेश कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले आणि आभार व्यक्त केले तर उज्वल निकम आणि माधव देशपांडे यांचा परिचय अविनाश महागांवकर यांनी केला. नंतर ॲड उज्वल निकम यांच्यावरील चित्रफित दाखवण्यात आली. नंतर प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचे कार्यकारी अभियंता दिनेश परदेशी यांच्या हस्ते ॲड उज्वल निकम यांचा सत्कार करण्यात आला त्यानंतर माधव देशपांडे यांचा सत्कार इंद्रजीत पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी मसापचे अध्यक्ष प्रा.दीपक देशपांडे, कार्याध्यक्ष प्रशांत बडवे उपस्थित होते. या कार्यक्रमाला कोषाध्यक्ष अमोल धाबळे,कार्यकारणी सदस्य प्रकाश मोकाशे, पृथा हलसगीकर, मेधा कुलकर्णी, प्रसिध्दी प्रमुख विनायक होटकर यांच्यासह जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, योग शिक्षिका सुधा अळ्ळीमोरे, सिध्देश्वर किणगी,विशाल शिंदे, निलेश शहा, सात्विक बडवे, रसिका बडवे आदींसह मोठ्यासंख्येने श्रोते उपस्थित होते.

# डोणगाव रोडवर दोन कुटुंबात मारहाण

**● परस्परविरोधी फिर्यादीवरून फौजदार चावडी पोलिसांत दोन गुन्हे नोंद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ नोव्हेंबर-**

डोणगाव रोड परिसरात किरकोळ कारणावरून सुरू झालेला वाद मारहाणीपर्यंत पोहोचत दोन स्वतंत्र फिर्यादीतून परस्परविरोधी गुन्हे नोंद होण्यापर्यंत गेला आहे. मंगळवार (दि. १८) नोव्हेंबर सकाळी तसेच रात्री घडलेल्या या दोन्ही प्रकरणांचा तपास फौजदार चावडी पोलीस करत आहेत.

यमध्ये पहिला कुटुंबाच्या फिर्यादी गणेश प्रदीप गवळी (वय ४३, रा. लक्ष्मी विष्णु चाळ) यांच्या तक्रारीनुसार, सकाळी सुमारास ११ वाजता ते घरासमोर ड्रेनेजवर ठेवलेल्या लाकडे काढून घेण्याबाबत गावडे यांच्याशी बोलत होते. त्याचवेळी त्यांचे पती निखिल गावडे हे घरातून बाहेर येत येथून जा, नाही तर हातपाय तोडून टाकेन अशा धमक्या देत शिवीगाळ करू लागले. फिर्यादी यांनी विरोध प्रदर्शन केल्यावर आरोपी निखिल यांनी ड्रेनेजवर पडलेले लाकूड उचलून त्यांना मारहाण केल्याची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर दुसऱ्या कुटुंबाने दिलेल्या फिर्यादनुसार त्याच वादातून पती-पत्नीला मारहाण करण्यात आली असून चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याच घटनेच्या पुढील घडामोडीत फिर्यादी वैशाली निखिल गावडे (वय ३६) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सकाळच्या वादानंतर रात्री अंदाजे २ वाजता आरोपी पुन्हा त्यांच्या घरासमोर आले. त्यावेळी विद्या कांबळे, विकी, जोत्सना आणि गवळी या चौघांनी आधी सकाळी निखिल गावडे यांना शिवीगाळ करून लाकडी काठीने मारहाण केली होती. रात्री पुन्हा आरोपी घरी येऊन शिवीगाळ करू लागले. आवाज ऐकून फिर्यादी बाहेर आल्यावर आरोपी विकीने त्यांना अडवून गच्ची पकडली आणि पती पत्नी दोघांना लाकडाने मारहाण करण्यात आली. यामध्ये दोघेही जखमी झाले असून या दोन्ही कुटुंबीयांनी या प्रकरणीही परस्परविरोधी तक्रार फौजदार चावडी पोलिस ठाण्यात दिली असून तपास पोलिस हवालदार घुगे हे करत आहेत.

# दारूच्या नशेत लोखंडी सळईने एकाला मारहाण, युवक जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ नोव्हेंबर-**

दारूच्या नशेत लोखंडी सळीने एका युवकाला मारहाण झाली आहे. त्यामध्ये तो जखमी झाला असून जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात संकेत माकाई, योगेश माकाई, प्रथमेश माकाई (सर्व रा. विद्यानगर, शेळगी, सोलापूर) या तिघांवर मारहाणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही घटना (दि.१७) नोव्हेंबर रोजी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास विद्यानगर, शेळगी येथे घडली.

फिर्यादी विशाल सिद्धाराम अल्लोळी (वय ३१, रा. विद्यानगर, शेळगी, सोलापूर) फिर्यादीचे मित्र विष्णु शेकदार, रोहित हिप्परगे आणि गोविंद तांदळे हे आरोपी संकेत माकाई व प्रथमेश माकाई यांच्यासोबत दारूच्या नशेत भांडत होते. भांडणाचा आवाज ऐकून फिर्यादी विशाल अल्लोळी हे घटनास्थळी पोहोचून भांडण सोडवण्याचा प्रयत्न करत असताना परिस्थिती अचानक गंभीर वळणावर गेली. आरोपी संकेत माकाई हा आपल्या घरी जाऊन लोखंडी सळई घेऊन परत आला आणि फिर्यादीवर हल्ला केला. फिर्यादीने सळई पकडण्याचा प्रयत्न केला असता ती थेट उजव्या अंगठ्यावर बसली.

यामुळे त्यांना दुखापत होऊन अंगठा सूजल्याची माहिती फिर्यादिने दिली आहे. तसेच, विष्णुवर्धन शेकदार यांच्या डोक्यातही लोखंडी सळीने मार देऊन गंभीर दुखापत करण्यात आली. भांडण सोडविण्यासाठी आलेल्या रोहित हिप्परगे आणि त्यांची आई सुजाता हिप्परगे यांना देखील मारहाण व शिवीगाळ करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात पोलिस हवालदार वाडीकर करीत आहेत.

# सोलापूर मार्केट कमिटीचा जागेसाठी शासनाकडे प्रस्ताव

### स्वतंत्र कांदा बाजारासाठी कृषी विभागाच्या जागेची केली जाते मागणी : सभापती दिलीप माने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ नोव्हेंबर-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात कांद्याची खरेदी विक्री होते. कांद्याच्या हंगामात मोठ्या संख्येने वाहनांची वर्दळ वाढते. त्यामुळे अनेकदा वाहतुकीची कोंडी निर्माण होते. या पार्श्वभूमीवर शासनाच्या कृषी विभागाची मुळेगाव हद्दीतील शेती शाळेची जमिनीची बाजार समितीने मागणी केली आहे.

राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठवला असून जमीन उपलब्ध झाल्यास स्वतंत्र कांदा बाजार उभारण्याची सोलापूर बाजार समितीची तयारी आहे, अशी माहिती सभापती दिलीप माने यांनी दिली. दरम्यान,सोलापूर येथील श्री सिद्धेश्वर बाजार समितीमध्ये राज्यात लासलगाव, नाशिक कृषी उत्पन्न बाजार समित्या पूर्वी कांद्याच्या खरेदी विक्रीत आघाडीवर होत्या गेल्या. सात आठ वर्षांपासून या दोन्ही बाजारपेठांची मक्तेदारी मोडीत काढीत सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने कांद्याच्या व्यापारात उच्चांक प्रस्थापित केला आहे.सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक होते. त्याच दिवशी संपूर्ण कांद्याची विक्री आणि शेतकऱ्यांना मालाची पट्टी देण्याची बाजार समितीची परंपरा असल्याने राज्यभरातील कांदा उत्पादक सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीकडे धाव घेतात. परंतु मोठ्या प्रमाणात कांद्याची आवक आल्याने बाजार समितीत जागेचा अभाव निर्माण होत आहे.

# घरगुती गॅसचा हॉटेलसाठी वापर; अधिकाऱ्यांची संयुक्त कारवाई

**अवैध गॅस वापरणाऱ्यांचे धाबे दणाणले**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

पुरवठा विभाग, एचपी, भारत व इंडियन या गॅस कंपनीचे सेल्स ऑफिसर यांनी एकत्र मिळून बाळीवेस येथील श्री अन्नपूर्णा लंच होम येथे संयुक्त कारवाई करून घरगुती गॅसचा वापर हॉटेलसाठी करताना १ गॅस टाकी पकडली. या कारवाईवेळी सर्व गॅस कंपनी चे सेल्स ऑफिसर, ४ परीमंडळ अधिकारी, ४ पुरवठा निरीक्षक उपस्थित होते.



या पथकाने अवैध गॅस वापर ठिकाणी छापा टाकला असता; त्यामध्ये १ भारत गॅस कंपनीची वापर करत असलेली भरलेली टाकी सापडली. सदर कार्यवाहीमध्ये नंदकिशोर ढोके, अ परीमंडळ अधिकारी, प्रफुल नाईक ड परीमंडळ अधिकारी, राजेश यमपुरे ब प्र.परीमंडळ अधिकारी, ज्ञानेश्वर काशीद ब पुरवठा निरीक्षक, सज्जन भोसले ड पुरवठा निरीक्षक, सागर चव्हाण HPCL सेल्स ऑफिसर, गौतम सागर खजउड सेल्स ऑफिसर, रघु कुमार इझउड सेल्स ऑफिसर आदींची उपस्थिती होती. दरम्यान, या कारवाईमुळे सोलापूर शहरात अवैध गॅस वापरणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. याबाबत रात्री उशिराने गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु असल्याची माहिती शहर अन्नधान्य पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे यांनी दिली.

# नूतनीकरण न केल्याने १९ दिव्यांग शाळांची मान्यता रद्द

### दिव्यांग कल्याण विभाग आयुक्तांची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

संस्थेकडून चालविण्यात येत असलेल्या अपंग शाळांची विहीत मुदतीत नूतनीकरण न केल्याने राज्य दिव्यांग कल्याण आयुक्तांनी सोलापूर जिल्ह्यातील १७ विना अनुदानित तर दोन अनुदानित दिव्यांग शाळांची मान्यता रद्द करण्याची कारवाई केली आहे.

या कारवाईमुळे संस्था चालकांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे. राज्य दिव्यांग कल्याण विभागाकडून दिव्यांग मुलांकरीता सेवाभावी संस्थेच्या वतीने चालविण्यात येर्णाया शाळांना अनुदान देण्यात येते. मात्र सोलापूर जिल्ह्यातील १९ शाळांनी विहीत मुदतीत शाळा मान्यतेची नूतनीकरण न केल्याने या शाळा आता अनोंदणीकृत म्हणून जाहीर करण्यात आले आहेत. त्यामुळे या संस्थांना आता शासकीय अनुदान मिळणे बंद होणार असल्याची माहिती जिल्हा दिव्यांग कल्याण अधिकारी मनोज राऊत यांनी दिली. कारवाई करण्यात आलेल्या दिव्यांग शाळा विहीत मुदतीत दिव्यांग शाळा मान्यतेचे नूतनीकरण न केल्याने अभिनव मूकबधिर विदयालय माळशिरस व अंध निवासी शाळा, पंढरपूर या दोन शाळांची मान्यता रद्द करण्यात आली आहे. यात पंढरपूर येथील शाळेकडून प्रस्ताव सादर करण्यात येत असल्याची माहितीही प्रशासनाकडून देण्यात आली. श्रीमंत माधवरावजी सिंधीया साहेब अपंग मुकबधिर केंद्रीय विद्यालय, चिखली, भगवानदादा मतिमंद निवासी शाळा, वैराग, आनंदराव देवकते मतिमंद निवासी विद्यालय, राजूर, मतिमंद निवासी शाळा, डिकसळ, प्रणिती मातिमंद निवासी शाळा, तळेहिपरगे, स्वामी समर्थ मतिमंद निवासी शाळा, आगळगाव, सोजर मतिमंद शाळा, सीना दारफळ, सोजर मतिमंद निवासी शाळा, बार्शी, ज्ञानप्रबोधनी मतिमंद निवासी शाळा, कोर्टी, संत मेहरलाल बाबा निवासी मतिमंद शाळा, मालवंडी, माधवरावजी सिंधीया साहेब अपंग मुकबधिर केंद्रीय विद्यालय, चिखली, भगवानदादा मतिमंद निवासी शाळा, राजूर, मतिमंद निवासी शाळा, डिकसळ, प्रणिती मतिमंद निवासी शाळा, तळेहिपरगे या विना अनुदानित शाळांचीही मान्यता नूतनीकरण नसल्याने रद्द करण्यात आली आहे.

### पॉक्सोबद्दल जागरुकता मार्गदर्शन शिबीर संपन्न

**सोलापूर दि.१९ नोव्हेंबर-**

प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तदर्थ जिल्हा न्यायाधीश एस. व्ही. केंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली वाढत्या बाल लैंगिक अत्याचाराच्या आणि महिलांच्या सुरक्षितता व गोपनियतेच्या पार्श्वभुमीवर जनजागृतीची नितांत गरज असल्याने जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्यावतीने युगंधर महिला वैद्यकिय महाविद्यालयात मार्गदर्शन शिबीर झाले. यात न्यायाधीश केंद्रे यांनी पॉक्सो कायदा यावर मार्गदर्शन केले. तसेच महिलांच्या सुरक्षितता व गोपनियतेच्या पार्श्वभुमीवर जनजागृती या विषयावर विधीज्ञ देवयानी किणगी यांनी कायदेशीर उपाय सोप्या भाषेत मांडले. यावेळी दिवाणी न्यायाधीश डी. जी. कंखरे, युगंधर वैद्यकिय महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. वर्षा पगारे आदींची उपस्थिती होती. सुत्रसंचालन स्नेहा शिंदे यांनी केले. रचना इंगळे यांनी आभार मानले.

# तपासणी आधीच दिव्यांग आयुक्तांची बदली

### सोलापूर दिव्यांग कार्यालयाची तपासणी रखडली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ नोव्हेंबर-**

सोलापूर दिव्यांग कल्याण कार्यालयाच्या कामकाजाबद्दल दिव्यांग आयुक्त कार्यालयाकडे अनेक तक्रारी करण्यात आले आहेत. त्या तक्रारींची तपासणी करण्यासाठी पुणे येथील दिव्यांग आयुक्त बुधवारी १९ नोव्हेंबर रोजी जिल्हा परिषदेच्या जिल्हा दिव्यांग कल्याण कार्यालयाची तपासणी करण्यासाठी सोलापूरकडे निघाले होते.

दिव्यांग आयुक्त समीर कुर्तकोटी इंदापूरजवळ आल्यानंतर त्यांच्या बदलीचे आदेश आल्याने सोलापूरच्या दिव्यांग कार्यालयाची तपासणी झाले नाही. जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाच्या तक्रारी दिव्यांग सचिव तुकाराम मुंडे, दिव्यांग आयुक्त समीर कुर्तकोटी व प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे यांच्याकडे करण्यात आले होते. त्याची दखल घेत सचिव मुंडे यांनी सोलापूर परिषदेतील जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाचा कारभार तपासण्यासाठी दिव्यांग आयुक्तांना आदेश दिले.

दिव्यांग शाळांना मान्यता व शासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेऊन बेकायदा कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्याचे प्रकरण समोर आले होते. तसेच कार्यालयातील विविध तक्रारी व काम काज यांची आयुक्त तपासणी करणार होते. त्यासाठी आयुक्त सोलापूरकडे निघाले असताना इंदापूरजवळ त्यांना बदली झाल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे दिव्यांग आयुक्त सोलापूरच्या दिव्यांग कार्यालयाची तपासणी न करताच पुण्याला परतले. या बदलीमागे राजकीय दबाव असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे दिव्यांग कार्यालयातील तक्रारीत पुन्हा वाढ होणार आहेत. मात्र आयुक्तांच्या बदलीमुळे कार्यालयातील भ्रष्टाचाराला अभय मिळणार असून दिव्यांग कार्यालयातील भ्रष्टाचारात वाढ होणार आहे.

**कार्यालय तपासणी झाली नाही**

सोलापूर दिव्यांग कल्याण कार्यालय तपासणी करण्यासाठी पुणे आयुक्त समीर कुर्तकोटी येणार होते. त्यासाठी कार्यालयाकडून तयारीही करण्यात आले होते. कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी आयुक्तांच्या प्रतीक्षेत असताना त्यांची बदली झाल्याचे कळाले. त्यामुळे कार्यालय तपासणी झाली नाही.

**- मनोज राऊत,**
प्रभारी दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शिराढोणमध्ये प्रतिबंधित गुटखा विक्री करणारा एक जण अटक

### ४८,१४४ किंमतीचा माल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१९ नोव्हेंबर -**

राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची बेकायदेशीर विक्री करत असलेल्या एका व्यक्तीस शिराढोण पोलिसांनी रंगेहात पकडले. आरोपी वहाब जब्बार मनियार (वय ५५, रा. इस्लामपुरा, कळंब) हा दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.५० च्या सुमारास शिराढोण-कोल्हेगाव रोडवरील हासेगाव पाटीजवळ मोटरसायकलवरून प्रतिबंधित पदार्थांची विक्री करताना आढळला.



पोलिसांनी त्याच्याकडून विमल, राजनिवास, डायरेक्टर पान मसाला, गोवा, जाफरानी जर्दा, शॉट पत्ती, तंबाखू आदी प्रतिबंधित पदार्थांसह एकूण ४८,१४४ किमतीचा माल जप्त केला.

घटनेवरून आरोपीविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके अन्वये शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



## संक्षिप्त वृत्त...




### पांगरदरवाडीच्या विद्यार्थ्यांची जिल्हाधिकारी कार्यालयास सदिच्छा भेट

**तुळजापूर, दि.१९ नोव्हेंबर -**

तालुक्यातील पांगरदरवाडी येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थी गाईड पथकाने गावात फेरी काढून जमा केलेला पूरग्रस्तांसाठीचा मदतनिधी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्याकडे सुपूर्द केला. पांगरदरवाडी येथील विध्यार्थ्यांनी पूरग्रस्तांसाठी गोळा केलेला ७७५५ रुपये मदतनिधी देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाला भेट दिली.यावेळी धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी साहेब डॉ. कीर्ती किरण पुजार यांनी विध्यार्थ्यांसोबत संवाद साधला. शाळेत चालू झालेला तडवळा पॅटर्न व विविध स्पर्धा परीक्षेतील यश याविषयी विध्यार्थ्यांनी साहेबांशी संवाद साधला. निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडावकर यांनी विध्यार्थ्यांना या सामाजिक बांधिलकीबद्दल कौतुक केले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक व्यंकट कोळी, शालेय समिती सदस्य नवनाथ भारती व मार्गदर्शक शिक्षिका भावना चौधरी उपस्थित होत्या.



### कवी शंकर कसबे यांची नगरपरिषद शाळेला सदिच्छा भेट

**तुळजापूर, दि.१९ नोव्हेंबर -**

प्रसिद्ध कविता, लेखक, कादंबरीकार शंकर अभिमान कसबे यांनी नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र.२ ला सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच विद्यार्थ्यांसोबत कविता वाचन करून मार्गदर्शन केले. इयत्ता सहावीच्या पाठ्यपुस्तकातील माझ्या आज्यानं माझ्या पंज्यानं ही कविताचे लेखक स्वतः शंकर कसबे आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्याबद्दल उत्सुकता होती त्यांनी त्यांच्यासोबत कविता संदर्भात अनेक प्रश्न विचारले कसबे यांचे स्वागत मुख्याध्यापक गणेश रोचकरी यांनी केले. याप्रसंगी बाळासाहेब जेटीथोर, महेंद्र पाटील, महेंद्र कावरे, सुज्ञानी गिराम, केरण लोहारे, विद्यादेवी स्वामी व विद्यार्थी उपस्थित होते.

### फुलवाडीच्या नागनाथांची आजपासून यात्रा

**अणदूर, दि.१९ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील फुलवाडी येथील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री नागनाथ महाराज यात्रेस, आजपासून म्हणजे गुरुवारी (दि.२०) पासून सुरुवात होत आहे. यानिमित्ताने दोन दिवस विविध धार्मिक विधी व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यात गुरुवारी (दि.२०) पहाटे ४ ते ९ यावेळेत श्री च्या मूर्तीस अभिषेक, महापूजा, महाआरती. दिवसभर नवस फेडणे, दंडवंत घेणे आदी कार्यक्रम असतील. सायंकाळी ६ ते १० यावेळेत श्री ची पालखी मिरवणूक व मानाच्या नंदीध्वजची मिरवणूक तर रात्री ९ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. शुक्रवारी (दि.२१) सकाळी ७ वाजता पालखी मिरवणूक, नंदीध्वज मिरवणूक व अग्नी प्रवेश कार्यक्रम होणार आहेत. यात्रेच्या दोन्ही दिवशी महाप्रसादाचे व्यवस्था करण्यात आली आहे. यात्रेनिमित्ताने मंदिर परिसरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. यात्रेकरूंच्या सोयीसाठी ग्रामपंचायत कार्यालय,यात्रा कमिटी, महात्मा बसवेश्वर युवा मंच व ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.





### जिल्हाधिकारी कार्यालयात स्व. इंदिरा गांधी जयंतीनिमित्त अभिवादन

**धाराशिव, दि.१९ नोव्हेंबर -**

देशाच्या माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, उपजिल्हाधिकारी श्रीमती स्वाती शेंडे, तहसीलदार (महसूल) प्रकाश व्हटकर, दत्तात्रय गायकवाड, नायब तहसीलदार संतोष पाटील, माणिक बेजगमवार यांच्यासह विविध विभागांचे कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही स्व. इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांचे स्मरण केले.

# आ. राणादादांनी लिहिले खासदार सुप्रियाताईंना पत्र!

### तुळजापूर ड्रग्जप्रकरणाची वास्तव माहिती देणारे पत्र सोशल मीडियावर व्हायरलघोषणाबाजी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ नोव्हेंबर -**

खासदार सुप्रियाताई, आदरणीय अजितदादा पवार आणि सुनेत्राआत्या ज्याप्रमाणे माझे नातेवाईक आहेत, त्याप्रमाणेच आपण सुद्धा माझ्या जवळच्या नातेवाईक आणि माझ्या थोरल्या बहीण आहात आणि त्याचा मला मनापासून आदर आणि अभिमान आहे. मात्र, काही चुकीच्या आणि अपुऱ्या माहितीद्वारे किंवा कदाचित राजकीय अपरिहार्यतेतून आपण व्यक्तिशः माझ्याबद्दल जाहिरपणे सलग वक्तव्ये करीत आहात.

तुळजापूर येथील माजी नगराध्यक्ष संतोष परमेश्वर यांनी माझ्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला. हा प्रवेश करायच्या क्षणापर्यंत ते तुमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तुळजापूर शहरातील प्रमुख नेते होते, हे कदाचित आपल्याला माहीत नसेल. त्यांच्यावर ड्रग्जप्रकरणी आरोप झाल्यानंतर त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून काही काढून टाकण्यात आले नव्हते. ते ही योग्यच होते, कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला बहाल केलेल्या संविधानातील तरतुदीनुसार, जोवर एखादा दोष सिद्ध होत नाही, तोवर त्या व्यक्तीला निरपराधच मानले जाते.

त्यामुळेच तर आपल्या सहकारी असलेल्या राज्यातील मंत्र्यांवर अत्यंत गंभीर आरोप असताना देखील आपण त्यांना मंत्रिमंडळात कायम ठेवले होते. आपण स्वतः एवढ्या जबाबदार व्यक्ती असतानाही आपल्याकडून जे काही बोललं गेलं, ते तुळजाभवानी





मातेच्या तीर्थक्षेत्र तुळजापूरची जाणीवपूर्वक बदनामी करण्याच्या षडयंत्राला नकळत का असेना बळ देणारं आहे. तुळजापूरच्या ड्रग्ज प्रकरणाबाबत आपण सलग दोन वेळा जे वक्तव्य केले आहेत, त्याची वस्तुनिष्ठ माहिती आपण जाणून घ्यायला हवी होती. नाहीतर ही वक्तव्ये राजकारणाने प्रेरित 'मीडिया ट्रायल' करण्यासाठी जाणीवपूर्वक केली जात असल्याचं स्पष्ट होतंय. विधानसभा निवडणुकीच्या काळात तुळजापूर शहरातील स्थानिक माता-भगिनींनी शहरात सुरू असलेल्या या गंभीर प्रकाराची माहिती मला दिली. त्याचवेळी हे सगळं उध्वस्त करून टाकण्याचा शब्द मी त्यांना दिला होता. त्यानुसार मी खोलात जाऊन याबाबत माहिती मिळविली. तत्कालीन जिल्हा पोलिस अधीक्षक यांना मी स्वतः ळचर्शीीरसश करून याबाबतची माहिती पुरवली व पाठपुरावा केला.

तसेच, याबाबत स्थानिक गुन्हे शाखेला माहिती देण्यासाठी विनोद गांगणे यांना जोडून दिले. या व्यक्तीने हे सगळे प्रकरण उघडकीस आणण्यासाठी पोलिसांना सहकार्य केले (संबंधित पोलीस अधिकाऱ्याचा जबाब जोडला आहे). दुर्दैवाने पोलिसांनी सहकार्य करणाऱ्यांनाच यात आरोपी बनविले. न्यायालयाने त्यांचा जामीन मंजूर करताना या



बाबी आवर्जून नमूद केल्या आहेत. कोण खरे गुन्हेगार आहेत? हे अंतिमतः न्यायालय ठरवेलच.

अंजली दमानिया यांनी उपस्थित केलेल्या मुंबईतील शताब्दी रुग्णालयाच्या निविदा प्रक्रियेत तेरणा ट्रस्टने केवळ सहभाग घेतला आहे. यापूर्वी दोन ते तीन वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या. मात्र कोणीही सहभागी झाले नाही. तिसऱ्यांदा निविदा निघाल्यानंतर तेरणा ट्रस्टने त्यात सहभाग घेतला. यात नेमकं चुकीचं काय झाले आहे? जरा आपण सांगू शकलात, तर बरं होईल! म्हणजे आपलं नेमकं म्हणणं काय हे कळेल.

आपल्या अजूनही काही शंका असतील, तर त्या दूर करण्याची माझी प्रामाणिक इच्छा आहे. आपल्यासोबत चर्चा करून सगळी वस्तुनिष्ठ माहिती पुराव्यांसह दाखविण्याची माझी तयारी असल्याचे पत्राद्वारे आमदार राणाजगजिसिंह पाटील यांनी म्हंटले आहे.

### धाराशिव जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाची विजयी सलामी..!

## तीर्थक्षेत्र तुळजाई नगरीत डॉ. अनुजा परमेश्वर बिनविरोध नगरसेवक



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ नोव्हेंबर -**

नगर परिषद निवडणुकीत वार्ड क्र.३ मधून भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवार डॉ. अनुजा अजितराव परमेश्वर यांची बिनविरोध निवड झाली आहे. भारतीय जनता पक्षाच्या विजयाची ही नांदी असून डॉ. अनुजा परमेश्वर यांना आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी अभिनंदन आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

धाराशिव जिल्ह्यात चर्चेत असणारी तुळजापूर नगरपरिषद निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाची विजयी सलामी दिली आहे. तुळजापूर नगरपरिषद निवडणुक प्रभाग क्रमांक तीनमध्ये महिला उमेदवारांचे दोनच अर्ज दाखल होते. त्यापैकी एका उमेदवारांनी माघार घेतल्याने डॉ. अनुजा अजित कदम यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे भाजपने या निवडणुकीमध्ये आघाडी घेतली आहे. प्रभाग क्रमांक तीन जिजामाता नगर व परिसरासह प्रभागात युवा नेते विनोद गंगणे यांचे कायमस्वरूपी वर्चस्व आहे.

उच्चशिक्षित असलेल्या डॉ. अनुजा कदम यांनी एम.बी.बी.एस. शिक्षण पूर्ण केले असून, पुण्यातील डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयातून त्यांनी एम.बी.बी.एस. ही पदवी प्राप्त केली आहे. डॉ. अनुजा कदम बिनविरोध निवडून आल्यामुळे जिल्हाभरातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

## मूलभूत सुविधांअभावी ३०८ मतदारांचा निवडणुकीवर बहिष्काराचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ नोव्हेंबर -**

तुळजापूर शहरातील पंढरपूरकर गल्लीतील नागरिकांना गेल्या अनेक वर्षांपासून नगरपरिषदेकडून मूलभूत सुविधा न मिळाल्याने येथील नागरिकांनी आगामी २ डिसेंबर रोजी होणाऱ्या नगरपरिषद निवडणुकीचा बहिष्कार करण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

स्थानिक रहिवाशांनी तुळजापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांना याबाबत लेखी निवेदन दिले आहे. पंढरपूरकर गल्लीतील रहिवाशांना अनेक वर्षांपासून खालील गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. रस्त्यांची अत्यंत खराब अवस्था, नाल्यांची स्वच्छता, आणि दुरुस्तीचा अभाव, अनधिकृत दुचाकी पार्किंगचा त्रास, सार्वजनिक कचरा व्यवस्थापनाचा पूर्ण बोजवारा.

या समस्या सोडविण्यात नगरपरिषद अपयशी ठरत असल्याचा नागरिकांचा आक्षेप आहे. समस्या तातडीने सोडविण्यात आल्या नाहीत तर मतदान न करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

या निवेदनावर पंढरपूरकर गल्लीतील सुमारे ३०८ मतदारांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. यामध्ये कावरे, नाईक, तोडकरी, शिंदे, जाधव, शहापुरे या कुटुंबांतील सदस्यांचा समावेश आहे.

## परंडा येथे बोलेरोमधून ७९५ किलो गोवंशीय मांस जप्त; दोघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१९ नोव्हेंबर -**

परंडा ते बार्शी रोडवरील ब्रम्हगाव शिवारात बोलेरो (क्र. चक २० इध ९१७७) मधून ७९५ किलो गोवंशीय मांस (किंमत अंदाजे १ लाख ५९ हजार रूपये) बेकायदेशीररीत्या वाहतूक करत असल्याची माहिती मिळताच परंडा पोलिसांनी छापा टाकून माल जप्त केला.



या प्रकरणात सलमान अमर सय्यद (वय ३०, रा. जुनी तहसील जवळ, परंडा) आणि अफजल मंजुर कुरेशी (रा. दर्गा रोड, परंडा) यांच्यावर कारवाई करण्यात आली. दोघेही दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास मांसाची विक्री करण्यासाठी वाहतूक करत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

घटनेवरून पोलिसांनी आरोपींविरुद्ध भादंवि. कलम ३२५ सह कलम ५ (क), ९, ९ (अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## कळंब नगराध्यक्ष, नगरसेवकपदासाठी हौससे-गौसे-नौश्यांची स्वपुर्ती!

### नगराध्यक्षपदासाठी ९ अर्ज तर २० नगरसेवक पदांसाठी ९४ अर्ज पात्र ▸▸ काही ठिकाणी दुरंगी तर काही ठिकाणी तिरंगी लढत

**तभा वृत्तसेवा / परवेज मुल्ला**
**कळंब, दि.१९ नोव्हेंबर -**

नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदासह २० नगरसेवक करिता २ डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासह २० नगरसेवक करिता ९ नगराध्यक्ष तर २० नगरसेवक साठी ९४ अर्ज पात्र झाले आहेत.

कळंब नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना (उबाठा) भाजप व दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी एकत्र येऊन निवडणूक




लढविणार आहेत. काल झालेल्या नामनिर्देशन पत्र दाखल सोबत निष्ठ तर नाही.

परंतु कायम तुम्ही चटायाच उचला असे चित्र निर्माण झाले होते.

आम्ही आजपर्यंत फक्त तुमच्या चटया उचलणे काम केले, गेल्या अगोदर पासून नाही तर एकनिष्ठ पणाने पक्षात राहून काम केले, एव्हाना चटया ही उचलल्या, मी आहे ना, तु फार्म भर भरला परंतु ऐनवेळी मला कळाले तुझ्या पक्षातून तुझ नावच नाही! फॉर्म रिजेक्ट झाल्यावर घरचेच जे म्हणायचे ते खरे झाले! कपाळावर हात मारून घेतला.

कळंब नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत होत असलेल्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदाकरिता १४ जणांनी तर २० नगरसेवक करिता २३४ अर्ज दाखल केले होते.

परंतु केवळ नगराध्यक्ष पदाकरिता ९ तर नगरसेवक करिता ९४ अर्ज पात्र झाले होते. यात केवळ नगराध्यक्ष पदाकरिता ३ तर काही ठिकाणी सरळ लढत तर काही ठिकाणी तिरंगी लढत होणार आहे.

# राष्ट्रवादी पक्षाला डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या नेतृत्वामुळे मिळाली नवी ऊर्जा

### नगरपालिकेची निवडणूक स्वतंत्र लढवण्याचा धाडसी निर्णय

**तभा वृत्तसेवा / अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.१९ नोव्हेंबर -**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला धाराशिव जिल्ह्यात पुन्हा नव्याने उभारी मिळाली असून याचे प्रमुख कारण म्हणजे नुतन जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांचे सक्रीय नेतृत्व व दिशादर्शक मार्गदर्शन यामुळे अलीकडच्या काही महिन्यांपासून जिल्ह्यात तहानलेल्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचे काम करत आहे.

जिल्ह्यात नगरपालिकेची निवडणूक स्वतंत्र लढवण्याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने घेतल्यामुळे या पक्षाकडून नगराध्यक्ष व नगरसेवकांच्या जागा लढवण्याच्या भूमिकेमुळे जिल्ह्यातील धाराशिव, कळंब, तुळजापूर, उमरगा, नळदुर्ग, परंडा आणि भूम या सर्व नगरपरिषदांच्या माध्यमातून आता एक नवा बदल घडवण्याची योग्य वेळ साधली आहे. डॉ. पाटील यांनी नुकत्याच घेतलेल्या विविध बैठका, संवाद मेळावे आणि कार्यकर्ता संपर्क यात्रांना जिल्ह्यात मोठा प्रतिसाद मिळाला. गावागावातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत त्यांनी पक्षाची भूमिका, भविष्यातील लढाई आणि संघटन मजबूत करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.




स्थानिक पातळीवर विकास, शेतकऱ्यांचे प्रश्न, तरुणांना रोजगाराच्या संधी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सशक्त सहभाग या मुद्द्यांवर त्यांनी स्पष्ट धोरण मांडले. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये विश्वास वाढला असून, अनेक जुने कार्यकर्ते पुन्हा सक्रिय झाले आहेत. पक्षातील तरुण पदाधिकारी सांगतात की, डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या नेतृत्वामुळे जिल्ह्यातील संघटनाला नवी दिशा मिळाली आहे. त्यांचा अभ्यासू स्वभाव, जमिनीवरील संपर्क आणि सर्वसमावेशक दृष्टी यामुळे आम्हाला नव्या जोमानं काम करावंसं वाटत आहे.

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही ऊर्जा राष्ट्रवादी काँग्रेससाठी महत्त्वाची ठरणार असून, धाराशिव जिल्ह्यात पक्ष पुन्हा एकदा दमदारपणे पुढे येईल असे कार्यकर्त्यांकडून भावना व्यक्त केली जात आहे.

#### नागरिकांच्या सहभागातून शहरांचा विकास

राजकारणापेक्षा समाजकारण हे खरे तत्त्व समोर ठेवून स्थानिक रोजगार निर्मिती, स्टार्टअपला प्रोत्साहन, युवकांसाठी कौशल्यविकास केंद्रे, महिलांच्या सुरक्षेला आणि सशक्तीकरणाला प्राधान्य, प्रत्येक प्रभागात महिला सुविधा केंद्र, पर्यावरणपूरक स्मार्ट नगरांची संकल्पना, कचरा व्यवस्थापन, पाणी पुनर्वापर, हिरव्या जागांची निर्मिती, डिजिटल सेवांद्वारे स्मार्ट प्रशासन, पक्षीय भेद विसरून नागरिकांच्या गरजा अग्रस्थानी मानून शहरांचा विकास हाच एकत्रित अजेंडा असणार आहे.

**-डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील,**
जिल्हाध्यक्ष :
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)

## जिल्ह्यात १८ नोव्हेंबर ते १ डिसेंबरपर्यंत जमावबंदी व शस्त्रबंदी लागू

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ नोव्हेंबर -**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि संभाव्य शेतकरी आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी १८ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री १ वाजेपासून ते १ डिसेंबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत जिल्ह्यात कलम ३७ (१)(३) अन्वये जमावबंदी व शस्त्रबंदी लागू करण्यात आली आहे. आदेश अपर जिल्हादंडाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी जारी केला आहे.

निवडणुकीतील सभा, प्रचार, गटबाजीमुळे तणाव निर्माण होण्याची शक्यता तसेच अतिवृष्टीच्या नुकसानीवरून शेतकरी मोर्चे किंवा आंदोलन होऊ शकते, असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या काळात शस्त्रे, दगडफेकीची साधने, उत्तेजक भाषणे, समाजात तणाव निर्माण करणारे फलक, पाचपेक्षा अधिक व्यक्तींचा जमाव, मोर्चे व मिरवणुका परवानगीशिवाय बंदी राहणार आहेत. अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, लग्न समारंभ, शासकीय कार्यक्रम यांना मात्र सूट देण्यात आली आहे. प्रशासनाने नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# अनधिकृत व्यावसायिकांवर कारवाई करा

## ग्राहक परिषदेचे जिल्हाध्यक्ष डॉ. तिवारी यांची जिल्हाधिकाऱ्यांच्याकडे मागणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, १९ नोव्हेंबर :** चाकूर शहरांमधील आठवडी बाजारामध्ये तालुक्यातील व स्थानिक शहरातील लहान मोठ्या व्यापारी अनधिकृत रित्या व्यवसाय करीत आहेत. मान्यता नसलेले सामान, मापात पाप, विनापरवाना चालत असलेले हॉटेल्स, पान टपरी, तालुक्यातील शासकीय कामावर फलक, शहरात विविध ठिकाणी पोलिसांची नेमणूक अशा सर्व प्रकारच्या सर्व क्षेत्रातील कर्मचारी व व्यापाऱ्यांनी खबरदारी घ्यावी लागणार आहे. अन्यथ: कारवाईस सामोरे जावे लागेल. असे आदेश लातूर येथील जिल्हाधिकाऱ्यांनी डॉ. प्रल्हाद तिवारी यांच्या तक्रारी अर्जानंतर लातूर कार्यालय व स्थानीक प्रशासनाला पत्र काढले आहेत.

चाकूर तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्व आठवडी बाजारामध्ये बोगस व अनाधिकृतपणे होणाऱ्या गोष्टी मुळे ग्राहक संरक्षण परीषदचे अशासकीय जिल्हा सदस्य डॉ. प्रल्हाद तिवारी यांनी सर्वसामान्य नागरीकांवर व ग्राहकांवर होणारा अन्याय हा लातूर जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आनून दिला असल्यामुळे बाजारामधे बोगस व अनधिकृत आणि आरोग्यास अपायकारक तसेच मान्यता नसलेले प्रॉडक्ट (सामान) विक्रीवर बंदी आसल्यामुळे, शहरी व ग्रामीण भागात वजन मापात होत असलेले पाप थांबवण्यासाठी म्हणजे एक लीटरच्या नावाखाली ८०० ते ९०० एम.एल. तेल किंवा द्रव पदार्थ विक्री, तसेच कोणत्याही पॅक वस्तूची किंमत कमी न करता त्यातील मालाचे वजन कमी करणे, नवीन जीएसटी नियमाप्रमाणे किंमत कमी करण्या वजी मालाचे वजन कमी करून विक्री करणे, चाकूर शहरातील कमानी पासून ते मश्जीद चौक या मुख्य रस्त्यावर दुकानाचे साहित्य १० फूट रस्त्यावर ठेवणे, हॉटेलच्या खुर्चा रस्त्यावर कशाही मांडणे, लोकांना येणे जाणे साठी त्रासदायक होत आहे.

चाकूर बस स्थानक बोथी चौक व जुने बस स्थानक येथे ट्राफिक पोलीस सकाळी ९ ते ११ व दुपारी ४ ते ६ थांबवणे आवश्यक आहे. या वेळेत सर्व शाळा व कॉलेजचे विद्यार्थी पालक कर्मचारी यांची जास्त वर्दळ असल्यामुळे हे करणे आवश्यक आहे.तसेच बसस्थानक येथे तिन ते चार वाजण्याच्या सुमारास टुकार मुले मोटारसायकली येऊन येतात व टोळक्याने थांबून हॉर्न वाजवतात यावर पोलिस प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

जिल्ह्यातील सर्व ग्रामीण भागात अनेक हॉटेल्स विनापरवाना चालतात त्यांच्याकडे पदार्थ तयार करणे, विक्री करणे व आरोग्यावर परिणाम होणारे पदार्थ फ्रीज मध्ये ठेवणे. मालाच्या किंमती दर्शनिय भागात न लावणे, केमिकल युक्त रंग चव आकर्षण वाढविण्यासाठी वापरून माणसाच्या जीवनाशी खेळणे असे सर्व प्रकार सर्रास दिसून येतात.

पोषण आहार शाळेत हजेरी पटावर जेवढी संख्या असते त्या नुसार पोषण आहाराची शाळा मागणी करते. परंतु प्रत्यक्ष जेवणासाठी मुलांची संख्या शाळेत फक्त ३५% टक्केच असते. या पेक्षा जास्त मुले खिचडी खात नाहीत.

चाकूर नगरपंचायतच्या प्रत्येक कामावर माहीतीचा फलक लावणे. त्या अनुषंगाने अशासकीय सदस्य डॉ. प्रल्हाद तिवारी, यांचे संदर्भिय पत्रामध्ये नमूद मुद्याच्या अनुषंगाने नियमाप्रमाणे उचित कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित अशासकीय सदस्य यांना आपले स्तरावरुन परस्पर कळविण्यात यावे व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र कार्यालय, लातूर, सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, विभाग लातूर, मुख्यकार्यकारी, नगर पंचायत चाकूर, उपविभागीय पोलिस अधिकारी चाकूर, जिल्हा शिक्षणाधिकारी प्राथमिक, माध्यमिक जि.प.लातूर यांना आदेशित केले आहे.



# पो.कॉ. चपडेंमुळे बेपत्ता मुलाची आईशी भेट

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १९ नोव्हेंबर :** येथील नूतन विद्यालय अहमदपूरमध्ये शिकणारा आणि खाजगी वसतिगृहात (हॉस्टेल) राहणारा रुद्रा राजरतन दुधमल (रा. ब्राह्मणवाडा, ता. जि. नांदेड) हा वसतिगृहातून कोणालाही न सांगता पळून गेल्याची घटना नुकतीच समोर आली. मात्र अहमदपूर बस स्थानकावर कार्यरत असलेल्या पोलीस हेड कॉन्स्टेबल बबन चपडे यांच्या तत्परतेमुळे या मुलाची त्याच्या आईशी भेट झाली.

सदर मुलगा अहमदपूर बस स्टँड येथे उभी असलेल्या प्रवाशांकडे तिकिटासाठी पैसे मागत असल्याचे हेड कॉन्स्टेबल बबन चपडे यांच्या निदर्शनास आले. एक लहान मुलगा एकटाच पैसे मागत असल्याचे पाहून त्यांनी तत्काळ त्याची आपुलकीने विचारपूस केली. त्यावेळी मुलाने, मला गावाकडे जायचे आहे, पण माझ्याकडे तिकिटासाठी पैसे नाहीत, असे सांगितले. त्याच्या घरच्यांविषयी आणि मोबाईल नंबरबद्दल विचारले असता, त्याने 'माहित नाही' असे उत्तर दिले.

आई व आजीने ओळखले चपडे हे मुलाची चौकशी करत असतानाच, त्या मुलाची आई रुपा राजरतन दुधमल आणि आजी मुलाचा शोध घेत घेत बस स्टँडवर पोहोचल्या. त्यांनी मुलाला ओळखले. पोलीस प्रशासनाने कोणतीही गडबड न करता, मुलाच्या आई-आजीकडे त्यांच्या ओळखपत्राची (आधार कार्ड) मागणी केली.

कागदपत्रे तपासून तो मुलगा त्यांचाच असल्याची खात्री पटल्याने याप्रकरणाची माहिती आपल्या वरिष्ठ उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले व अहमदपूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार यांना दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, रुद्रा दुधमल या मुलाला त्याची आई रूपा राजरतन दुधमल आणि आजी यांच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आले.



# अधिकारी कर्मचारी तालुका क्रीडा स्पर्धेत जाधव प्रथम

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १९ नोव्हेंबर :** तालुकास्तरीय अधिकारी कर्मचारी क्रीडा स्पर्धा २०२५-२६ च्या नुकत्याच पार पडल्या. यात विविध ४३ प्रकारच्या स्पर्धा संपन्न झाल्या. यामध्ये एम.एम. जाधव यांनी वक्तृत्व स्पर्धेमध्ये निलंगा तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे.

स्पर्धेचा विषय शिक्षणातील ध्येय गाठण्यासाठी सद्यस्थितीतील अडथळे यावर त्यांनी विचार मांडले. स्पर्धेचे उद्घाटन विजय पेठकर यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून मोहन नटवे, पवार डी. डी. उपस्थित होते. परीक्षक म्हणून मुळे एस. बी., चांभरगे व्हि. एम. मांडले एस. एस., डोईजोडे प्रवीण यांनी काम पाहिले. तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला म्हणून जिल्हा परिषद कन्या प्रशाला निलंगा येथे शाळेच्या वतीने मुख्याध्यापिका श्रीमती नागमोडे सरस्वती यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या निवडीबद्दल तालुक्याचे गटविकास अधिकारी पाटील एस.जी., गटशिक्षणाधिकारी संतोष स्वामी, गुंडुरे डी. बी. यांनी अभिनंदन केले.

# उदगीर बाजार समितीत परराज्यातील आवक घटली

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १८ नोव्हेंबर :** उदगीर येथील मार्केट यार्ड मराठवाड्यात प्रसिद्ध आहे. येथे शेजारच्या तेलंगणा व कर्नाटक राज्यांच्या सीमावर्ती भागातून मोठ्या प्रमाणात शेतमाल विक्रीसाठी येतो. परंतु मागील काही दिवसांपासून शेतमाल घेऊन येणाऱ्या वाहनाला प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात दंड आकारला जात असल्याने सीमावर्ती भागातील शेतकरी त्यांचा माल उदगीरच्या बाजारात विक्रीसाठी आणत नसल्याने याचा बाजारावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

> उदगीरच्या मोंढ्यात सीमावर्ती भागातून जवळपास १५० ते २०० छोट्या वाहनांनी उदगीरमध्ये शेतीमाल येतो. हंगामानुसार याची संख्या बदलते. मात्र, विविध नियमांच्या नावाखाली दंडात्मक कारवाई करण्यात येते. भाड्यापेक्षा दंड जबर असल्याने वाहनधारकांना परवडत नाही.
>
> **–आशिषकुमार अय्यर**
> उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, उदगीर

> उदगीर येथे मागील एक वर्षापासून नवीन प्रादेशिक परिवहन विभागाचे कार्यालय सुरू झाले आहे. तेव्हापासून शेतीमालांच्या वाहनांवर मोठ्या प्रमाणात दंडात्मक कारवाई केल्या जात आहेत. प्रशासनाने शेतकऱ्यांना त्रासातून मुक्त करावे.
>
> **– प्रमोद बिरादार,** आडते व्यापारी.

येथील मार्केट यार्डात शेतकऱ्यांचा शेतमाल घेऊन येणाऱ्या वाहनांना साधारणपणे त्यांच्या वाहनात भरलेल्या मालाचे भाडे अंतर पाहून ४ ते ५ हजार रुपये होते. परंतु, आरटीओ विभागाकडून अशा वाहनाला जबर दंड आकारला जातो. कागदपत्रे तपासणीच्या नावाखाली ४ ते ५ तास वाहने उभी केली जातात.

येथील बाजारात शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव चांगला मिळतो म्हणून त्या भागातील शेतकरी येथे मोठ्या प्रमाणात त्यांचा शेतमाल विक्रीसाठी आणतात. मात्र, महाराष्ट्राच्या सीमेवर आरटीओ अधिकाऱ्यांकडून तपासणी करुन दंडात्मक कारवाई होत आहे. शेतकऱ्यांचा शेतीमाल घेऊन जाणाऱ्या वाहनांवर कारवाई होत नसते. कागदपत्रे तपासून वाहन सोडले जाते. क्वचितच एखाद्या वाहनात क्षमतेपेक्षा जास्त माल भरला असेल तर दंड केला जातो.

> शेतीमालाची आवक घटल्याने याचा फटका येथील व्यापाऱ्यांना, प्रक्रिया उद्योजकांना बसतो आहे. तसेच किराणा, कापड, सराफा, ऑटोमोबाईल, कृषी केंद्र, आदींनाही बसतो आहे. मागील काळात वाहनांवरील कारवायांमुळे कर्नाटकातून येणाऱ्या शेतीमालात घट झाली आहे. तूर, हरभरा व सोयाबीनची आवक घटल्याने अनेक प्रक्रिया उद्योजकांना शेजारील बिदर, कलबुर्गी येथून शेतीमाल खरेदी करावा लागत आहे. त्यामुळे मोठी अडचण होत आहे. **– दयानंद पांचाळ,** वाहनचालक

येथील मार्केट यार्डात महाराष्ट्रसह कर्नाटक व तेलंगणा तसेच शेजारच्या नांदेड जिल्ह्यातील सीमावर्ती भागातून शेतकऱ्यांचा शेतमाल विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात येतो. येथील बाजारपेठ मोठी असून प्रक्रिया उद्योगही येथे आहेत. त्यामुळे शेतीमालाला मागणी व इतर बाजारपेठांच्या तुलनेत चांगला दरही मिळतो. त्यामुळे लातूर जिल्ह्यासह सीमावर्ती भागातील शेतकऱ्यांची उदगीरच्या बाजार समितीला पसंती आहे. परंतु, मागील काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या सीमेवर काही ठिकाणी 'आरटीओ'च्या अधिकाऱ्यांकडून शेतीमालाच्या वाहनांची तपासणी करून दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांचा शेतीमाल देशात कुठेही विक्रीसाठी नेण्यास परवानगी आहे. परंतु, ज्या वाहनातून शेतकऱ्यांचा शेतीमाल विक्रीसाठी आणला जातो, अशा छोट्या वाहनांना ओव्हरलोडिंगच्या नियमाखाली २५ ते ३० हजार रुपयांची दंडाची रक्कम भरावी लागत असल्याचे दिसून येत आहे.

# सोयाबीन खरेदी केंद्राचे उद्घाटन

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १९ नोव्हेंबर :** शेतकर्यांच्या शेतीमालाला योग्य दर मिळावा म्हणुन नाफेड मार्फत शिरुर ताजबंद सोसायटी मार्फत सोयाबीन खरेदी केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगीतले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच साहेबराव जाधव प्रमुख अतिथी लातूर जिल्हा परिषद चे माजी अध्यक्ष पंडीतराव धुमाळ, उपसरपंच सुरज पाटील, चेअरमन राजकुमार सोमवंशी, चेअरमन तुळशीराम भोसले, व्हा. चेअरमन सुभाष गुंडरे, संचालक दिलीप पाटील, बालाजी पडोळे, गटसचिव गोविंद तांबाळगे उपस्थित होते.

सहकार मंत्री पाटील म्हणाले जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी हमीभाव योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करुन घ्यावी. खरिप हंगामातील शेतकऱ्यांच्या हाताशी आलेले पिके अतिवृष्टीने मातीत मिसळली शेतकऱ्यांना वाऱ्यावर कसे सोडायचे म्हणुन

दिपवाळी सण साजरा करण्यासाठी शासनाकडून अनुदान दिले एवढ्यावरच न थांबता रब्बी पिकाची पेरणीसाठी म्हणुन हेक्टरी दहा हजार रुपये दिले. अतिवृष्टीच्या पावसातून शेतीतील नुकसानीचे पैसे देणे चालू आहे. राहीलेले सोयाबीन ला योग्य दर मिळावा याकरिता नाफेड मार्फत शिरुर ताजबंद येथील सोसायटीत हमी भाव केंद्राचा शुभारंभ आज केला ते शेतकरी हित डोळ्यासमोर ठेवून केले.

मागील वर्षी २८०० शेतकऱ्यांनी या केंद्रावर सोयाबीन घातले असून त्यांना त्याचे पेमेंट दिलेले आहे.शेतकर्यांनी घाबरुन जायचे कारण नाही, शेतकऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होवू देणार नाही. सरकार आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सहकार मंत्री पाटील यांनी सांगीतले. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी जातीविरहित विकासाचे राजकारण केले.

सहकारातून सोसायटीच्या माध्यमातून जनतेला नेहमी सहकार्य केल्यानेच त्यांना सहकार मंत्री पद मिळाल्याचे चेअरमन राजकुमार सोमवंशी यांनी सांगीतले.

कार्यक्रमास नामदेव विराळे, शिवसांब स्वामी, गणेश कापसे, बालाजी गुंडरे, विजयकुमार येलमटे, माधव सरवदे, बाळासाहेब बेडदे, नारायण सूर्यवंशी, लक्ष्मण सारोळे, इब्राहिम पठाण यांच्या सह परिसरातील शेतकरी उपस्थित होते. सुत्रसंचलन माधव माने तर प्रस्ताविक व आभार बालाजी पडोळे यांनी केले.

# मूल्यवर्धन कार्यशाळेत मतदार जनजागृती

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १९ नोव्हेंबर :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अहमदपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ हा कार्यक्रम जाहीर झालेला असून त्यानुसार अहमदपूर शहरातील मतदारांमध्ये जनजागृती करुन मतदानासाठी प्रवृत्त करणे, नागरिकांमध्ये निवडणुक विषयी जनजागृती करण्यासाठी स्वीप पथकाद्वारे विविध उपक्रम राबवित आहे. दि.१७ नोव्हेंबर रोजी दुपारी डॉ. एसएसएम प्रतिष्ठानचे अध्यापक महाविद्यालय अंबेजोगाई रोड अहमदपूर येथे सुरू असलेल्या मूल्यवर्धन प्रशिक्षणात मध्यंतराच्या सुट्टीच्या कालावधीत स्वीप कलापथकाद्वारे मतदानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी प्रबोधनात्मक लोकगीतातून मतदार जनजागृती करण्यात आली.

या राष्ट्रीय लोकउत्सवात प्रत्येक मतदार बांधवांनी मतदान कारावा. आपल्या नातेवाईकांना इष्टमित्रांना मतदानाचे महत्त्व पटवून सांगावे. संविधानाने दिलेला हक्क २ डिसेंबर रोजी मतदान करुन बजवावा, असा संदेश देण्यात आला. या अभियानांसाठी सहाय्यक निवडणूक अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार उज्वला पांगरकर, मुख्याधिकारी प्रतीक लंबे, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे, केंद्रप्रमुख शफियोद्दीन बाबन कासार यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघात जनजागृती करण्यात येत आहे.

सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वीप पथक प्रमुख महादेव खळुरे, शिवकुमार गुळवे, मोहन तेलंग, बसवेश्वर थोटे, नागनाथ स्वामी, विवेकानंद भंडे, सौ. अर्चना माने यांनी परिश्रम घेत आहेत.

यावेळी डॉक्टर एसएसएम प्रतिष्ठानचे अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर दिलीप मुगळे, केंद्रप्रमुख कासार सर गटसाधन केंद्रातील मूल्यवर्धन प्रशिक्षणाचे संपर्कप्रमुख अधिव्याख्याता अनिल जाधव, विषय साधन व्यक्ती डॉक्टर कामाक्षी पवार मूल्यवर्धन प्रशिक्षणाचे नागनाथ दहिफळे, श्रीमती अनिता सुरवसे, श्रीमती मनीषा उगिले, श्रीमती संगीता येंगडे, विषय सहाय्यक योगीराज आमगे, अनंत लहाने, श्रीमती मनीषा गुणाले आधीसह मूल्यवर्धन कार्यशाळेतील मोठ्या संख्येने मतदार बंधूची उपस्थिती होती.

# पन्नगेश्वर शुगर मिलचे बॉयलर अग्नि प्रदिपन संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**

**पानगाव, १९ नोव्हेंबर :** पन्नगेश्वर शुगर मिल्स लि. विमल नगर पानगाव, ता. रेणापूर, जि. लातूर या साखर कारखान्याचा गळीत हंगाम सन २०२५-२६ चा पहिला बॉयलर अग्निप्रदिपन समारंभ मंगळवार दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी कारखान्याचे चेअरमन अक्षय मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीपणे संपन्न झाला. बॉयलर अग्नि प्रदिपन पुजा कारखान्याचे जेष्ठ मार्गदर्शक राजू भन्साळी व कारखान्याचे सरव्यवस्थापक व्यंकट वाकडे यांचे हस्ते विधिवत करण्यात आली.

याप्रसंगी शरद इंगळे, रोहन मुंदडा, रवि भन्साळी, श्रीराम साळुंके, चिफ इंजिनियर श्रीकृष्ण काटे, चिफ इंजिनियर मोरे, चिफ केमिस्ट हेडे, चिफ अकौंट खोसे, मुख्य शेतकी अधिकारी रमेश करपे व शेतकरी बांधव उपस्थित होते.

पन्नगेश्वर शुगर मिल्स लि. विमलनगर पानगाव हा कारखाना विमल अॅग्रोच्या व्यवस्थापनाच्या ताब्यात आल्या नंतर अत्यंत कमी कालावधीत कारखान्यातील सर्व मशिनरीचे ओव्हर ऑईलिंग व आवश्यकतेनुसार त्यात नुतणीकरण केले असून भागातील सर्व शेतकऱ्यांच्या हिताचाच विचार करून सदरील कारखाना चालविण्याचा व्यवस्थपनाचा मानस आहे. गळीत हंगामात कारखाना पूर्ण गाळप क्षमतेने चालवणार असून भागातील कोणत्याही शेतकर्याचा ऊस गाळपाविना शिल्लक राहणार नाही यासाठी संचालक मंडळ कटिबद्ध असून आपल्या भागातील ऊस इतर कोणत्याही कारखान्याला गाळपास न देता आपल्या हक्काच्या पन्नगेश्वर शुगर मिल्स लि. विमलनगर, पानगाव या कारखान्यस द्यावा असे आवाहन कारखान्याचे चेअरमन अक्षय मुंदडा यांनी केले आहे.

# विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूलमध्ये आर्ट ऑफ लिव्हींगकडून सक्षमीकरण

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, १९ नोव्हेंबर :** औसा तालुक्यातील आलमला येथील विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूल लातूर येथे आर्ट ऑफ लिव्हिंग लातूर व शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला यांच्या संयुक्त विद्यमाने युवक सक्षमीकरण शिबीर झाले. या सक्षमीकरण तीन दिवशीय शिबीराचे उद्घाटन आर्ट ऑफ लिव्हींगचे अंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षक अमोल वागले यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबीरात विद्यार्थ्यांना सक्षमीकरणाचे धडे देण्यात आले.

संस्थचे सचिव बसवराज धाराशिवे, योग प्रशिक्षिका लीना पंडित, दिपाली मसुतगे, अदिती सोनी,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, प्रमुख पाहुण्या अंजोरी परांडेकर, प्रा. दिनेश गुजराथी, डॉ. समीर शफी, प्राचार्य किशोर जेवे, प्रा. एस.एस. वागदरे, ऋतिक धाराशिवे, कार्यक्रम समन्वयक प्रगती कांबळे आदी उपस्थितीत होते.

प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनात योगा, प्राणायम, ध्यान धारना, आरोग्यासाठी किती उपयुक्त आहे याबाबतीत मार्गदर्शन केले. आज विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या युगात सकारात्मक दृष्टीकोन निमार्ण व्हावा. यासाठी अशा



शिबीराचे आयोजन संस्थेच्या माध्यमातून करत असल्याचे सांगितले.

आर्ट ऑफ लिव्हींगचे अंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षक अमोल वागले यांनी युवक सक्षमीकरणाकरीता ध्यान धारणाची गरज असून याद्वारे त्यांची भावनिक बुध्दीमत्ता विकसीत होते. तसेच विद्यार्थ्यामध्ये आत्मजागरुकता निर्माण होते व तणावाचे व्यवस्थापन करुन ध्येय साध्य करण्यास मदत होऊन येणऱ्या आव्हानाचा सामना करण्यास एक प्रकारची सकारात्मकता, प्रभावी संवाद कौशल्य विकसित होते. याकरीता आर्ट ऑफ लिव्हींगचया माध्यमातून जगभरात युवक सक्षमिकरण शिबीर राबविले जातात, असे मत अमोल वागले यांनी व्यक्त केले.

योग प्रशिक्षीका लीना पंडीत, दिपाली मसुतगे, अदिती सोनी यांनी योगा-प्राणायम द्वारे युवकामध्ये सामाजीक कौशल्य, करीअर आणि जीवन कोशल्य विकसीत होण्यास मदत होत असल्याचे सांगून आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये योगाचे असलेले महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.

प्रा. विद्या येलम, डॉ. वनिता वाडेवाले, डॉ. रामेश्वर धानुरे, पायल जाधव, वैष्णवी हावळे, विरभद्र स्वामी, महेश होनराव, प्रकाश वल्लेकर यांनी यासाठी पुढाकार घेतला होता. प्रा. एस.एस. वागदरे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# शाकंभरी नवरात्र महोत्सव २० डिसेंबर ते ४ जानेवारी दरम्यान

## जिल्हाधिकारी यांनी घेतला शाकंभरी नवरात्र महोत्सव तयारीची आढावा



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ नोव्हेंबर -**

श्री तुळजाभवानी देवींचा शाकंभरी नवरात्र महोत्सव यंदा २० डिसेंबर ते ४ जानेवारी या काळात उत्साहात पार पडणार आहे. याबाबतच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आज मंदिर संस्थानच्या प्रशासकीय कार्यालयात जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली.

बैठकीस तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, महंत तुकोजी बुवा, महंत चिलोजी बुवा, पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपिन शिंदे, अमरराजे कदम, अनंत कोंडो, आरोग्य विभागाचे अविनाश ढगे, सहायक पोलीस निरीक्षक अर्जुन चौधर तसेच मंदिर संस्थानाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. आगामी महोत्सवाचे नियोजन, सुरक्षा, भक्त व्यवस्थापन आणि पूजाविधींचे आयोजन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. महोत्सवातील प्रमुख धार्मिक कार्यक्रम २० डिसेंबर ते २८ डिसेंबर या कालावधीत श्री तुळजाभवानी देवींची मंचकी निद्रा परंपरेनुसार सुरू राहणार आहे. २८ डिसेंबर पहाटे देवींची सिंहासनावर प्रतिष्ठापना होणार असून दुपारी १२ वाजता घटस्थापना, २९ डिसेंबर रोजी रथ अलंकार महापूजा,३० डिसेंबर रोजी मुरली अलंकार महापूजा, ३१ डिसेंबर रोजी सकाळी जलयात्रा तसेच शेषशायी अलंकार महापूजा, १ जानेवारी रोजी भवानी तलवार अलंकार महापूजा,२ जानेवारी रोजी महिषासुरमर्दिनी अलंकार महापूजा, ३ जानेवारी रोजी शाकंभरी पौर्णिमा देवीची नित्योपचार पूजा, दुपारी १२ वाजता पूर्णाहुती व घटोत्थापन,४ जानेवारी रोजी भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे.

मंदिर संस्थानच्या वतीने महोत्सव काळात अपेक्षित असलेल्या भक्तवर्गाच्या व्यवस्थापनासाठी सुरक्षा, स्वच्छता तसेच वाहतूक व्यवस्थापन याबाबत आवश्यक ती तयारी करण्यात येणार आहे.

यावेळी सर्व विभागांना समन्वयातून नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष किर्ती किरण पुजार यांनी दिल्या.

# आळणी येथे पोलिस असल्याचे भासवत दोन सोन्याच्या अंगठ्यांची फसवणूक

### चार अनोळखी इसमांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ नोव्हेंबर -**

धाराशिव तालुक्यातील आळणी शिवारात एका वृद्ध शेतकऱ्याची तोताईगिरी करून सोन्याच्या दागिन्यांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे.

याबाबत पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी अच्युतराव रामभाऊ लावंड (वय ६२, रा. आळणी) हे दि.१७ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता शेत गट क्रमांक २७३ मधील जनावरांच्या गोठ्याजवळ असताना चार अनोळखी इसम




ांनी स्वतःला पोलिस असल्याचे भासवत त्यांची फसवणूक केली. या इसमांनी अच्युतराव लावंड यांच्याकडील १२ ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या (किंमत अंदाजे ६०,०००) फसवणूक करून घेतल्या आणि पसार झाले.

घटनेबाबत लावंड यांनी दिलेल्या तक्रार दाखल केली असून त्यावरून धाराशिव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# मुख्य रस्त्यावरील पाईपलाईन फुटून तयार झालेले खड्डे तात्काळ बुजवण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१९ नोव्हेंबर -**

लोहारा शहरातील आष्टामोड व मुख्य रस्त्यावरील पाणीपुरवठा पाईपलाईन फुटल्याने रस्त्यावर मोठमोठे खड्डे तयार झाले असून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या गंभीर समस्येच्या तात्काळ दुरुस्तीची मागणी माजी नगरसेवक शामसुंदर नारायणकर यांनी मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नारायणकर यांनी १८ नोव्हेंबर रोजी लोहारा नगरपंचायत कार्यालयाला दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की हॉटेल शिवनेरीसमोर पाणीपुरवठा लाईन फुटल्यामुळे रस्त्यावर खोल खड्डे पडले आहेत.

या खड्ड्यांमुळे मोटारसायकली व चारचाकी वाहने अडकून लहानमोठे अपघात होत आहेत.


१७ नोव्हेंबर रोजी एका मोटारसायकलस्वारासह एका महिलेला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या धोकादायक खड्ड्यांची सात दिवसांच्या आत दुरुस्ती न झाल्यास, येत्या २७ नोव्हेंबर रोजी स्वतः त्या खड्ड्यात बसून आंदोलन करणार असल्याचा इशारा नारायणकर यांनी निवेदनात दिला आहे.

# तेरखेडा गावात मनरेगाच्या माध्यमातून ४८ एकरवर केळी लागवड

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१९ नोव्हेंबर -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील शेतकऱ्यांनी केळीच्या नगदी पिकाकडे मोठ्या उत्साहाने वाटचाल सुरू केली आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) माध्यमातून गावातील तब्बल ४८ एकर क्षेत्रावर केळी लागवडीला मोठ्या प्रमाणात प्रारंभ झाला असून या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार मिळणार आहे.



मनरेगाच्या निधीतून लागवड आणि मजुरीसाठी आवश्यक तो खर्च उपलब्ध होत असल्याने शेतकरी पारंपरिक पिकांऐवजी जास्त नफा देणाऱ्या केळीच्या पिकाकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहेत. येत्या काळात शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास हा प्रकल्प मोठी मदत करणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे. या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कृषी विभागाचे अधिकारी विशेष लक्ष देत असून तेरखेडा गावात सहाय्यक कृषी अधिकारी यादव डी.बी. हे प्रत्यक्ष कामाचे मार्गदर्शन करत आहेत. हा प्रकल्प कृषी विभागाचे अधिकारी विश्वेकर, मंडळ कृषी अधिकारी सूर्यवंशी तसेच तालुका कृषी अधिकारी बरवे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनबद्ध आणि जलद गतीने राबविला जात आहे.मनरेगा योजनेचा शेती विकासासाठी होत असलेला हा सकारात्मक उपयोग तेरखेडा गावासाठी निश्चितच एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरत असून शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला नवी दिशा मिळत आहे.

# कळंब येथे जे. एफ. अजमेरा रोटरी नेत्र रुग्णालय (धर्मादाय) च्या नेत्रसेवा केंद्राचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१९ नोव्हेंबर -**



जे. एफ. अजमेरा रोटरी नेत्र रुग्णालय (धर्मादाय), धाराशिव यांच्या वतीने कळंब येथे नव्याने स्थापन करण्यात आलेल्या नेत्रसेवा केंद्राचे भव्य उद्घाटन मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाले.

उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे आणि उद्घाटक म्हणून रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे प्रांतपाल सुधीर लातुरे उपस्थित होते. त्यांच्या शुभहस्ते या नेत्रसेवा केंद्राचे लोकार्पण करण्यात आले. कळंब शहर तसेच परिसरातील खेड्यांतील गोरगरीब व गरजू नागरिकांना सुलभ, परवडणारी आणि गुणवत्तापूर्ण नेत्रसेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देणे, हा या व्हिजन सेंटर स्थापनेमागील मुख्य उद्देश आहे. समारंभात प्रांतपाल सुधीर लातुरे यांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले.

गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी हे केंद्र अत्यंत उपयुक्त ठरेल, असे त्यांनी नमूद केले. कळंब रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. अभिजीत जाधवर यांनी उद्घाटन सोहळ्याच्या शुभेच्छा देताना, या केंद्रामुळे स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

उपप्रांतपाल प्रदीप मुंडे यांनी व्हिजन सेंटरमधून रुग्णांना देण्यात येणाऱ्या विविध नेत्रतपासण्या व सुविधांची माहिती रोटेरियन सदस्य आणि उपस्थित नागरिकांना दिली. धाराशिव रोटरी क्लबचे अध्यक्ष रणजीत रणदिवे यांनी, या नव्या केंद्रामुळे रोटरी नेत्र रुग्णालयाच्या सेवेला अधिक बळ मिळेल, असे सांगितले.

याप्रसंगी धाराशिव रोटरी क्लबचे पदाधिकारी अध्यक्ष रणजीत रणदिवे, सचिव पी. आर. काळे, पी.के. मुंडे, सुनील गर्जे, इंद्रजीत आखाडे तसेच कळंब येथील रोटेरियन सदस्य, शहरातील डॉक्टर्स आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाराशिव येथे १६ वर्षीय मुलाला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवले

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ नोव्हेंबर -**

सांगवी (बु), ता. अक्कलकोट (जि. सोलापूर) येथील १६ वर्षीय आदित्य गणेश मोरे याला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना धाराशिव शहरात घडली आहे. आदित्य सध्या टी. पी.एस. कॉर्नर, धाराशिव येथे वास्तव्यास होता.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी गणेश शंकर मोरे (वय ४१) यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, दि.१८ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १.३० च्या सुमारास अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून त्यांचा मुलगा पळवून नेला.

तक्रारीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम १३७(२) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून याप्रकरणी अधिकचा पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# प्रभाग क्र. १ मधील सर्व उमेदवार अपात्र ठरवा

### सुर्यकांत राठोड यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ नोव्हेंबर -**

नळदुर्ग नगरपालिका निवडणुकीतील प्रभाग क्र. १ मधील सर्व उमेदवारांना अपात्र घोषित करावे, अशी मागणी सुर्यकांत राठोड यांनी निर्वाचन अधिकारी, नगरपरिषद नळदुर्ग यांच्याकडे दिलेल्या निवेदनातून केली आहे.

सुर्यकांत राठोड यांनी निवेदनात नमूद केले आहे की, ते प्रभाग क्र. १ मधील रहिवासी असून मागील दहा वर्षांपासून येथील सर्व रहिवाशांची घरे नियमाकुल करण्यासाठी शासनदरबारी लढा देत आहेत. प्रशासन मात्र त्यांना गायरान जमिनीवरील अतिक्रमणधारक ठरवत आहे. शासकीय जागेवरील अतिक्रमणे नियमबद्ध करण्याबाबत शासनाने निर्णय घेतले असून त्यानुसार नगरपालिका अनेकदा सर्वेक्षण करून त्याचे अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केले आहेत.

वसंतनगर सहकारी गृहनिर्माण संस्था ही १९७१ मध्ये नोंदणीकृत असून तिला स्वमालकी हक्क प्राप्त असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ११८ धरणग्रस्तांना मान्यता देऊन संस्थेच्या नावे १६ एकर जमीन हस्तांतरित करण्यात आली आहे.

यासाठी समजकल्याण कार्यालयामार्फत ९ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले होते, तसेच देखरेखीसाठी उपजिल्हाधिकारी, उपनिबंधक, तहसीलदार व समजकल्याण अधिकारी यांची नियुक्तीही करण्यात आली होती.

असे सर्व कायदेशीर दस्तऐवज असतानाही नगरपालिका आजही आम्हाला भोगवटाधारक समजत असून अतिक्रमणधारक ठरवत आहे, अशी खंत राठोड यांनी व्यक्त केली. त्यामुळे प्रभाग क्र. १ मधून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांकडे स्वमालकीची घरे नसल्याने ते शासकीय जमिनीवरील अतिक्रमणधारक ठरतात आणि त्यामुळे ते निवडणूक लढण्यास अपात्र असल्याचा दावा त्यांनी केला.

या प्रकरणात अंतिम निर्णय होईपर्यंत प्रभाग क्र. १ ची निवडणूक स्थगित करावी, अशी मागणीही राठोड यांनी निवेदनात केली आहे.

या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी धाराशिव व तहसीलदार तुळजापूर यांनाही देण्यात आल्या आहेत.

## धोकादायकरीत्या उभे ठेवल्याप्रकरणी दोघांवर गुन्हे

**परंडा, दि.१९ नोव्हेंबर -**

शहरातील बाबा कलेक्शनसमोर परंडा-बार्शी रोडवर सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस धोकादायक पद्धतीने टमटम उभे ठेवल्याप्रकरणी दोघांवर गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. आरोपी तुराब सिकंदर पठाण (वय ३६), रा. मुजावर गल्ली परंडा आणि नरमेश्वर मनोहर डांगे (वय ५५), रा. सोमवार गल्ली परंडा यांनी दि.१८ नोव्हेंबर रोजी सार्वजनिक रस्त्यावर अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने वाहन उभे केले होते.

# लोटस पोदार लर्न स्कूलमध्ये मधुमेह तपासणी शिबिर उत्साहात




**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ नोव्हेंबर -**

जागतिक मधुमेह दिनाचे औचित्य साधून नळदुर्ग येथील लोटस पोदार लर्न स्कूलच्या वतीने पालकांसाठी रक्तदाब व मधुमेह तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. आरोग्याबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाची सुरुवात मधुमेह संशोधनातील उल्लेखनीय योगदानासाठी प्रसिद्ध सर फ्रेडरिक बँटिंग यांच्या प्रतिमापूजनाने झाली. प्रतिमापूजन आणि शिबिराचे उद्घाटन डॉ. भास्कर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरात डॉ. ज्योती भास्कर पाटील, डॉ. आरोही भास्कर पाटील, डॉ. शिव आदित्य रणवरे, तसेच शाळेचे अध्यक्ष पद्माकर पाटील व बापुराव गायकवाड उपस्थित होते. पालकांना मार्गदर्शन करताना डॉ. भास्कर पाटील म्हणाले की, मधुमेहाचा वाढता धोका लक्षात घेता संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि योग्य जीवनशैली बदल अत्यंत आवश्यक आहेत. छोटे बदलही आरोग्यात मोठा फरक घडवू शकतात.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश कोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राचार्या रेवती शिंदे मगर यांनी मानले. शिबिराचे आयोजन यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

# कळंबमध्ये बियर शॉपीच्या गोडाउनवर चोरी; १.८२ लाखाचा माल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१९ नोव्हेंबर -**

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते भाजी मंडई रोडवरील हौसलमल बियर शॉपीच्या गोडाउनमध्ये अज्ञात चोरट्यांनी सेंध घालून मोठी चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे.



याबाबत पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी रंजित रोहीदास हौसलमल (वय ४१, रा. कल्पना नगर, कळंब) यांनी दिलेल्या माहितीनुसार दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री १०.३० ते दि. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० दरम्यान अज्ञात व्यक्तीने गोडाउनच्या खोलीवरील पत्रा उचकटून आत प्रवेश केला.

चोरट्याने तेथून ७८ बियर बॉक्स (एकूण किंमत अंदाजे १,८२,५२०) चोरून नेले आहेत.तक्रारीवरून कळंब पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ३३१(४), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# ऊस वाहतुकीमुळे रस्त्यांवरील धोका वाढला

## वाहनचालकांनी काळजी घेण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.१९ नोव्हेंबर -**

सध्याच्या गळीत हंगामात ऊस कारखाने जोमाने सुरू झाल्याने विविध मार्गांवरून अवजड ऊस वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. कळंब तालुक्यातील सिद्धीविनायक ग्रीन टेक, मोहेकर गुळ, शंभू महादेव साखर, तसेच नॅचरलं शुगर, कळंब-केज सीमेवरील येडेश्वरी साखर कारखाना, आणि याचबरोबर तेरणा साखर कारखाना, एस. पी. शुगर आदी कारखान्यांकडे हजारो टन ऊस वाहतूक केली जात आहे.

अवजड ऊस वाहने रस्त्यांवरून वेगाने धावत असल्यामुळे मागून पुढे जाणाऱ्या वाहनधारकांनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

ऊस ट्रॅक्टर तसेच इतर वाहने मोठ्या आवाजातील साउंड सिस्टीमचा वापर करत असल्याने मागून दिलेला हॉर्न ऐकू न येणे, यामुळे अपघाताची शक्यता वाढते. काही दिवसांपूर्वीच कळंब-ढोकी रस्त्यावर झालेल्या अपघातात महत्वाची जीवितहानी झाली आहे.

कळंब-येरमाळा, कळंब-ढोकी, कळंब-शिराढोण-रांजनी, कळंब-खामसवाडी, मोहा, येडशी-तडवळा-ढोकी आदी मार्गांवर तसेच मुख्य महामार्गावर ऊस वाहतुकीचा मोठा ताण दिसून येत आहे. अनेक ऊसवाहक वाहनांचे



चालक मोबाईलवर बोलत वाहन चालवताना दिसतात, ज्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

ट्रॅक्टर, ट्रक, डम्पर, जाळीचे ट्रेलर, दोन चाकी छकडे अशा विविध वाहने ऊस वाहतूक करीत आहेत. नियमांनुसार प्रत्येक ऊस वाहक वाहनावर रिफ्लेक्टर फलक असणे बंधनकारक असताना, हे फलक क्वचितच दिसतात.

त्यामुळे साखर कारखान्यांच्या वाहतूक विभागांनी संबंधित वाहनचालकांना सूचना व मार्गदर्शन करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

मुख्य रस्त्यावर ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांना पोलीस व रस्ते परिवहन विभागानेही आवश्यक सूचना कराव्यात, अशी मागणी केली जात आहे. वाढत्या ऊस वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर इतर वाहनधारकांनी, विशेषतः दोन चाकीस्वारांनी जास्तीत जास्त काळजी घेण्याचे आवाहन दैनिक तरुण भारत करत आहे.

# 'जयप्रकाश'मध्ये पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ नोव्हेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे दि. १९ नोव्हेंबर रोजी भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी जि. प. सदस्य रामदास अण्णा कोळगे होते.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्राचार्य जयप्रकाश कोळगे म्हणाले की, इंदिरा गांधी या लहानपणापासून धाडसी आणि देशसेवेच्या विचारांनी घडलेल्या नेत्या होत्या. गरिबी दूर करण्यासाठी त्यांनी विविध योजना राबवल्या, बँकांचे राष्ट्रीयीकरण केले.

कृषी, उद्योग, व्यापार क्षेत्रांना चालना




दिली आणि संशोधनाला प्रोत्साहन दिले.

देशावर येणाऱ्या संकटांना त्या खंबीरपणे सामोऱ्या जात आणि संरक्षण विषयात कोणतीही तडजोड करीत नसत. त्यांच्या कार्यशैलीतून आपणही प्रेरणा घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष दादा कोळगे, माजी जि. प. सदस्य रामदास अण्णा कोळगे, माजी ग्रामपंचायत सदस्य राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे (श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालय), मुख्याध्यापक नानासाहेब शेलार (इंदिरा गांधी प्राथमिक शाळा), पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक गणेश शेटे यांनी केले, तर शेवटी सर्व उपस्थितांचे आभार अरुण माने यांनी मानले.

## तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाची श्रावणी रणखांब जलतरण स्पर्धेत चमकली

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ नोव्हेंबर -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे आणि ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या अंतरमहाविद्यालयीन जलतरण स्पर्धेत तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाची विद्यार्थिनी श्रावणी पांडुरंग रणखांब हिने उत्कृष्ट कामगिरी केली.

श्रावणीने १०० मीटर फ्रीस्टाइलमध्ये प्रथम, तर ५० मीटर फ्रीस्टाइलमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. तिने राज्यस्तरीय तसेच खाडी समुद्री स्पर्धेतही यश मिळवले आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मुला-मुलींच्या इंटर कॉलेजिएट कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ नोव्हेंबर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे यांच्या अधिपत्याखाली विलासराव देशमुख फाउंडेशन, स्कूल ऑफ फार्मसी, लातूरतर्फे मुला-मुलींच्या इंटर कॉलेजिएट कबड्डी स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २१ व २२ नोव्हेंबर २०२५ रोजी विलासराव देशमुख फाउंडेशन स्पोर्ट्स ग्राउंड, न्यू एमआयडीसी, एअरपोर्ट रोड, लातूर येथे होणार आहे.

डीबीएटीयू अंतर्गत असलेल्या सर्व संलग्न महाविद्यालयांचा या ३९; मेगा स्पोर्ट्स इव्हेंट३९; मध्ये सहभाग असणार आहे. यावर्षीची ही क्रीडा स्पर्धा भव्य, उत्साहवर्धक आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. स्पर्धेचा शुभारंभ सोहळा २१ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे.

या कार्यक्रमास प्रवीण सरदेशमुख, किरण जाधव, समद पटेल, विजय देशमुख, सीए ऋषिकेश पाटील, रवींद्र काळे, संजय माने, सचिन गायकवाड यांची उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. वाकुरे आणि क्रीडा समन्वयक प्रा. विक्रम वाघमारे यांनी लातूर, नांदेड, सोलापूर, धाराशिव, बीड, परभणी आदी जिल्ह्यांतील सर्व सहभागी पथकांना आमंत्रण दिले आहे.



# लातूरमध्ये अनधिकृत होल्डिंगचा प्रश्न गंभीर

## 'एनएसयूआय'चा महापालिकेला अल्टिमेटम

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ नोव्हेंबर :** लातूर शहरात अनाधिकृतपणे लावण्यात आलेल्या होल्डिंग्स



आणि युनिपोलच्या विरोधात लातूर जिल्हा छडणख ने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शहर महानगरपालिकेची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता अनेक ठिकाणी ही जाहिरातफलक उभारण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

एनएसयूआय पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, पालिकेचे नियम धाब्यावर बसवून शहरातील प्रमुख चौक, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अनधिकृत होल्डिंग्स झळकत आहेत. या प्रकरणी महानगरपालिकेने कोणतीही कारवाई न केल्याने शहरातील नागरिकांमध्येही नाराजीचे वातावरण पसरले आहे. संघटनेतर्फे महानगरपालिका प्रशासनाला निवेदन देऊन दुजाभाव न करता तातडीने अनधिकृत फलक हटवण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने त्वरीत कारवाई न केल्यास लातूर जिल्हा एनएसयूआयकडून महानगरपालिका कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

शहर स्वच्छता, नियोजन आणि कायदेपालनाच्या दृष्टीने या प्रकरणी त्वरित पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडूनही होत असून पुढील काही दिवसांत महानगरपालिकेची भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष रोहित बिराजदार, शहराध्यक्ष व्यंकटेश झिपरे, युवक काँग्रेस शहर उपाध्यक्ष अक्षय चव्हाण, महेश साळुंके व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# गांधी चौक ठाण्यासमोरील बेवारस वाहने हलविणार केव्हा?

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ नोव्हेंबर :** लातूर शहरातील गांधी चौक पोलीस ठाण्याच्या समोर मागच्या अनेक वर्षांपासून बेवारस वाहने पडून आहेत. त्यामुळे नाहक रस्ता अडवला जात असून ही बेवारस वाहने जर पोलीस प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करून या ठिकाणाहून हलवली तर या जागेचा उपयोग मनपा प्रशासन एखाद्या चांगल्या उद्देशासाठी करू शकते,अशा प्रतिक्रिया सुजाण लातूरकरांतून व्यक्त होताना दिसत आहेत.

लातूर शहरातील गांधी चौक हा अतिशय वर्दळीचा चौक आहे. नांदेड रोडवरून आलेल्या प्रत्येक एसटी बसला शहरातील मुख्य बस स्थानकात जाण्यासाठी महात्मा गांधींच्या अर्धाकृती पुतळ्याला वळसा घालूनच जावे लागते. कामाचा दिवस असो की सुटीचा नेहमी हा परिसर वाहनांच्या वर्दळीत असतो. शहरात एखादा मोर्चा अथवा आंदोलन असल्यास मुख्य रस्ता अनेकदा वाहतुकीसाठी बंद करून या मार्गावरून जाणारी वाहतूक गांधी चौक पोलीस ठाण्याच्या पुढून, मुख्य पोस्ट कार्यालयाच्या बाजूने वळवली जाते.





त्यावेळी गांधी चौकाकडून मुख्य पोस्ट कार्यालयाकडे जाणारा रस्ताही अतिशय जाम होतो.

लातूर शहरातील वाहतूक आणि वाहनांची संख्या मागच्या काही वर्षात झपाट्याने वाढली आहे. लातूरचे मूळ नागरिक त्यासोबतच शिक्षण-नोकरीच्या निमित्ताने लातुरात वास्तव्यास असणारी मंडळी यांच्यामुळेही वाहनांची संख्या लक्षणीय वाढली आहे. वाहने वाढली असली तरी रस्ते मात्र आहेत तसेच आहेत. त्यामुळेही अनेकदा शहरातील मुख्य रस्ते जाम होताना पाहायला मिळतात.

गांधी चौक पोलीस ठाण्याच्या समोरील मोकळ्या जागेत अनेक दिवसांपासून दोन ट्रक, एक मोडकळीला आलेला ऑटो, जुन्या झाडाचे मोठे खोड पडून आहेत. पोलीस ठाण्यासमोर उभे असलेले ट्रक तर वर्षानुवर्षे पडून आहेत. एखाद्या अपघातात किंवा अन्य काही कारणांमुळे ही वाहने पोलिसांनी जप्त केलेली असू शकतात. मात्र, त्यांची ठराविक कालावधीनंतर विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. विल्हेवाट लावणे जर काही कारणवश शक्य नसेल तर ती रस्त्यावरून हटवून पोलीस प्रशासनाने अन्य ठिकाणी स्थलांतरित करणे गरजेचे आहे. ही नुकसानग्रस्त वाहने ऐन पोलीस ठाण्याच्या समोरच पडून असल्याने एक तर पोलीस ठाण्याला ते शोभेसे दिसत नाही.

तसेच या उभ्या असणाऱ्या वाहनाच्या आडोशाला अगदी दिवसा उजेडी, रस्त्यावर कमालीची वर्दळ असतानाही लघुशंका करणाऱ्यांची संख्याही कमी नाही. अनधिकृत मुतारीसारखा या जागेचा वापर होतोय, ही बाब पोलीस ठाण्यातील प्रत्येक पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांनाही माहिती आहे. पण, तरीही ही वाहने अद्यापपर्यंत हटवण्याची कार्यवाही झालेली दिसत नाही. किमान आत तरी फारसा वेळ वाया न घालवता ही वाहने पोलीस ठाण्याच्या समोरून हटवावीत आणि त्या जागेवर पोस्टाच्या समोर ज्याप्रमाणे बाकडे टाकून नागरिकांच्या बसण्याची व्यवस्था केली आहे, तशा प्रकारचा सामाजिक उपक्रम राबविण्यात यावा, अशी मागणी वाढीस लागली आहे.

# रक्तदान हेच महादान : डॉ. शिंदे

**त.भा. वृत्तसेवा,**


**लातूर, १९ नोव्हेंबर :** लातूर येथील मोरया क्रिटीकेअर हॉस्पीटलचे प्रमुख डॉ. महेश शिंदे यांचा ३८ वा वाढदिवस रक्तदान व अन्नदान करून उत्साहात साजरा करण्यात आला. मोरया क्रिटीकेअर हॉस्पिटल व संजीवनी ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आलेल्या डॉ. शिंदे यांच्या जन्मदिनानिमीत ३० जणांनी रक्तदान केले. त्याचबरोबर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे गरजू पेशंटना अन्नदान करण्यात आले. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. शिंदे म्हणाले की, गरजू लोकापर्यत डॉक्टरचे जाणे गरजेचे असून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या पाहिजेत. भावी काळात गरजू व्यक्तींना व्यक्तीगत पातळीवर जी मदत लागेल ती मी उपलब्ध करून देणार आहे, असे प्रतिपादन केले.




# लातूर शहरातील मोठ्या नाल्या बनल्या आहेत कचऱ्याचे आगार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ नोव्हेंबर :** लातूर शहरातील सर्वच भागात सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित व्हावा, परिसर स्वच्छ राहावा याकरिता मोठमोठ्या नाल्या उभारण्यात आल्या आहेत. नाल्या उभारल्या गेल्या, मात्र त्याची साफसफाई आजपर्यंत कधीच केली गेली नाही. त्यामुळे या नाल्या कचऱ्यांनी भरून गेल्याचे ठिकठिकाणी पाहावयास मिळते. हे



सर्व पाहता या नाल्या कचऱ्याचे आगार बनल्याचे निदर्शनास येत आहे. याकडे मनपा प्रशासनाने त्वरित लक्ष घालण्याची मागणी नागरीकांतून वाढीस लागली आहे.

लातूर शहर हे मराठवाड्यातील वेगाने विकसित होत जाणारे शहर म्हणून ओळखले जाते. शैक्षणिक पंढरी म्हणूनही लातूरची ओळख आहे. लातुरात आपली मुले शिक्षणासाठी ठेवण्यासाठी पालकमंडळी आसुसलेली असतात. आपला पाल्य लातुरात शिकतोय हे सांगताना पालकांनाही अभिमान वाटतो. या बाबी जरी खऱ्या असल्या तरी स्थानिक मनपा प्रशासनाकडून स्वच्छतेच्या अनेक बाबींकडे हेतुतः दुर्लक्ष्य होत असल्याचे पाहावयास मिळते. वेगाने विस्तारित जाणाऱ्या लातूर शहराच्या जवळपास सर्वच भागात मोठमोठ्या नाल्या बांधण्यात आलेल्या आहेत. मात्र, कोणत्याही भागातील नाल्यांची नियमित सफाई मनपाच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून केली जात नाही. हा कोणावर आरोप नसून वास्तव आहे.

मनपाकडे स्वच्छता कर्मचारी मोठ्या संख्येने कार्यरत असतानाही ते स्वच्छतेचे काम नियमितपणे का करत नाहीत? हाही खरा प्रश्न आहे. शहराच्या विकासासाठी आलेल्या निधीतून मोठ्या नाल्या बांधण्यात आल्या. या नाल्या एकदा का बांधून पूर्ण झाल्या की, संबंधित कंत्राटदारांची जबाबदारी संपली. त्यानंतर मुख्य जबाबदारी येते ती मनपाच्या स्वच्छता विभागाच्या प्रमुखांवर. स्वच्छता प्रमुखांनी त्या त्या विभागाच्या स्वच्छता निरीक्षकांच्या माध्यमातून नियमितपणे स्वच्छतेची कामे केली जातात का? याचा आढावा घेणे आवश्यक असते. प्रत्यक्षात मनपाच्या स्वच्छता विभागात सगळाच सावळा गोंधळ असल्याचे दिसून येते. याठिकाणी एकाचा पायपोस एकाला नसल्याचे दृष्टीपथास येते. हे तर काहीच नाही, मनपात कायमस्वरूपी स्वच्छता कर्मचारी म्हणून सेवेत असलेली बरीच मंडळी स्वतः कामावर न येता आपल्या जागी रोजंदारीवरील कामगाराला पाठवत असल्याचा धक्कादायक प्रकारही मनपात उघडकीस आल्याचे सर्वज्ञात आहे. त्यामुळे मनपाचा सगळा कारभारच रामभरोसे चालतोय की काय? अशी शंका कोणाही सुजाण नागरिकांच्या मनात निर्माण झाल्यास त्यात वावगे ते काय?

लातूर शहरातील कोणत्याही भागातील मोठ्या नाल्यातील कचरा काढून त्या कधीही स्वच्छ केल्याजात नाहीत. कचऱ्याने नाल्या भरून पावसाळ्यात रस्त्यावर इतस्ततः नळीतील घाण पाणी पसरल्याचे चित्र जवळपास अनेक भागात पाहायला मिळाले. उदाहरणादाखल सांगायचे झाल्यास शहराच्या जुना औसा रोड, सिंचन भवन परिसरात पावसाळ्यात पावसाच्या पाण्याने नाल्याची घाण पूर्णपणे रस्त्यावर येऊन साचल्याने नागरिकांना अनेकदा घाणीच्या विळख्यात वावरण्याची पाळी आली. याबाबत सामान्यांनी दाद मागायची तरी कोणाकडे? कारण मनपाच्या एखाद्या अधिकाऱ्याकडे तक्रार केली तरी तो काहीतरी सांगून वेळ मारून नेतो, असा अनेकांचा अनुभव आहे.

मनपात मागाचयातीं साडेतीन वर्षापासून पदाधिकारीच नसल्याने सगळा कारभार प्रशासकाच्या माध्यमातून चालू आहे. आता आगमिकही महिन्यात मनपाच्या निवडणुका झाल्यानंतर नूतन पदाधिकाऱ्यांच्या कार्यकाळातच काही चांगले होऊ शकेल, अशा विचाराने लोक दिवस कंठत आहेत. मात्र, काहीही झाले तरी शहरातील मोठ्या नाल्या कचऱ्याचे आगार बनल्यागत झाल्याचे पाहावयास मिळते, हे वास्तव आहे.

# लातुरात मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला

## महापालिका प्रशासनाकडून प्रतिबंधाची नागरिकांची मागणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ नोव्हेंबर :** लातूर शहराच्या जवळपास सगळ्याच भागात मोकाट कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येत आहे. या मोकाट कुत्र्यांमुळे लहान बालकांना आपल्या घरासमोर मुक्तपणे खेळणे-बागडणेही दुरापास्त झाले आहे. महिला-नागरिकांनाही या मोकाट कुत्र्यांचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे लातूर शहर मनपा प्रशासनाने अशा मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त, प्रतिबंध करण्यात यावा, अशी मागणी वाढीस लागली आहे.

लातूर शहराचा असा एकही परिसर नाही, ज्या भागात मोकाट कुत्र्यांचा वावर नाही. शहराच्या कोणत्याही कॉलनी-नगरात जा, त्या ठिकाणी मोकाट कुत्र्यांचा समूह आढळून येतो. अनेकदा ही मोकाट कुत्री दिवसाच्या वेळेत



नागरिकांना फारसा त्रास देत नाहीत. मात्र, रात्र झाली की, त्यांच्या हिंस्रपणाला सुरुवात होते. रात्रीच्या वेळेस वर्षानुवर्षे एकाच गल्ली, कॉलनी-नगरात राहणाऱ्या लोकांनाही ही मोकाट कुत्री भुंकून परेशान करतात. अनेकांना रात्री उशिरा आपल्याच घरी जायचे म्हणजे छातीत धस्स होते. ही मोकाट कुत्री भुंकून तर त्रास देतातच, त्याशिवाय चक्क लोकांच्या अंगावर चवताळून धावून जाऊन त्यांचा चावा घेण्यासाठी पुढे सरसावतात. पायी चालणाऱ्या लोकांनाच नाही तर दुचाकीवरून जाणाऱ्या वाहनधारकांच्याही मागे धावून ही कुत्री चांगलीच परेशान करताना आढळून येतात. कुत्र्यांमुळे आपल्या घर-परिवाराचे संरक्षण होत असले तरी त्याचा त्रासही अनेकांना होत असल्याचे पाहावयास मिळते.

लातूर शहरातील एलआयसी कॉलनी, बलदवा नगर, ओमसाई नगर, रुद्रेश्र्वर नगर, प्रगती नगर, इंद्रायणी कॉलनीसह अनेक भागात मोकाट कुत्र्यांचा वावर मागच्या काही दिवसात कमालीचा वाढला आहे. त्यामुळे नागरिकांना फार त्रास सहन करावा लागत आहे. स्थानिक मनपा प्रशासनाने अशा मोकाट कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणीही वाढीस लागली आहे. मोकाट कुत्र्यांच्या दंशामुळे अनेकांना आपले प्राणही गमवावे लागल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे प्राणघातक ठरू पाहणाऱ्या मोकाट कुत्र्यांचा प्रतिबंध वेळीच करण्यात यावा, अन्यथा नागरिकांना त्याकरिता रस्त्यावर उतरावे लागेल,असा इशाराही देण्यात येत आहे.

# अल्पभूधारक शेतकऱ्यांना बियाणे वाटप

**लातूर जिल्हा भारतीय किसान संघाचा उपक्रम**

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ नोव्हेंबर :** भारतीय किसान संघाच्या लातूर जिल्हा यांच्या वतीने पूरग्रस्त अल्पभूधारक शेतकऱ्यांना रबी पिकासाठी बियाणे वाटप करण्यात आले.



यावेळी भारतीय किसान संघ लातूर जिल्हा अध्यक्ष महादेवआप्पा गिरवलकर, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर हुरदळे, जिल्हा कोषाध्यक्ष सतीशराव देशपांडे, लातूर जिल्हा मंत्री नवनाथ मद्दे, जिल्हा सदस्य अशोक मठपती, उद्योजक चंद्रशेखर हुंडेकरी स्वामी, शेखर मराठे, जिल्हा उपाध्यक्ष नागनाथ उटेकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

लातूर जिल्ह्यातील एकूण सहा तालुक्यात मिळून ३५ गावातील १०२ शेतकऱ्यांना गहू आणि हरभरा या बियाणांचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष गिरवलकर यांनी शेतकऱ्यांच्या सहकार्यासाठी भारतीय किसान संघ सदैव तत्पर असल्याचे सांगितले. जिल्हामंत्री नवनाथ मद्दे यांनी मनोगत व्यक्त करताना अतिवृष्टीने नुकसान झालेल्या अल्पभूधारक शेतकरी बांधवांसाठी हा मदतीचा छोटासा प्रयत्न असल्याचे सांगितले. बळीराजाला भारतीय किसान संघ मदत करण्यासाठी नेहमी सज्ज राहील, असा विश्वासही मद्दे यांनी व्यक्त केला.

यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांनी अतिशय आनंदाने भारतीय किसान संघाला शुभ आशीर्वाद दिले.

अडचणीत केलेली मदत आम्ही कधीही विसरू शकणार नाही भारतीय किसान संघ आमच्या पाठीशी सदैव राहो, अशी सर्व शेतकऱ्यांनी प्रार्थना केली.

# ज्येष्ठ नागरिकांचे पालनपोषण, कल्याण कायद्याविषयी मार्गदर्शन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ नोव्हेंबर :** केंद्र सरकारचा समाज कल्याण व सक्षमीकरण विभाग व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या सूचनेनुसार पालक व ज्येष्ठ नागरीकांचे पालन पोषण व कल्याण कायदा २००७ या विषयी जनजागृती करण्यासाठी लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि लातूर उपविभागीय कार्यालयाच्यावतीने मातोश्री वृद्धाश्रम येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका यांचे मार्गदर्शनाखाली झालेल्या जनजागृती शिबिरामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, मातोश्री वृद्धाश्रमाचे अध्यक्ष डॉ. महेश देवधर तसेच ज्येष्ठ नागरिक संघाचे संघटक डॉ. बी. आर. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

नायब तहसीलदार परमेश्वर कांबळे, मंडळ अधिकारी आर. के. झाडे, जिल्हा विधी सेवा




प्राधिकरण लातूर चे कर्मचारी व मातोश्री वृद्धाश्रमातील सर्व ज्येष्ठ नागरिक यावेळी उपस्थित होते.

'वसुधैव कुटुंबकम'चा संदेश देणाऱ्या आपल्या देशात वृद्धाश्रमांची स्थापना होणे, ही खेदाची बाब आहे. घरातील आजी-आजोबा हे घराचा वारसा असतात. त्यामुळे घराण्याचा वारसा जपणे, घरातील प्रत्येक सदस्याची जबाबदारी आहे, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सदस्य सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी सांगितले.

ज्येष्ठ नागरीकांची यादी पोलीस अधिक्षक कार्यालयात असणे गरजेचे आहे. तसेच ज्येष्ठ नागरीकांच्या तक्रारीचे निरासरण होण्यासाठी पोलीस अधिक्षक कार्यालयात हेल्पलाईन नंबर उपलब्ध करून देण्यात आला असून ज्येष्ठ नागरिकांनी यामुळे मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

प्रत्येक मनुष्य हा वयाची साठी ओलांडलेवर ज्येष्ठ नागरीक बनत असतो. त्यामुळे त्याची जाणीव ठेवून घरातील सर्व ज्येष्ठ नागरीकांची काळजी व हीत जपणे सर्वांची जबाबदारी आहे, असे उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी सांगितले. तसेच पालक व ज्येष्ठ नागरिकांचे पालन पोषण व कल्याण कायदा २००७ व महाराष्ट्र पालक व ज्येष्ठ नागरिकांचे पालन पोषण व कल्याण नियम २०१० मधील तरतुदींबाबत सविस्तर माहिती दिली.